डॉ. मनोहर सुरवाडे

# डिजिटल युगातील माणूस



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# डिजिटल युगातील माणूस

( लेखसंग्रह )

डॉ. मनोहर झगडू सुरवाडे

# डिजिटल युगातील माणूस

## लेखक: डॉ. मनोहर झगडू सुरवाडे

धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर जि.

जळगाव,४२५५०३

वैशाली नगर, फैजपूर, जि. जळगाव,

मोबाइल ९९७०११७४३९

ई-मेल : msurwade09@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

**प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान**

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : ४ एप्रिल २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. १८०/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- डॉ. मनोहर झगडू सुरवाडे - ९९७०११७४३९

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



# डॉ. मनोहर झगडू सुरवाडे

## प्राध्यापक, विभागप्रमुख व उपप्राचार्य

- **सामाजिक व शैक्षणिक कार्य**

१. **पीएचडी :** 'मराठवाड्यातील कथाकारांचे प्रादेशिक वेगळेपण', स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, २००३

**२. संशोधन प्रकल्प**

२.१ - समकालीन दलित कथेतील सामाजिक जाणिवा, यु.जी.सी., पुणे विभाग,२००४

२.२ - भटक्या विमुक्तांच्या मराठी साहित्याचा समाजशास्त्रीय अभ्यास, यु.जी.सी., नवी दिल्ली, २०१४

**३. शोधनिबंध**

३.१ - समकालीन दलित कथेतील आंबेडकरी विचार : अक्षरवैदर्भी, ऑक्टो-नोंव्हे. २०१०

३.२ - दलितेतर लेखकांच्या कथांमधील दलित जीवनदर्शन : अस्मितादर्श,एमेजू, २०१०

३.३ - मराठवाड्याच्या कथांतील आशयसूत्रे : अनुबंध, एप्रिल, २०११

३.४ - आदिवासी काव्यातील सामाजिक आणि वाङ्मयीन जाणिवा : अक्षरवैदर्भी, मे, २०११

३.५ - मराठवाड्याच्या कथांतील दुष्काळविषयक आशयसूत्रे : आत्मप्रत्यय, ऑक्टो- डिसे., २०११
३.६ - संत साहित्यातील दुष्काळाचे संदर्भ : पंचधारा, ऑक्टो-डिसे,२०११
३.७ -आदिवासी काव्यातील आंबेडकरी विचारदर्शन :अस्मितादर्श,२०१२
३.८-स्त्रियांचे सक्षमीकरण आणि त्यांचे अधिकार:प्लाटीनम,एप्रिल, २०१२
३.९-दलित चळवळ आणि आत्मकथन: एक अनुबंध:आधार,सप्टे.२०१२
३.१० - साहित्यातील गांधीविचार : अक्षरवैदर्भी, नोव्हें २०१२
३.११- उन्नती चौधरी लिखित ‘स्रीत्त्वाची सूत्रे’ : स्रीस्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याचा शोध घेणारा नाविन्यपूर्ण काव्याविष्कार, अक्षरवैदर्भी दिवाळी विशेषांक, २०२४
३.१२- नव्वदोत्तर ग्रामीण साहित्य : चिंतन आणि चर्चा **:** Conference Sovenier**,** दारापूर, २०११

**४. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये शोधनिबंध सादर : एकूण -१५**

**५. संपादित पुस्तकांतील लेख**

५.१‘राघववेळ आणि तणकट’ या कादंबऱ्यातील ग्रामीणता:ग्रंथवेद,२०१२
५.२ - स्वातंत्र्यपूर्वकालीन मराठी कादंबरीतील मानवतावादी दृष्टिकोन : मराठी साहित्यातील मानवतावाद, अथर्व प्रकाशन, जळगाव, २०१२
५.३ - समकालीन दलित कथेतील आंबेडकरी विचार : १९८० नंतरचे मराठी साहित्य, ----२०१२
५.४ ‘गावरंग’ माणदेशी माणसांची बदलती जीवनशैली : कृष्णाक्षर,२०१५
५.५- लोकमान्य टिळक यांच्या लेखनातील दुष्काळविषयक संदर्भ आणि दृष्टिकोन : मराठी साहित्य आणि आंतरविद्याक्षेत्रीय संशोधन,---- २०१६
५.६- १९७५ नंतरच्या मराठी नाटकातील आशय आणि पात्रचित्रणास पूरक ठरलेल्या भौतिक घटकांचे अन्वयार्थ : १९७५ नंतरचे मराठी नाटक : आशय आणि रचना, --- २०१७

## ६ - प्रकाशित पुस्तके

### ➢ कवितासंग्रह

१- षटकार : प्राइम प्रकाशन, जळगाव, २०२५

२- पुरुषनामा : ई-साहित्य प्रतिष्ठान ठाणे, २०२५

३- तो-ती-ते : प्राइम प्रकाशन, जळगाव, २०२५

४-पुरुषाच्या व्यथा : प्राइम प्रकाशन, जळगाव, २०२५

### ➢ कथासंग्रह

१. खूळ : ई-साहित्य प्रतिष्ठान ठाणे, २०२५

२. शापित : ई-साहित्य प्रतिष्ठान ठाणे, २०२५

### ➢ संपादन

१. नकलाकार दिलीप अलोणे गौरवग्रंथ : ईसाहित्य प्रतिष्ठान, ठाणे,२०२५

### ➢ साहित्य : समीक्षा व संशोधनपर ग्रंथ

१ - समकालीन दलित कथा : हार्मिस प्रकाशन, पुणे, २००८

२ - १९८० नंतरची ग्रामीण कथा : बळीवंश प्रकाशन, नांदेड, २०१०

३ - साठोत्तरी साहित्य प्रवाह: विविधता आणि वेगळेपण : सुगम प्रकाशन, अमरावती, २०१२

४ - स्वातंत्र्यपूर्व मराठी साहित्यातील सामाजिक संदर्भ : सुगम प्रकाशन, अमरावती, २०१२

५ - ग्रामीण समाज आणि कथासाहित्य:सुगम प्रकाशन, अमरावती, २०१२

६ - आदिवासी साहित्य प्रवाह : सुगम प्रकाशन, अमरावती, २०१२

७ - दलित आत्मकथा आणि कथा : सुगम प्रकाशन, अमरावती, २०१२

८ - ग्रामीण साहित्यप्रकार : स्वरूप आणि चिकित्सा, सुगम प्रकाशन, अमरावती, २०१२

९ - मराठी ग्रामीण कथा- लेखिकांचे योगदान : स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद,२०१३

१०- उन्नती चौधरी लिखित-'साहित्य आणि समाजशास्त्रीय संशोधन' (सहलेखक) : प्रशांत पब्लिकेशन, जळगाव २०२३

**७. पीएच.डी. मार्गदर्शक : कवयित्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव**

**८. संशोधन विद्यार्थी** : १२ विद्यार्थ्यांना Ph.D. प्राप्त

**९.** विविध विद्यापीठांमध्ये पीएच.डी. प्रबंधांचे बहि:स्थ परीक्षक

**१०.** सामाजिक व शैक्षणिक प्रबोधनपर व्याख्याने

**११.** जळगाव विद्यापीठस्तरीय विविध समित्यांवर शैक्षणिक कार्य

**१२. पुरस्कार -**

१- महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार, २००९

२- भीमरत्न पुरस्कार, सम्राट फाउंडेशन, सावदा, जि. जळगाव,२०१३

३- १९८० नंतरची ग्रामीण कथा, या शोधग्रंथास तीन राज्यस्तरीय पुरस्कार,२०११

४- आदर्श शिक्षक पुरस्कार, युनियन बँक ऑफ इंडिया, २०१०

५- टीचर एक्सलंट अवार्ड, लोकमत वृत्तपत्र समूह, २०२५

*** *** ***

# अर्पण

संगणक, इंटरनेट आणि प्रगत तंत्रज्ञानाद्वारे

निर्माण झालेल्या माहितीच्या युगात

आधारवड बनलेल्या एआय’ला

(Artificial Intelligence (AI) ) -----

# मनोगत

सगळीकडे घाईगडबड, धावपळ आणि गोंधळ असलेल्या पर्यावरणात अनिश्चितता, असुरक्षितता असतानाही मोठ्या प्रमाणात भ्रम आणि अहं वाढलेले दिसतात. जसं काही सगळं चांगलं चाललेलं आहे, अशा भ्रमात आणि आपल्याच तालात माणसे दिसतात. साध्या-साध्या गरजा पूर्ण झाल्याने त्यांचे अहंकार वाढत गेलेले आहे,पण समाज आणि राष्ट्र याबाबत त्यांच्यात बधिरता आली,हे त्यांच्या लक्षातच येत नाही. कारण माणसाच्या हातात मोबाईल आहे आणि सोबत गुगलबाबा असून त्याला चालवणारे इंटरनेट व बोलके करणारे सोशल मीडियाचे विविध डिजिटल प्लॅटफॉर्म्स आहेत. जगातील कोणत्याही गोष्टी, माहिती किंवा साधने पाहणे आणि व्यक्तीशी संपर्क करणे शक्य झालेले आहे. त्यामुळे जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. त्याला 'एआय' म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता हे एक मित्र किंवा उत्तम मार्गदर्शक किंवा माहितीविषयक सर्व गरजा सहज पूर्ण करणाऱ्या पालकासारखे मिळाले आहे. हे ठीक आहे; पण मानवी भावना, विचार, जीवनमूल्ये आणि सामाजिक जीवन यांवर पूर्णतः चांगले परिणाम होतात, असे नाही. त्याची दुसरी बाजू फार काळी आहे; पण ती दिसत नाही. त्या काळया कृष्णविवरमध्ये आजचा माणूस अडकत गेलेला आहे. त्याच्या लक्षात येत नाही की, ‘हे नेमकं काय होत आहे’ जे मिळतं त्यातून त्यात तो स्वतःला समाधानी मानतो; पण आतून त्याला खरं स्वास्थ्य आणि समाधान मिळत नाही. तंत्रज्ञान युगात अडकल्याने त्याच्या आतल्या-आत एक अस्वस्थता त्याला पोखरत असते. कारण त्याच्या वापराबाबत तो चांगला साक्षर झालेला नाही किंवा स्वतःला विकसित करण्यासाठी तो त्याचा योग्य वापर करत नाही. अशा डिजिटल युगातील माणसांविषयी काही विचार या लेखसंग्रहातून मांडण्याचा एक छोटासा प्रयत्न येथे करण्यात आलेला आहे

त्यात एआयचे योगदान अधिक आहे. माणसाच्या जोडीला आलेली ही बुद्धिमत्ता चांगली आहे. मात्र तिच्या आहारी जाऊन स्वतःच्या बुद्धिमत्तेला गंजू देणे, हे काही चांगले नाही.

डिजिटल युगामुळे मानवी जीवन अधिक सोयीस्कर, वेगवान आणि माहितीपूर्ण झाले आहे. ही चांगली गोष्ट आहे; पण हव्या असलेल्या गोष्टी त्वरित आणि गतीने मिळाव्यात, ही माणसाची मानसिकता त्याला बेचैन करणारी ठरते. इंटरनेटच्या माध्यमातून तो विविध प्रकारचे प्लॅटफॉर्म वापरत असल्याने त्याचे विचार आणि वर्तन एकांगी बनले आणि त्याची समूहभावना कमी होत गेली. तो एकटा पडला. परिणामी रिकाम्या वेळी एकाकीपणाने त्याचे मानसिक स्वस्थ बिघडले. सोशल मीडियावर स्वतःला दाखवण्याची त्याची हौस त्याच्या गोपनीय जीवनाला बाधा आणणारी ठरली. इतरांकडून स्तुती करण्याची व चांगलेपणाची मान्यता मिळण्याची अपेक्षा त्याला लागून असते. त्या विचारात कळत-नकळत तो दुखावला जातो आणि त्याचे मानसिक आरोग्य बिघडते. हे त्याला कळतही नाही. शिवाय स्वतःचे विचार व डोके कमी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता जास्त वापरतो. त्यामुळे त्याच्या मेंदूची नैसर्गिक चेतना कमी होत गेलेली आहे. एकूणच आजच्या माणसाची जीवनशैली बदललेली आहे, असे सगळेच म्हणतात; पण माणसात चांगला बदल झाला, असे फारसे ऐकायला येत नाही. अशा माणसांविषयीचे भाष्य या लेखसंग्रहात केलेले आहे. वाचक त्याचे स्वागत करतील, अशी अपेक्षा आहे. ई-साहित्य प्रतिष्ठाणने नेहमीच प्रोत्साहन आणि लेखन उर्मीस पाठबळ दिलेले आहे. मा. सामंत सर आणि त्यांच्या सर्व सहकार्यांचे आभार ----

**** *** ***

# अनुक्रमणिका


१. डिजिटल तंत्रज्ञान : भारतीय ज्ञानपरंपरेतील उत्तर-आधुनिक स्रोत

२. सर्जनशीलता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता

३. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सर्जनशील साहित्यनिर्मिती

४. मानवी आणि कृत्रिम बुद्धिमत्तेतील साम्य-भेद

५. साहित्य एकादमी पुरस्कृत निवडक कादंबऱ्यांमधील मानवीमूल्ये

६. पुरुषवाद आणि साहित्य

७. डिजिटल युगातील माणूस

८. पुरस्कार म्हणजे जबाबदारीचं ओझं असतं


*** *** ***

# १. डिजिटल तंत्रज्ञान :
# भारतीय ज्ञानपरंपरेतील उत्तर-आधुनिक स्रोत

प्राचीन भारतात अठरा विद्या आणि चौसष्ठ कला म्हणून विविध ज्ञान शाखा निर्माण झालेल्या होत्या. आज त्यालाच इंडियन नॉलेज सिस्टीम म्हणून महत्त्व दिले जात आहे. या भारतीय ज्ञानप्रणालीमध्ये धर्मशास्त्र, समाजशास्त्र, तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, नीतिशास्त्र(तत्त्वज्ञानाची एक शाखा), खगोलशास्त्र, गणित, वास्तुकला, छंदशास्त्र, तर्कशास्त्र, कृषी, व्यापार, वाणिज्य, वैद्यकशास्त्र, वास्तुशास्त्र, पशुवैद्यकशास्त्र, साहित्य आणि कला, अशी अनेक क्षेत्रे विकसित झालेली होती. ऐतिहासिक काळात भारतीय समाजावर अनेक अरिष्ट कोसळले, तरी ग्रंथरूपाने ही ज्ञानप्रणाली एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत गेलेली आहे. सैद्धांतिक उपयोजन किंवा व्यावसायिक ज्ञानशाखा म्हणून मानवी विकासात या ज्ञानप्रणालीचा महत्त्वाचा वाटा राहिलेला आहे. त्याचा समाजाच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत गेलेला आहे. आज या परंपरेत डिजिटल तंत्रज्ञानाकडेही भारतीय ज्ञानप्रणालीचा अद्ययावत असा **उत्तर-आधुनिक**(Postmodern) स्रोत म्हणून पाहायला हरकत नाही. कारण तर्कशुद्धता आणि वस्तुनिष्ठ सत्यावर प्रश्नचिन्ह निर्माण केले जाऊन सापेक्षता, वैयक्तिक अनुभव आणि विविध दृष्टिकोन स्वीकारले जातात. आधुनिक (Modernism) विचारसरणीच्या पुढे जाऊन, कला आणि सांस्कृतिक प्रवाहांबाबत एकाच सत्याऐवजी अनेक दृष्टिकोन स्वीकारणारी, प्राचीन आणि आधुनिकतेच्या कल्पना आणि तत्त्वांना आव्हान देणारी ती एक

ज्ञानप्रणाली आहे. शिवाय डिजिटल तंत्रज्ञानाने पूर्वीच्या ज्ञानपरंपरेला नवे अर्थ देऊन सामाजिक आणि सांस्कृतिक विकास घडवून आणणे, हेही त्याचे प्रयोजन आहे.

## **१. भारतीय ज्ञानपरंपरा**

ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद, असे चार वेद आहेत. शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद आणि ज्योतिष या सहा विद्या वेदांग म्हणून ओळखल्या जातात. आयुर्वेद (वैद्यक), धनुर्वेद (शस्त्रविद्या), गंधर्ववेद (संगीत व कला), अर्थशास्त्र (राज्यशास्त्र व अर्थशास्त्र) हे चार उपवेद मानले जातात. तसेच मीमांसा (तर्कशास्त्र), न्याय, धर्मशास्त्र (नीतिशास्त्र), पुराण (इतिहास व कथा) ही चार उपांगे आहेत. या सर्व ज्ञानशाखांना १८ विद्या म्हणून मान्यता मिळालेली आहे. व्यक्तीला जीवन जगण्यासाठी त्या विद्या सखोल ज्ञान देतात, अशी शिकवण प्राचीन भारतीय शिक्षणपद्धतीने प्रत्येक पिढीला दिलेली आहे. अर्थात- पारंपरिक ज्ञान किंवा स्थानिक ज्ञान हे अनेकदा प्रतिकूल असलेल्या वातावरणात जीवन आणि जगण्याच्या गुंतागुंती समजून घेणे हे मानवी यशाची नोंद आहे. तांत्रिक, सामाजिक, संघटनात्मक किंवा सांस्कृतिक स्वरूपाचे पारंपरिक ज्ञान जगणे आणि विकास या मानवी प्रयोगाचा एक भाग म्हणून प्राप्त केले गेले. असे भारतातील प्राचीन ज्ञान परंपरेबाबत म्हटले गेले आहे. सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन जगण्याच्या अनुषंगाने एक प्रयोग म्हणून त्याकडे पाहिले जाते. तसेच भारतातील संगीत, नृत्य, चित्रकला, वास्तुकला, साहित्य आणि इतर अशा विविध क्षेत्रात चौसष्ठ कला विभागण्यात आल्या

होत्या. ते व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी अंगभूत कौशल्यावर आधारित पारंपरिक ज्ञान आहे. त्या कला खालीलप्रमाणे आहेत.

“१. पानक रस (मदिरा व पेय तयार करणे), २. धातुवाद (कच्ची धातू,पक्की व मिश्रधातू वेगळे करणे), ३. दुर्वाच योग(कठीण शब्दांचा अर्थ लावणे),४.आकर ज्ञान( खाणींविषयी अंतर्गत सखोल ज्ञान असणे), ५.वृक्षायुर्वेद योग(उपवन, कुंज, वाटिका, उद्यान बनविणे) ६.पट्टिका वेत्रवाणकल्प( नवार, सुंभ, वेत इत्यादींनी खाट विणणे), ७.वैनायिकी विद्याज्ञान ( शिष्टाचार व विनय यांचे ज्ञान असणे), ८.व्यायामिकी विद्याज्ञान(व्यायामाचे शास्त्रोक्त ज्ञान असणे),९. वैजापिकी विद्याज्ञान(दुसऱ्यावर विजय मिळविणे),१०.शुकसारिका प्रलापन (पक्ष्यांची बोली जाणणे),११.अभिधान कोष छंदोज्ञान(शब्द व छंद यांचे ज्ञान असणे.)१२. वास्तुविद्या( महाल, भवन, राजवाडे, सदन बांधणे),१३.बालक्रीडाकर्म(लहान मुलांचे मनोरंजन करणे), १४. चित्रशब्दापूपभक्षविपाक क्रिया(पाकक्रिया, स्वयंपाक करणे.) १५. पुस्तकवाचन (काव्यगद्यादी पुस्तके व ग्रंथ वाचणे.) १६.आकर्षण क्रीडा(दुसऱ्याला आकर्षित करणे.) १७. कौचुमार योग (कुरुपव्यक्तीला लावण्यसंपन्न बनविणे.) १८. हस्तलाघव (हस्तकौशल्य तथा हातांनी कलेची कामे करणे.)१९. प्रहेलिका(कोटी, उखाणे वा काव्यातून प्रश्न विचारणे.)२०. प्रतिमाला(अंत्याक्षराची योग्यता ठेवणे.)२१. काव्यसमस्यापूर्ती(अर्धे काव्य पूर्ण करणे.)२२. भाषाज्ञान(देशी-विदेशी भाषांचे ज्ञान असणे.)२३. चित्रयोग(चित्रे काढून रंगविणे.)२४. कायाकल्प(वृद्ध व्यक्तीला तरुण करणे.)२५. माल्यग्रंथ विकल्प( वस्त्रप्रावरणांची योग्य निवड करणे.)२६. गंधयुक्ती(सुवासिक गंध वा

लेप यांची निर्मिती करणे.)२७. यंत्रमातृका (विविध यंत्रांची निर्मिती करणे.)२८.अत्तर विकल्प(फुलांपासून अर्क वा अत्तर बनविणे.)२९. संपाठय़(दुसऱ्याचे बोलणे ऐकून जसेच्या तसे म्हणणे.)३०.धारण मातृका(स्मरणशक्ती वृद्धिंगत करणे.)३१. छलीक योग(चलाखी करून हातोहात फसविणे.)३२. वस्त्रगोपन(फाटकी वस्त्रे शिवणे.)३३. मणिभूमिका(भूमीवर मण्यांची रचना करणे.)३४. द्यूतक्रीडा (जुगार खेळणे.)३५.पुष्पशकटिका निमित्त ज्ञान(प्राकृतिक लक्षणाद्वारे भविष्य सांगणे.)३६. माल्यग्रथन(वेण्या, पुष्पमाला, हार, गजरे बनविणे.) ३७. मणिरागज्ञान (रंगावरून रत्नांची पारख करणे वा ओळखणे.) ३८.मेषकुक्कुटलावक-युद्धविधी(बोकड, कोंबडा इ.च्या झुंजी लावणे.)३९. विशेषकच्छेद ज्ञान(कपाळावर लावायच्या तिलकांचे साचे करणे.)४०.क्रिया विकल्प(वस्तूच्या क्रियेचा प्रभाव उलटविणे.)४१. मानसी काव्यक्रिया(शीघ्र कवित्व करणे.)४२.आभूषण भोजन(सोन्या- चांदी वा रत्नामोत्यांनी काया सजवणे.)४३. केशशेखर पीड ज्ञान(मुकुट बनविणे व केसात फुले माळणे.)४४. नृत्यज्ञान(नाचाविषयीचे शास्त्रोक्त सखोल ज्ञान असणे.)४५. गीतज्ञान(गायनाचे शास्त्रीय सखोल ज्ञान असणे.)४६. तंडुल कुसुमावली विकार (तांदूळ व फुलांची रांगोळी काढणे.)४७.केशमार्जन कौशल्य (मस्तकाला तेलाने मालीश करणे.)४८.उत्सादन क्रिया( अंगाला तेलाने मर्दन करणे.)४९. कर्णपत्र भंग(पानाफुलांपासून कर्णफुले बनविणे.)५०.नेपथ्य योग (ऋतुकालानुसार वस्त्रालंकाराची निवड करणे.) ५१. उदकघात(जलविहार करणे. रंगीत पाण्याच्या पिचकारी करणे.)५२. उदकवाद्य(जलतरंग वाजविणे.) ५३. शयनरचना (मंचक, शय्या व मंदिर सजविणे.)५४. चित्रकला(नक्षी वेलवुट्टी व

चित्रे काढणे.)५५. पुष्पास्तरण( फुलांची कलात्मक शय्या करणे.)५६. नाट्याख्यायिका दर्शन(नाटकांत अभिनय करणे.),५७. दशनवसनांगरात (दात, वस्त्रे, काया रंगविणे वा सजविणे.)५८. तुर्ककर्म(चरखा व टकळीने सूत काढणे.)५९. इंद्रजाल (गारुडविद्या व जादूटोणा यांचे ज्ञान असणे.) ६०.तक्षणकर्म(लाकडावर कोरीव काम करणे.)६१.अक्षर मुष्टिका कथन(करपल्लवीद्वारे संभाषण करणे.)६२.सूत्र तथा सूचीकर्म(वस्त्राला रफू करणे.)६३. म्लेंछीतकला विकल्प(परकीय भाषा ठाऊक असणे.)६४.रत्नरौप्य परीक्षा(अमूल्य धातू व रत्ने यांची पारख करणे.)

अशाप्रकारे यासारख्या चौसष्ठ कलांचा विचार केला, तर आज डिजिटल प्लॅटफॉर्मवर त्यांची माहिती मिळून त्या शिकता येतात; पण त्याबाबत जागरुकता फारशी नाही. डिजिटल प्लॅटफॉर्मवर वेळ खर्ची करणे हे न सांगता सहजपणे जमते. जमत नाही फक्त ज्ञानात भर घालणे. तो एक रटाळ प्रोग्राम वाटतो. मग ज्ञान परंपरा डिजिटल होऊनही त्याचा फारसा फायदा बहुसंख्येने कोणी घेतांना दिसत नाही. फालतुगिरी अधिक अनुभवाला येते. वास्तविक सुसंस्कृत जीवनासाठी सांगितलेले ते पारंपरिक भारतीय ज्ञान-कौशल्ये आहेत, ज्यामध्ये सादरीकरण कला (गायन, नृत्य, नाट्य), सर्जनशील कला (चित्रकला, दागिने बनवणे, फुलांची मांडणी, शरीर सजावट), व्यावहारिक कौशल्ये (स्वयंपाक, सुतारकाम, औषध, अभियांत्रिकी) आणि मनोरंजन (कोडे, हाताची चालाकी, खेळ), अशी त्यांची विभागणी केलेली असून व्यक्तीच्या मन, शरीर आणि आत्म्याच्या समग्र विकासाचे कौशल्याधिष्ठित ज्ञान आहे. आज

प्रत्येकाच्या हातात मोबाईल असून इन्टरनेटचा वापर अनेक जण करतात; परंतु त्याविषयीचे कौशल्य शिकणारे अपवादच आहेत.

प्राचीन भारतीय अठरा विद्या आणि चौसष्ठ कला आज डिजिटल तंत्रज्ञानामुळे विविध प्लॅटफॉर्मवर ई-बुक, व्हिडीओ, ऑडिओ आणि छायाचित्रे या स्वरूपात उपलब्ध आहेत. त्याची हवी ती माहिती व ज्ञान मिळविण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करता येतो. तसेच ऑनलाइन पद्धतीने त्या विद्या आणि कला घरी राहून शिकता येतात. त्यासाठी संबंधितांकडे जाण्याची गरज नसते. वेळ आणि पैशांचीही बचत होते. मात्र मोबाईलवर नको त्या आवडीच्या गोष्टी पाहिल्या जात असल्याने विद्या आणि कलांच्या बाबतीत तेवढी जिज्ञासा आणि उत्सुकता दिसून येत नाही. वेळेचा अपव्यय तेवढा होतो, असेही सर्वेक्षणातून सिद्ध झालेले दिसून येते. अशावेळी डिजिटल तंत्रज्ञान काय आहे, ते आपण समजून घेतले पाहिजे.

## २. डिजिटल तंत्रज्ञान

अध्यात्म, साहित्य, कला, तत्वज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञान याविषयी भारतीय ज्ञान-प्रणाली समग्र दृष्टिकोन बाळगते. नैतिकता, शाश्वत जीवन आणि निसर्ग यांच्याशी सुसंवाद आणि सर्व कल्याणासाठी ज्ञानाचा वापर यांसारख्या मूल्यांना महत्त्व देते. आजच्या डिजिटल तंत्रज्ञानाकडेही त्याच दृष्टीने आपण पाहू शकतो; तशी दृष्टि विकसित करायला हवी. असो---

'डिजिटल' हा शब्द लॅटिन शब्दापासून आला आहे. गणितीय अंक म्हणजे डिजिटस होय. यात ० ते ९ अंक येतात. डिजिटल स्वरुपात माहिती संग्रहित करणे, प्रसारित करणे, यासाठी अपेक्षित माहिती संख्यांमध्ये रूपांतरित केली जाते. सर्वात मूलभूत मशीनस्तरावर 'शून्य आणि एक' म्हणून मायक्रोप्रोसेसरच्या वापरावर अवलंबून असलेल्या तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. हे डिजिटल तंत्रज्ञान म्हणजे डेटा तयार करणारे, संग्रहित करणारे किंवा त्यावर प्रक्रिया करणारे इलेक्ट्रॉनिक साधने, प्रणाली, उपकरणे आणि संसाधने आहेत. संगणक, स्मार्टफोन, इंटरनेट आणि सॉफ्टवेअर ॲप्लिकेशन्स ही याची प्रमुख उदाहरणे आहेत. डिजिटल तंत्रज्ञान माहिती दर्शवण्यासाठी आणि कार्ये करण्यासाठी बायनरी कोड (० आणि १) वापरते, ज्यामुळे माहितीचे जलद प्रसारण आणि हाताळणी शक्य होते. संप्रेषण, माहिती प्रक्रिया, स्टोरेज आणि पुनर्प्राप्ती सुलभ करण्यासाठी संगणक, स्मार्टफोन, डिजिटल कॅमेरे, सॉफ्टवेअर, इंटरनेट. यांसारख्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर केला जातो. त्याच्यामध्ये अनेक डिजिटल प्लॅटफॉर्म तयार केलेली आहेत. त्यात माहिती साठवून समाजापर्यंत पोहोचवली जाते. एकूणच प्रत्येक काळात मानवी जीवनात नव-नवीन गोष्टी मिर्माण होत गेल्येल्या आहेत. तरीही माणसाचे जीवन समस्याग्रस्तच का राहिले ? हा एक प्रश्नच आहे. मान्य आहे की शत-प्रतिशत प्रश्न सुटू शकत नाहीत; पण किरकोळ नावाची बाब कधी कोणी अनुभवली आहे का ? मग आता त्याची खात्री डिजिटल प्लेटफोर्मच्या संदर्भातही करून घेता येईल. कारण चांगले कमी आणि वाईट जास्त, याच मापाने माणसाचे जीवन काळवंडून गेलेले आहे. तरी माणूस त्याकडे गांभीर्याने फारसा पाहत नाही. तसा

विचार करण्याची त्याला सवय नाही. सर्व काही परिस्थितीवर सोडून देण्याची वृत्ती बनलेली आहे.

## ३. डिजिटल प्लॅटफॉर्म

डिजिटल तंत्रज्ञानाच्या आधारे लोकांना सॉफ्टवेअर-आधारित पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी जे व्यासपीठं निर्माण केली गेलेली आहेत. ते डिजिटल प्लॅटफॉर्म म्हणून ओळखले जातात. त्याच्या माध्यमातून माहितीची देवाण-घेवाण आणि व्यवहार करण्यासाठी ग्राहक आणि उत्पादक यांना जोडले जाते. डिजिटल प्लॅटफॉर्म हे एक तंत्रज्ञानविषयक सहभागी पायाभूत सुविधा आहे, जे उत्पादक आणि ग्राहक यांच्यात सुलभ संवाद साधण्यास अनुमती देते आणि नेटवर्क प्रभावांद्वारे मूल्यनिर्मितीमध्ये वाढ करते. अशा डिजिटल प्लॅटफॉर्मचे किंवा ॲपचे अनेक प्रकार आहेत. व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टाग्राम, लिंकधीन आणि ट्विटर, यांसारख्या सोशल मीडियामुळे वापरकर्त्यांमध्ये परस्परसंवाद घडून येतो आणि सामग्रीचे सामायिकरण सुलभ होते. फ्लिपकार्ट, ऍमेझॉन, ई-बाय, स्नॅपडील आणि अलीबाबासारखे प्लॅटफॉर्ममुळे खरेदीदार आणि विक्रेत्यांना जोडण्यासाठी ऑनलाइन बाजारपेठ उपलब्ध होते. टॅक्सी, ऑटो, बाईक सेवा पुरविण्यासाठी ola, Uber आणि Airbnb हे ॲप असून ग्राहकांच्या मागणीनुसार वाहतूक सेवा पुरविली जाते. YouTube आणि Netflix डिजिटल सामग्री वितरित करतात. त्याच्यामुळे निर्मात्यांना मोठ्या

प्रेक्षकांपर्यंत पोहोचता येते. आर्थिक देवाणघेवाण आणि व्यवहार घडून येण्यासाठी गुगलपे, फोनपे, पेपल, पेटिएम, यांसारखे ॲप असून ते ग्राहक आणि व्यापाऱ्यांना जोडतात. एकूणच लोकांमध्ये एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी माहितीची देवाण-घेवाण आणि व्यवहार होण्यासाठी, तसेच माहितीचे संकलन, विश्लेषण करण्यासाठी आणि वापरकर्त्यांमधील सेवा, परस्परसंवाद आणि व्यवहार सुलभ होण्यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्मचा किंवा ॲपचा वापर केला जातो. यासाठी एक शिस्त,अनुशासन आणि स्वयंनियंत्रण असणे गरजेचे आहे. ‘अति खाणे मसनात जाणे’ याप्रमाणे त्याचे गंभीर परिणाम होतात. अनेक प्रकारे आपल्याला हानिकारक ठरू शकते; म्हणून आपली गरज आणि आवश्यकता ओळखून त्याचा नैतिकदृष्ट्या संतुलित व समुचित वापर करणे हितावह ठरेल.

## ४. डिजिटल तंत्रज्ञानाचे फायदे

सन २०१५ मध्ये भारत सरकारने ‘डिजिटल इंडिया’ हा उपक्रम सुरू केला. भारतात डिजिटल क्रांती घडवून आणून भारताला तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सशक्त बनवणे हा त्या मागचा मुख्य उद्देश होता. तो उपक्रम शहराबरोबर खेड्यापाड्यातील नागरिकांपर्यंत पोहोचविणे आणि त्यांना सक्षम बनवणे, हे उद्दिष्ट ठरविले होते. सक्षम समाज आणि ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेला रुपांतरित करण्यासाठी या उपक्रमांतर्गत पायाभूत सुविधा म्हणून ई-गव्हर्नर्स, डिजिटल साक्षरता वाढविणे, सर्व सरकारी सेवा ऑनलाईन करणे, इंटरनेट कनेक्टिव्हिटी सुधारणे, याचबरोबर शिक्षण, आरोग्य, बँकिंग आणि प्रशासन, या क्षेत्रांमध्ये खूप मोठ्या घडामोडी घडून आल्यात. देशाच्या आर्थिक विकासाला

गती मिळाली. आयटी क्षेत्रात रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. सरकारी कामे वेळेवर आणि पारदर्शक पद्धतीने होऊ लागले. युपीआय'सारख्या प्रणालीमुळे खेड्यापाड्यांपर्यंत बँकिंग सेवा पोहोचली. ऑनलाइन शिक्षणामुळे दुर्गम भागातील लोकांनाही आरोग्यसेवा आणि इतर ज्ञानविषयक माहिती मिळत गेली. त्यासंबंधित डिजिटल इंडियाचे नऊ स्तंभ दिलेले आहेत. जसे-

"१. **ब्रॉडबँड हायवे (Broadband Highways):** देशभरात उच्च गतीच्या इंटरनेटची सुविधा उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे.

२. **मोबाईल कनेक्टिव्हिटीचा सार्वत्रिक प्रवेश (Universal Access to Mobile Connectivity):** अजून मोबाईल नेटवर्क नसलेल्या सर्व गावांमध्ये आणि दुर्गम भागांमध्ये मोबाईल सेवा पोहोचवण्यावर भर.

३. **सार्वजनिक इंटरनेट प्रवेश कार्यक्रम (Public Internet Access Program):** नागरिकांसाठी कॉमन सर्व्हिस सेंटर्स (CSCs) आणि टपाल कार्यालयांना बहुउद्देशीय डिजिटल सेवा केंद्र म्हणून विकसित करणे.

४. **ई-गव्हर्नन्स – तंत्रज्ञानाद्वारे शासन सुधारणा (E-Governance):** डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे सरकारी सेवा अधिक सुलभ, पारदर्शक आणि कार्यक्षम बनवणे.

५. **ई-क्रांती (E-Kranti – Electronic Delivery of Services):** सर्व सरकारी सेवा नागरिकांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने उपलब्ध करून देणे.

६. **सर्वांसाठी माहिती (Information for All):** सरकारी माहिती व कागदपत्रे पारदर्शक आणि सहज उपलब्ध करून देणे.

७. **इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन (Electronics Manufacturing):** देशांतर्गत इलेक्ट्रॉनिक्स व तंत्रज्ञान हार्डवेअर उत्पादनाला प्रोत्साहन देणे.

८. **आयटी फॉर जॉब्स (IT for Jobs):** ग्रामीण व शहरी युवकांना आयटी आणि आयटी-संबंधित नोकऱ्यांसाठी आवश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण देणे.

९. **अर्ली हार्वेस्ट कार्यक्रम (Early Harvest Programmes):** डिजिटल इंडिया कार्यक्रमाचे फायदे लवकर दाखवण्यासाठी त्वरित राबवता येणाऱ्या प्रकल्पांचा संच."

**विशेषतः गेल्या काही वर्षांपासून इंटरनेट कनेक्टिव्हिटीमध्ये वाढ झाल्याने समाजाला डिजिटल तंत्रज्ञानाच्या आधारे माहितीचे स्त्रोत अधिक उपलब्ध झालेले आहेत. रोजगाराच्या संधी आणि ऑनलाइन शिक्षण याचे फायदेही अधिक झालेले आहेत. शेतीसारख्या क्षेत्रातही डिजिटल तंत्रज्ञानामुळे क्रांती घडून आलेली दिसून येते. सरकारी, निम-सरकारी, खाजगी डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे शिक्षण अधिक सुलभ झालेले आहे. आरोग्य अभियानविषयक माहिती समाजापर्यंत पोहोचविणे सहज शक्य झाले. डिजिटल तंत्रज्ञानामुळे समाजास परस्परांशी संवाद साधणे सुलभ झाले. सामाजिक आंदोलने, चळवळी यासाठी सोशल नेटवर्किंग आणि स्मार्टफोन यांचा वापर सर्रास केला जातो.**

**इंटरनेटमुळे जागतिकीकरणातील घडामोडी व्यवहारिक स्वरुपात जलद घडून येण्यास मदत झाली. व्यक्ती आणि कंपन्यांमध्ये**

**संवाद साधला गेला. उद्योगांना बाजारपेठांमध्ये प्रवेश मिळवणे सहज शक्य झाले. आर्थिक उत्पादकता वाढवण्यास चालना मिळाली. नवीन नोकरीच्या संधी मिळवण्यासाठी कौशल्ये विकसित करण्यास प्रगत तंत्रज्ञान उपयुक्त ठरले. याशिवाय** मुलांचे वाढणे, शिकणे आणि जोडणे यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करण्याकडे सरकारचा अधिक कल आहे. **अर्थातच विविध सेवांसह समाज सक्षम आणि आर्थिकदृष्ट्या समृद्ध बनविण्यास डिजिटल तंत्रज्ञान हे उपयुक्त ठरलेले आहे.**

डिजिटल तंत्रज्ञानामुळे पारंपरिक संप्रेषणपद्धती आणि माहितीची साठवणूक करण्यासाठी खर्च कमी येतो. नवीन कल्पना, उपक्रम आणि उपाय यांना प्रोत्साहन मिळते. अनेक कामे स्वयंचलित पद्धतीने केली जात असल्याने वेळ वाचतो आणि मानवी चुका कमी होतात. तसेच विविध क्षेत्रात प्रगती होते. त्याचे विशेष फायदे दिसून येतात. ते खालीलप्रमाणे-

"**१. कार्यक्षमता**: डिजिटल तंत्रज्ञानामुळे माहिती जलद गतीने प्रक्रिया करणे आणि शेअर करणे शक्य होते.

**२. सुलभता:** माहिती कुठूनही आणि कधीही मिळू शकते, त्यामुळे लोकांना एकमेकांशी जोडणे आणि सहकार्य करणे सोपे होते.

**३. किफायतशीर:** पारंपरिक संवाद आणि माहिती साठवण पद्धतींच्या तुलनेत खर्च कमी होतो.

**४. नवोन्मेष:** नवीन कल्पना आणि उपायांना प्रोत्साहन मिळते, ज्यामुळे विविध क्षेत्रांमध्ये प्रगती होते.

**५. स्वयंचलन:** अनेक कामे आपोआप (ऑटोमेशनद्वारे) केली जाऊ शकतात, त्यामुळे वेळ वाचतो आणि मानवी चुका कमी होतात.”

सोशल मीडियामुळे जगभरातील लोकांशी त्वरित संपर्क साधता येतो. डिजिटल साधनांमुळे ऑनलाइनपद्धतीने विविध कार्य करतांना कामांची पुनरावृत्ती कमी होऊन चुका टळतात आणि जलद गतीने काम पूर्ण होते. शिवाय व्यक्तीची कार्यक्षमताही वाढते. इंटरनेटमुळे लोकांना कोणत्याही विषयावर अमर्याद माहिती मिळते. गंभीर विचार, समस्या सोडवणे आणि सर्जनशीलता याविषयी नवीन कौशल्यविकास साधता येतो. उद्योजकांना ग्राहक समजून घेणे सोपे होते आणि व्यवसाय वाढतो. डिजिटल लॉकर आणि एन्क्रिप्शनमुळे ऑनलाइन व्यवहार अधिक सुरक्षित होतात. आरोग्यासाठी डिजिटल हेल्थकेअर आणि वर्क-लाइफ बॅलन्ससाठी तंत्रज्ञानाचा चांगला वापर होतो. शासकीय सेवा सहजपणे सामान्य नागरिकांपर्यंत पोहचविता येतात. शिक्षण व माहितीचा प्रसार वेगाने होतो, असे असले तरी त्याचे काही तोटेही आहेत. शासनाचे उत्तरदायित्व म्हणून स्वातंत्र्योत्तर काळापासून अनेक प्रकारची ध्येय-धोरणे ठरवून विकास योयना आखल्या. त्यांच्या फलश्रुतीसाठी समाजाला संबंधित साधने उपलब्ध करून दिलीत; त्याकडे समाजाची पाहण्याची दृष्टी, त्याचे उपयोजन आणि संरक्षण याबाबत जगरुकतेचा अभाव अधिक दिसून आलेला आहे. त्यामुळे साधनांची अधिक उपलब्धता असूनही सामाजिक वातावरण हरित व समृद्ध वाटत नाही. त्याचे गैरवापर केल्याने समस्या आणि उदासीनता निर्माण झालेली दिसते. डिजिटल तंत्रज्ञानाच्या बाबतीतही फार काही वेगळी स्थिती नाही.

## ५. डिजिटल तंत्रज्ञानाचे तोटे

मानवी जीवनात निर्माण केलेल्या गोष्टींचे केवळ फायदेच नाही, तर त्याबरोबर तोटेही असतात. डिजिटल तंत्रज्ञानाच्या बाबतीतही काही तोटे दिसून आलेले आहेत. त्यात गोपनीयता आणि सुरक्षिततेचा धोका निर्माण होतो. मानसिक आरोग्य बिघडते. व्यक्तीचा एकाकीपणा वाढून तो समूहापासून दूर जातो. चुकीच्या माहितीचा प्रसार होतो. सायबर गुन्हे घडतात. तसेच "डिजिटल तंत्रज्ञानाने आधुनिक जीवनात डेटा सुरक्षिततेचे प्रश्न, अधिकाधिक माहिती ऑनलाइन गोळा आणि शेअर केल्यामुळे गोपनीयतेच्या समस्या, तसेच लोक प्रत्यक्ष भेटण्याऐवजी डिजिटल साधनांद्वारे संवाद साधू लागल्याने सामाजिक दुरावा वाढणे, यांसारखे सामाजिक प्रश्न निर्माण झालेले आहेत. सततच्या डिजिटल कनेक्टिव्हिटीमुळे कामाचा ताण वाढतो, ऑटोमेशन वाढल्यामुळे नोकरीची असुरक्षितता निर्माण होते आणि डिजिटल साधनांचे व्यसन लागण्यासारख्या समस्याही निर्माण झालेल्या आहेत".

ऑनलाइन डेटामुळे वैयक्तिक माहिती धोक्यात येते. झोपेच्या समस्या वाढू शकतात. लोक डिजिटल उपकरणांमध्ये जास्त गुंतत असल्याने सामाजिक संबंध कमकुवत होतात. अफवा आणि चुकीच्या माहितीचा वेगाने प्रसार होत असल्याने समाजात गैरसमज पसरतात. लोकं मोबाईल आणि इंटरनेटचा सर्वात जास्त वापर करतात आणि समूहातून बाहेर फेकले जातात. ते व्हाट्सअप, फेसबुक ट्विटर, इंस्टाग्राम, टेलिग्राम, डेटिंग ॲप आणि युट्यूब यासारख्या सोशल मीडिया प्लेटफार्म्सचा अधिक वापर करतात. त्यात सर्वात जास्त

व्हाट्सअपचा वापर होतो. मनोरंजन, गप्पा-गोष्टी यामध्ये रिकामा वेळ घालविला जातो. त्यामुळे सामाजिक क्रयशक्ती वाया जाते, चिंता, नैराश्य आणि ताणतणाव वाढत जातात. शिक्षण व ज्ञान मिळवून आत्मिक, आर्थिक, व्यावसायिक विकासापेक्षा फाजील गोष्टी, स्त्री-पुरुष संबंध यात जास्त रमतात. एकमेकांना ब्लॅकमेल करून वाईट मार्ग अवलंबले जातात. या माध्यमावर जुळलेल्या पुरुषांकडून बऱ्याचदा स्त्रियांचे लैंगिक शोषण होते. तर कधी बदनामी केली जाते. तसेच स्त्रिया किंवा तरुणी ऑनलाइन सेक्सच्या नावाखाली पुरुषाला सामाजिक बदनामीचा धाक दाखवून त्याच्याकडून पैसे लुबाडतात. विवाहित स्त्रिया सतत ऑनलाइन राहिल्या की पती चारित्र्याचा संशय घेतो आणि कौटुंबिक हिंसाचार घडतो.

समाजमाध्यमावर स्त्रीचे किंवा स्त्री-पुरुष रिलेशनचे सादरीकरण अधिक होत असल्याने वापरकर्ते त्याकडे आकर्षण व गमतीने पाहतात. अशी संख्या युट्यूब वापर करणाऱ्यांची अधिक आहे. उदा. युट्यूबवरील ही ऑडीओ बुक समरीत सांगितले आहे की, “ दोस्तो जरा सोचिए हर दिन करोडो लोग google पर कुछ ना कुछ सर्च करते हैं। लेकिन क्या आपने कभी सोचा है कि सबसे ज्यादा सर्च की जाने वाली चीज क्या है? ना तो हेल्थ, ना बिजनेस, ना पढ़ाई बल्कि सेक्स। जी हां, दुनिया भर में हर सेकंड हजारों लोग कुछ ना कुछ ऐसा सर्च कर रहे हैं जिसे वह दूसरों से छिपाते हैं। लेकिन Google से नहीं।” भारतातील डिजिटल तंत्रज्ञानाचा विकास होत असतांना आपल्याकडील मिडियावरील अनुभवही काही वेगळे नाहीत. आपल्याकडेही सायबर गुन्हे घडण्याचे प्रमाण पाहिले आणि इंटरनेटचा वापर करणाऱ्यांचा शोध घेतला तर त्याबाबतचे

आकडे अधिक दिसून येतील. अर्थात लोकं शिक्षणातून ज्ञान व ज्ञानातून विकास, यापेक्षा अनावश्यक गोष्टीसाठी डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर जास्त करतात. त्यामुळे त्यांचा वेळ वाया जातो व उर्जा फालतू खर्च होते.

भारताला तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात स्वावलंबी बनवणे आणि सर्व सरकारी सेवा जनतेपर्यंत इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पोहोचवणे हा या मोहिमेचा उद्देश आहे; परंतु भारतीय जनता त्या दृष्टीने त्याकडे पाहतांना दिसत नाही. डिजिटल तंत्रज्ञानाचा गैरवापर अधिक होतांना दिसतो. पूर्वी लोकांना हव्या असलेल्या माहितीसाठी जाणकाराकडे जावे लागत होते. आता डिजिटल युगात त्यांना हवी असलेली माहिती एका क्लिकवर उपलब्ध होते. अधिकांश लोकं डिजिटल प्लॅटफॉर्म म्हणजे वासनांचा खेळ समजतात. पैसा लुबाडणं आणि कामोत्तेजक गोष्टींना प्राधान्य देणं, यास ते प्राधान्य देतात.म्हणजेच डिजिटल प्लॅटफॉर्म अलीकडे हे एक व्यसन बनलेले दिसते. तरी सोशल मिडियाने त्याच्या गंभीरतेची जाणीव समाजाला करून दिलेले आहे; पण ‘नळी फुंकली सोनारे इकडून तिकडे गेले वारे’ अशा सवयीने लोकं तिकडे दुर्लक्ष करतात. फार थोडे आहेत की, त्याचा बोध घेऊन स्वतःमध्ये बदल घडवून आणतात. मात्र बदलण्याची प्रवृत्ती आपल्याकडे नसल्याने साऱ्या प्रबोधनकारांचे श्रम वाया गेल्यासारखे वाटते. आपल्या मनाचेच ऐकले की असेच होते आणि होत आलेले आहे; म्हणून सुधारणावादी दृष्टी विकसित करणे, सर्वांगाने फायद्याचे असते.

*** *** ***

# २. सर्जनशीलता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता

सर्व प्राण्यांमध्ये मानव हा सर्वात बुद्धिमान मानला जात असून बुद्धीच्या बळावर त्याने प्राथमिक अवस्थेतून विकसित अवस्थेकडे वाटचाल केलेली आहे. त्याने आपल्या सभोवतीचे विश्व पाहत असतांना घडलेल्या घडामोडींचे आकलन करून त्यातून बोध घेतला आणि तार्किक पद्धतीने नवीन परिस्थितीशी जुळवून घेऊन समस्या सोडविण्याची मानसिक शक्ती विकसित केली; म्हणून अनुभवातून शिकणे आणि आपले सर्जनशील ज्ञान व माहिती नाविन्यपूर्ण तसेच प्रभावीपणे मांडणे, हे त्याच्या सर्जकतेचे गुण, कौशल्य व लक्षण बनले. त्यातून आज त्याने कृत्रिम बुद्धिमत्ताही(AI) विकसित केलेली आहे. त्यामुळे प्रथम त्याची सर्जनशीलता येते आणि कृत्रिम बुद्धिमत्तेला दुय्यम स्थान द्यावे लागते. मात्र आज तो एक पुरक आधार म्हणून AIचा वापर करीत असला तरी त्याच्या आहारी अधिक गेलेला आहे.

## ➢ सर्जनशीलता : संकल्पना आणि स्वरूप

'सर्जनशीलता' याला इंग्रजीत 'Creativity' असे म्हटले आहे. "सर्जनशीलता ही सर्वात वैशिष्ट्यपूर्ण मानवी गुणवैशिष्ट्य आहे; परंतु मानवी अस्तित्वातील सर्वात गूढ आणि धूसर पैलूही तीच आहे. आपण काही निर्माण करत असतांना आपण वर्तमान क्षणात खोलवर जिवंत असल्याची जाणीव होते; पण दुसऱ्या अर्थाने आपण जणू वर्तमानाच्या पलीकडे जगत आहोत असे वाटते. आजूबाजूला काय घडत आहे, याची जाणीव न राहता, भूतकाळातील नव्या

समजुती किंवा भविष्याच्या नव्या शक्यता विणत असतो.” अशी सर्जनशीलतेची संकल्पना मांडण्यात आलेली आहे. मानवाच्या बुद्धीचा एक पैलू म्हणून त्याकडे पाहिले जाते.

मानव हा विचारशील प्राणी असल्याने भाषेद्वारे सर्जनशील कौशल्याची क्षमता त्याने विकसित केलेली आहे. त्यामुळे सर्जनशीलता त्याचे विशेष गुणवैशिष्ट्य मानले जाते. ते नैसर्गिकरित्या बुद्धीचे कार्य असून समृद्ध अनुभवाशिवाय त्याच्या ठिकाणी सर्जनशीलता विकसित होत नाही. त्याच्या विचार आणि भावनांना नवे अर्थ देत तो नवीन निर्मिती करीत असतो, तेव्हा असे म्हणता येईल की, “अनेक प्रकारच्या बुद्धिमत्तेचा उपयोग करणे हे सर्जनशीलतेचे मुख्य गमक आहे, कारण त्यासाठी मेंदूच्या वेगवेगळया भागांवर काम करणे आणि त्यांचा वापर करणे आवश्यक असते. टॉरन्स यांच्या संशोधनानुसार सर्जनशीलता ही संवादकौशल्य, आकलन, ऐकणे, लेखन आणि वाचन या सर्व गोष्टींचा विचार करते. याशिवाय, सांस्कृतिक संदर्भ हा सर्जनशील विचार आणि उपक्रमांना प्रेरणा देण्यासाठी एक उत्कृष्ट माध्यम ठरतो.”

मानवाच्या मेंदूची रचनाच अशी बनलेली आहे की, त्याला कल्पक बुद्धीचा वापर करणे शक्य होते. काही तरी नावीन्यपूर्ण आणि उपयुक्त निर्माण करण्याची जिज्ञासा त्याच्या ठिकाणी नेहमीच राहिलेली दिसते. वेगवेगळया दृष्टिकोनातून विचार करून जीवनातील समस्या सोडविणे त्यामुळे त्याला शक्यही झालेले आहे. अनेक पदार्थजन्य वस्तूंचा शोध आणि कल्पनारम्य साहित्य व कलेची निर्मिती तो करू शकलेला आहे. कल्पक गोष्टीच्या आधारे नेहमीच्या वेगळया विचार व भावनांसह त्याचे अनुभव तो व्यक्त करतो. अमूर्त

कल्पनांना प्रत्यक्ष जीवनात उतरवितो. स्वतंत्रपणे विचार करून जटील समस्या सोडवितो. प्रयोगशील पद्धतीने काल्पनिक अशी अद्वितीय आणि आकर्षक नवीन कृती करतो. त्या नवनिर्मितीमुळे व्यक्तीची ओळख 'सर्जनशील' व्यक्ती म्हणून केली जाते. म्हणजेच त्याच्या ठिकाणी असलेल्या नवनिर्माण क्षमतेला सर्जनशीलता असे म्हणायला हरकत नाही. "मानवी जीवनातील प्रचलित विचार, संकल्पना, साधने व पद्धती यांच्या गुणधर्मांचा व वैशिष्ट्यांचा नवीन प्रकारे मेळ किंवा संयोग करून उपयुक्त पुनर्रचना करून आणि नाविन्यपूर्ण बदल घडवून आणण्याची क्षमता म्हणजे सर्जनशीलता." अशी त्याची व्याख्या केली जाते. त्यात आहे त्याला नवीन रूप देणे ही बाब महत्त्वाची ठरते.

अस्तित्त्वात असलेल्या नव्या कल्पना, नवे विचार, दृष्टिकोन, भावना व तर्क यांच्या आधारे नवे मार्ग, नव्या दिशा आखून प्रक्रिया व सिद्धांतांची फेरतपासणी केली जाते. अशी मानवाच्या ठिकाणी उपक्रमशील नवनिर्मिती करण्याची, अस्तित्त्वात आणण्याची किंवा 'मूळ' विकसित करण्याची ती एक शक्ती असते. तशाप्रकारच्या क्षमता असलेल्या निर्मात्याच्या कौशल्यपूर्ण शक्तीला सर्जनशीलता म्हणता येईल. त्यामुळे विचार आणि अभिव्यक्तीच्या आंतरिक प्रेरणा आणि कौशल्य वाढण्यास मदत होते.

सर्जनशीलता ही विशेषत: साहित्यिक-कलावंताच्या बाबतीत समजली जाते. साहित्याच्या बाबतीत सांगायचे झाले, तर त्याचे विविध प्रकार म्हणजेच कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र व आत्मचरित्र, हे सगळे सर्जनशीलतेचे अपत्य आहेत. 'स्व' आणि 'समष्टी' यांचा आविष्कार त्यातून केलेला असतो. याशिवाय जीवनाच्या सर्वच क्षेत्रात उपयुक्त व मूळ कल्पना शोधण्यासाठी

सर्जनशील विचार करणाऱ्या व्यक्तीही आहेत. अशा अनेक व्यक्ती जीवनातील मूळ विचारांना किंवा अनुभवांना कल्पनेच्या आधारे आकार देत नवनिर्मिती करतात. अर्थात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही सर्जनशीलता कार्य करीत असते. विशिष्ट स्वरूपाचे कार्य करण्यासाठी सर्जनशीलता ही आवश्यक मानली जाते. पूर्वज्ञानाने आकलनीय अशा गोष्टीबाबत विचार करणे, त्या गोष्टी समजून घेऊन माहितीवर प्रक्रिया करणे, यासाठी सर्जनशील क्षमता असावी लागते. ती कलावंत, साहित्यिक, विचारवंत व शास्त्रज्ञ यांच्या ठिकाणी दिसून येते. विविध साधनांच्या निर्मितीप्रक्रिया त्यात समाविष्ट असतात. या गोष्टी फक्त माणूस करू शकतो; म्हणून त्याला सर्जनशील प्राणी म्हटले आहे.

निर्मितीक्षमता हे सर्जनशीलतेचे मुख्य वैशिष्ट्य असून "भाषा निर्मिती ही माणसाची सर्जनशील कृती आहे. माणसाने कला निर्माण केल्या. गरजांच्या पूर्तीसाठी वस्तू किंवा साधने निर्माण केलीत. ही त्याच्या सर्जनशीलतेचीच खूण म्हणावी लागेल. कुटुंब, समाज, सामाजिक संस्था, सांस्कृतिक संस्था, शासनसंस्था यांची निर्मितीदेखील मनुष्यमात्राची सर्जनशीलतेचीच देण आहे." मानवी कृतीतून व्यक्त होणाऱ्या सर्जनशिलतेचा कलावंताच्या नवनिर्मितीशी जवळचा संबंध आहे. कल्पकतेची वैविध्यता, मौलिकता, लवचिकता, विस्तार आणि पुनर्व्याख्या असे तिचे स्वरूप असते.

सर्जनशीलता ही एक मानसिक प्रक्रिया असून त्यात कलावंताच्या ठिकाणी असलेल्या धारणा, त्याच्या विशिष्ट स्मृती आणि विचार यांचा समावेश असतो. त्या आधारे तो नवनिर्मिती करीत असतो. तेव्हा सांस्कृतिक जडणघडणीच्या काळापासूनच मानवाच्या ठिकाणी सर्जनशीलतेची शक्ती

होती, असे दिसून येते. कारण मानवी सर्जनशीलतेचे ठोस पुरावे तीन दशलक्ष वर्षांपूर्वीच्या आद्य दगडी अवजारांपर्यंत मागे जातात. मध्य-उच्च पाषाण काळात कला, विज्ञान आणि धर्माची सुरुवात झाली आणि आताच्या काळात पुन्हा एकदा सर्जनशीलतेची मोठी झेप दिसून येते. त्याचाच एक भाग म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता(AI) आहे.

## ➢ कृत्रिम बुद्धिमत्ता : संकल्पना व कार्य

बुद्धिमत्ता ही माणसाला निसर्गाने दिलेली फार मोठी देणगी आहे; परंतु अलीकडच्या काळात त्याच बुद्धीच्या बळावर त्याने तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रचंड प्रगती केलेली असून इलेक्ट्रॉनिक उपकरणाच्या साह्याने कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे artificial entelligence (AI) निर्माण करण्यात त्याने यश संपादन केलेले आहे.**“कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे यंत्रांना मानवांसारखे शिकण्याची क्षमता वर्णन करणारे अध्ययन क्षेत्र, तसेच विशिष्ट वर्तनांना प्रतिसाद देण्याची क्षमता, ज्याला (ए.आय.) असेही म्हणतात.” अशी कृत्रिम बुद्धिमत्तेची व्याख्या केलेली आहे.** ‘एआय’ हे मानवी बुद्धिमत्तेचे अनुकरण करणारे संगणकीय तंत्रज्ञान आहे. तो एक शिकवणारा आणि व्यक्तीच्या विनंतीला प्रतिसाद देणारा यांत्रिक नमुना आहे. माणसाप्रमाणे निर्णय घेऊन समस्या सोडविण्याचे विचार-पूर्वक असे स्वयंचलित कार्य करते. वापरकर्त्याची भाषा, त्याचे म्हणणे, त्याची मागणी, हे यंत्र ओळखते आणि अपेक्षित माहिती पुरवते. नॅरो AI, सामान्य AI आणि सुपर AI असे त्याचे प्रकार सांगितले आहे. त्या प्रत्येकाचे कार्य वेगवेगळे आहे.

‘कृत्रिम बुद्धिमत्ता’ ही मानवी सर्जनशीलतेचा पर्याय मानले जाते. विशेषतः जनरल AI मानवासारखी बुद्धिमत्ता वापरत असल्याने मानवाच्या विचारांना ती पूरक ठरते. मात्र मानवाच्या विचार, कल्पनाशक्ती, बौद्धिक क्षमता आणि भावना याला तोड राहणार नाही. कारण ‘कृत्रिम बुद्धिमत्ता’ ही मानवाच्या तर्क, कल्पना आणि विचारातून निर्माण झालेले एक यंत्र आहे; म्हणून मानवाला अग्रस्थानच राहणार आहे. कारण “एआय उत्तर देण्यापूर्वी ऑनलाइन शोध घेत असले तरी ते नेहमी बरोबरच असेल याची हमी नसते. ही गोष्ट कोणासाठीही नवीन नाही, कारण इंटरनेटवर प्रकाशित होणारी सर्व माहिती नेहमी अचूकच असते असे नाही.” प्राप्त माहितीचे तथ्य एआय’कडून शोधले जाते; परंतु इलेक्ट्रॉनिक उपकरणात माहितीचे अनेक स्त्रोत साठवलेले असल्याने त्यातून अचूक माहिती शोधून वापरकर्त्यापर्यंत अचूकपणे पोहोचवणे एआय’ला काही वेळेस शक्य होत नाही; म्हणून त्याने दिलेली माहिती ही खरी असेलच असे नाही. उदाहरणार्थ- आम्ही एक स्पर्धा परीक्षेसाठी एआय’कडून प्रश्नपत्रिका तयार केली आणि त्याची उत्तरपत्रिकाही घेतली, तेव्हा त्यात काही उत्तरे चुकीची निघाली होती. अचूक उत्तरासाठी मानवाचे ज्ञान आणि स्मरण हे उपयुक्त ठरते. त्याचा अभाव कोणत्याही यंत्रात असणे स्वाभाविक आहे, म्हणून एआय चुकू शकते.

कृत्रिम बुद्धिमत्ता ही एक संगणकीय प्रणाली असून त्यात अनेक स्त्रोत साठविलेले असतात. वापरकर्त्याचे भाषण ओळखणे, उपलब्ध स्त्रोतातील नमुने ओळखणे आणि निर्णय घेणे, हे मानवीबुद्धीप्रमाणे एआय कार्य करीत असते. त्यासाठी ‘मशीन लर्निंग’ हे मानवाप्रमाणेच पूर्वीच्या माहितीचा वापर करून

नवनवीन गोष्टी शिकतात आणि त्या आधारावर भविष्यातील अंदाज वर्तवतात. तर ‘डीप लर्निंग’ हा ‘मशीन लर्निंग’चा एक प्रगत उपप्रकार असून मानवी मेंदूच्या कार्यपद्धतीवर आधारित आहे. मानवी मेंदूतील चेतापेशींच्या (Neurons) जाळ्याप्रमाणे, ‘डीप लर्निंग’मध्ये अनेक स्तरांचे (Layers) नेटवर्क वापरले जाते. म्हणजे नैसर्गिक भाषा प्रक्रियासारखे हे तंत्रज्ञान वापरलेले असते. गुंतागुंतीच्या समस्या सोडवून विश्वसनीय असे योग्य निर्णय एआय घेते. तेथे साठवलेली माहिती सुरक्षित असल्याने अनेक क्षेत्रात त्याचा वापर केला जातो. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रात नेत्रदीपक अशी प्रगती झालेली दिसून येते.

एआय’मध्ये मजबूत शिक्षण देणारी मशीन लर्निंगची एक शाखा साधन म्हणून काम करते. तेथील प्रतिनिधी(Agent) त्याच्या वातावरणाशी संवाद साधून निर्णय घेण्यास शिकतो आणि हवी असलेली माहिती देतो. मात्र त्यावर पूर्ण अवलंबून राहणे मानवासाठी धोकादायक मानले जाते. जसे, “एआयच्या वापरामुळे समाजावर सकारात्मक व नकारात्मक अशा दोन्ही प्रकारचे प्रभाव पडतील. एआयच्या मदतीने आर्थिक वाढ व नाविन्यता साध्य करणे शक्य असले तरीही काही क्षेत्रांमधील नोकऱ्यादेखील गमवाव्या लागू शकतात.त्यामुळे कर्मचाऱ्यांना यासाठी प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. गोपनीयतेबाबत सर्वाधिक चिंता आहे, कारण एआय सिस्टम या प्रचंड मोठ्या वैयक्तिक डेटावर अवलंबून असतात.” असे त्याचे परिणाम सांगितले असून दैनंदिन कामकाज आणि उद्योगधंद्यांवर एआयचे परिणाम दिसून आले आहे. हे प्रभावी आणि सशक्त मध्यम असले तरी नैतिक व सामाजिक आव्हाने आणि

सुरक्षेशी संबंधित प्रश्न निर्माण होणार नाही, याची काळजी घेत त्याचा योग्य व माफक वापर करणे गरजेचे आहे.

## ➢ सर्जनशीलता आणि कृत्रिम बुद्धिमत्तेतील साम्य-भेद

सर्जनशीलता ही नैसर्गिक बाब असून त्यास पूर्णतः आव्हान देणे शक्य नाही. कारण माणसाला मेंदू असून जटील विचार आणि भावनांचे व्यवस्थापन तो करू शकतो. तर्क व नियोजन करून समस्या सोडवितो. त्यासाठी लागणारी क्षमता म्हणजे सर्जनशीलता ही मानवाजवळच आहे. वेदना, संवेदना, स्मृती याविषयीच्या भूमिका, क्रिया-प्रतिक्रिया सर्जनशीलरीतीने दिल्या जातात. व्यक्तीचे ज्ञान, बौद्धिक कौशल्य, विचारशैली, प्रेरणा आणि त्याचे व्यक्तिमत्त्व ही गुण-वैशिष्ट्ये त्याच्या सर्जनशीलतेशी जोडली जातात. त्याच्या प्रकटीकरणास त्याचे पर्यावरण महत्त्वाची भूमिका बजावत असते. अशीच प्रतिकृती त्याने एआयच्या माध्यमातून केलेली आहे. जसे, "सर्जनशील कल्पनांना पाठिंबा देणारे आणि त्यांना प्रोत्साहन देणारे वातावरण आवश्यक असते. एखाद्या व्यक्तीकडे सर्जनशील विचार करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व अंतर्गत साधने असू शकतात; परंतु योग्य वातावरणाचा आधार (उदा. त्या कल्पना मांडण्यासाठी व्यासपीठ) नसल्यास, त्या व्यक्तीतील सर्जनशीलता कदाचित कधीच व्यक्त होणार नाही." ही लक्षात घेतली तर सर्जनशील विचार करण्यासाठी मानवी मेंदू इतके अफाट किंवा प्रचंड असे अंतर्गत गुण किंवा

वातावरण एआय मशीनमध्ये निर्माण केले असले, तरी पर्यावरणीय पाठिंब्याशिवाय त्याची सर्जनशीलता प्रकट होऊ शकत नाही, असे माहितीचा स्त्रोत म्हणून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बाबतीतही दिसून येते. त्यास जेवढी माहिती भरविली जाईल तेवढेच कार्य ते करेल. मानवी सर्जनशिलतेचे तसे नाही. माहितीच्या पलीकडे जाऊन विचार व कल्पना करण्याची क्षमता फक्त मानवात आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता हे एक यंत्र किंवा साधन आहे. त्याला मन व भावना नाहीत. त्यामुळे ते स्वाभाविकपणे कल्पना करू शकत नाही. म्हणजे स्वतंत्र विचार आणि कल्पना त्याच्या ठिकाणी नाही. केवळ उपलब्ध स्त्रोतातून अचूक माहिती निवडण्याचे काम ते करते. त्यामुळे विविध क्षेत्रातील कार्यक्षमतेत वाढ होऊन कामकाजाच्या शैलीत गती आणि नाविण्यपूर्ण सुधारणा झाली आहे. वाहतूक, वित्त, आरोग्य आणि उद्योग व्यवसायाच्या कार्यक्षमतेत वाढ झाली आहे. त्याला योग्यरितीने हाताळले तर अपेक्षित परिणाम साधले जातात. ते स्वयंचलित असले तरी त्यावर माणसाचे नियंत्रण असते. मनुष्य हा स्वतःच स्वतःवर नियंत्रण ठेवतो. त्याच्या मन व भावनेनुसार तो कृती-कार्य करीत असतो.

मनुष्य सर्जनशील असला तरी आळशी व बेफिकीर असल्याने त्याच्या हातून होणाऱ्या चुका कृत्रिम बुद्धिमत्तेने टाळल्या गेल्या आणि कार्यपद्धतीला गती प्राप्त होऊन अचूकता अधिक निर्माण झाली. म्हणजे "कोणत्याही प्रकारचा डेटा प्रक्रिया करू शकणारे एकच एआय मॉडेल तयार करण्याची कल्पना ही कोणतेही दिलेले काम करू शकणारा प्रोग्राम तयार करण्याच्या विचारातून उदयास आली. भाषांतर करणे असो किंवा नवीन औषध तयार करणे असो,

एकच प्रोग्राम हे सर्व करू शकतो. या पद्धतीला आर्टिफिशिअल जनरल इंटेलिजन्स (AGI)असे म्हणतात.” त्यासाठी माहितीचे भांडार तेथे साठवून ठेवावे लागते. जसे माणसाच्या मेंदूत समृद्ध अनुभव असतात, तेव्हा सर्जनशीलता सक्रीय होत असते.

चांगल्या पद्धतीने काम करण्यासाठी एआय नमुना तयार करण्यात आला. त्या आधारे कोणत्याही प्रकारच्या माहितीवर प्रक्रिया करणे सोपे बनले. मात्र त्याचे पुनर्निरीक्षण व फेरतपासणी माणसालाच करावी लागते. त्याच्यावर नियंत्रण ठेवावे लागते. आपल्याला हवी असलेली अचूक माहिती मिळत नाही, तेव्हा त्याची निर्णय प्रक्रिया माणसालाच बदलावी लागते; म्हणून मनुष्याची सर्जनशीलता ही अंतिम ठरते. त्याला पुरक स्वरुपात कृत्रिम बुद्धिमत्तेची जोड आज दिली जात आहे. त्यामुळे मानवी जीवनशैलीत फार बदल दिसून येतो आहे. आर्टिफिशिअल जनरल इंटेलिजन्स माध्यमातून मानवी बुद्धिमत्तेच्या तुलनेत अधिक गुंतागुंतीचे आणि कठीण काम करणे सोपे झाले आहे; पण ते काम माणसाच्या कल्पक बुद्धीचे असून तो पडद्यामागचा नायक आहे. कारण कृत्रिम बुद्धिमत्ता ही त्याची निर्मिती व नक्कल आहे.

एकूणच सर्जनशिलता ही मानवाच्या अभिव्यक्तीचे एक रुप असून कल्पनाशक्ती आणि विचारप्रवर्तकता हे सर्जनशिलतेचे वैशिष्ट्य आहे. सर्जनशिलता ही नवीन आणि मौलिक वस्तू बनविणारी मानसिक शक्ती आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेने मानवी जीवन सोपे करून पूर्वीपेक्षा अधिक वेळ वाचवला असला, तरी मानवी कल्पकतेला अर्थात सर्जनशीलतेला ते क्षीण ठरवू शकते. एआय त्याच्या क्षमतेच्या बाबतीत मर्यादित आहे. मानवी बुद्धिमत्ता अमर्याद

आहे. एआय’ने नव्या माहितीवर प्रक्रिया केल्यानंतर त्याविषयी फिडबॅक द्यावा लागतो. कृत्रिम सामान्य बुद्धिमत्ता असलेले यंत्र मानवी बुद्धिमत्तेप्रमाणेच विस्तृतता आणि बहुमुखी प्रतिभा असलेल्या विविध समस्या सोडवू शकते. त्यामुळे आज एआय’ला फार महत्त्व दिले जाते.मात्र त्यावर अतिरिक्त प्रमाणात अवलंबून राहिले, तर मानवी सर्जनशीलतेला चालना मिळणार नाही. नव्या कल्पना आणि विचार सुचणार नाहीत. त्यामुळे बौद्धिक निष्क्रियता वाढू शकते. कारण ती एक निसर्गाची देणगी आहे. सर्जनशीलता सक्रीय राहण्यासाठी विचार आणि कल्पकतेला वाव देणे आवश्यक आहे. त्याच्या ऐवजी कृत्रीमतेवर अधिक अवलंबून राहिल्यास सर्जनशीलता सुस्तावल्यासारखी होईल.

*** *** ***

# ३. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सर्जनशील साहित्यनिर्मिती

अलीकडच्या काळात मानवी बुद्धीप्रमाणे सर्जनशील कार्य करण्याची एक संगणकीय प्रणाली विकसित केली गेल्याने संगणकशास्त्राच्या शाखेमध्ये अनेक प्रकारच्या तंत्रज्ञानाने खूप मोठी झेप घेतलेली आहे. त्यामुळे सध्या कृत्रिम बुद्धिमत्ता याचा फार मोठा बोलबाला सुरू आहे. त्यामध्ये माणसासारखेच समस्या सोडविण्याचे, नवीन विचार आणि कल्पना मांडण्याचे एक महत्त्वाचे साधन म्हणून 'कृत्रिम बुद्धिमत्ता'(AI) याकडे पाहिले जाते. पर्यावरणीय प्रभाव आणि अनुभव यातून मानवाच्या ठिकाणी असलेल्या सर्जनशील शक्ती जागृत होतात. त्यात तर्क, भावना, संवेदना, विचार व कल्पना, या गुणांमुळे तो नवनिर्मिती करतो, तेव्हा त्याचे सर्जनशील साहित्य उदयाला येत असते. असेच काहीसे कार्यदेखील कृत्रिम बुद्धिमत्ता करू शकते; पण त्यात पूर्णतः सर्जनशीलता किंवा अनुभवाची उत्कटता असतेच असे नाही. तरीही त्याचा प्रभाव सर्जनशील साहित्याच्या क्षेत्रावरही पडलेला दिसून येतो; म्हणून कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सर्जनशील साहित्यनिर्मिती यांचा परस्पर संबंध या ठिकाणी तपासून पाहता येतो.

### ➢ कृत्रिम बुद्धिमत्ता : संकल्पना आणि कार्य

इंग्रजीतील artificial intelligence(AI) याचा अर्थ कृत्रिम बुद्धिमत्ता असा आहे. माणसांसारखा विचार करून समस्या सोडविण्यासाठी निर्णय घेण्याची क्षमता असलेले ते एक यंत्र किंवा मॉडेल, अशी एआय’ची ओळख

दिली जाते. त्याची काम करण्याची पद्धत म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता, असे म्हणतात. अर्थात "कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे ते एक बहुउपयोगी तंत्रज्ञान आहे. वीजेसारखीच ती अनेक वेगवेगळ्या प्रकारे आणि अनेक परिस्थितींमध्ये वापरली जाऊ शकते. कृत्रिम बुद्धिमत्तेची एकच सार्वत्रिक मान्य व्याख्या नाही, पण ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीनुसार एआय म्हणजे "संगणक किंवा इतर यंत्रांची बुद्धिमान वर्तन करण्याची क्षमता". असे सांगितले आहे. याचा अर्थ असा की एआय प्रणाली मानवी मेंदूसारखा विचार करते, शिकते आणि कृती करते. काही बाबतीत मानवी क्षमतेलाही मागे टाकते. प्रचंड प्रमाणात माहितीचे विश्लेषण करू शकते. गुंतागुंतीच्या समस्या सोडवण्यासाठी योग्य निर्णय घेऊ शकते आणि सर्जनशील कामेही करते. आपण योग्यरितीने सूचना दिल्या की एआय मशीन तिच्याकडील माहितीच्या आधारे अपेक्षित नमुने शोधण्याचे काम करते. त्यामुळे आपल्याला हवे ते परिणाम साधता येतात.

एआय मशीनमध्ये मजकूर, प्रतिमा किंवा संख्यात्मक स्वरुपात आधीच माहिती संकलित करून एक आराखडा तयार केलेला असतो. त्याला काही आदेश दिले की, मानवी विचार व तर्काप्रमाणे निर्णय घेऊन माहितीचे विश्लेषण केले जाते. मानवाच्या मेंदूप्रमाणे तेथे तयार केलेले कृत्रिम आराखडे नमुने ओळखण्यासाठी प्रशिक्षित केले जातात. त्यामुळे माहितीचे विश्लेषण करण्यासाठी 'एआय' नमुना नवीन गोष्टींबाबत निर्णय घेऊ शकतो. चुका टाळण्यासाठी कार्यप्रणालीच्या नमुन्यामध्ये सुधारणाही केल्या जातात. अर्थात "कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) ही अशी तंत्रज्ञान आहे जी यंत्रांना मानवी बुद्धिमत्ता आणि संज्ञानात्मक क्षमता अनुकरण करण्यास सक्षम करते. AI चा उपयोग

निर्णय घेण्यास मदत करण्यासाठी, समस्या सोडवण्यासाठी आणि सामान्यतः माणसांकडून केले जाणारे काम करण्यासाठी केला जाऊ शकतो.” वेगवेगळे आवाज आणि प्रतिमा ओळखणे, मजकूर तयार करणे, याविषयीच्या सूचना देणारे ‘एआय’चे प्रतिनिधी कामं करतात. त्यात अनेक प्रकारचे तंत्रज्ञान वापरून मानवी बुद्धिमत्तेशी संबंधित कार्य करण्यास ‘एआय’ प्रणाली सक्षम बनविलेली आहे. त्याच्या पायऱ्या आणि टप्पे खालीलप्रमाणे आहेत.

१. सर्वात आधी तुम्हाला कोणती समस्या सोडवायची आहे हे ठरवावे लागते. उदा. फोटोमध्ये मांजर आहे का हे ओळखणे, विद्यार्थ्यांच्या गुणांवरून त्यांचा निकाल अंदाज लावणे, ग्राहकांच्या प्रश्नांना स्वयंचलित उत्तर देणे, समस्या जितकी स्पष्ट असेल तितका योग्य एआय मॉडेल तयार करणे सोपे जाते. २. अपेक्षित परिणाम म्हणजे एआयने काय आउटपुट द्यावे हे आधी ठरवावे लागते.उदा. “होय / नाही” असा परिणाम हवा आहे का?, टक्केवारीत अंदाज हवा आहे का?, मजकूर स्वरूपात उत्तर हवे आहे का? ३. प्रक्रिया न केलेली माहिती, आकडेवारी किंवा चिन्हांचा समूह म्हणजे ‘डेटा’ हा एआयचा पाया असतो. या तीन टप्प्यात योग्य आणि पुरेसा डेटा गोळा करतात. चुकीचा किंवा अपूर्ण डेटा काढून टाकतात, डेटा लेबल करता (उदा. मांजर / कुत्रा) व ट्रेनिंग, व्हॅलिडेशन आणि टेस्ट सेटमध्ये विभागता असे कार्य चालते.

डेटा जितका स्वच्छ आणि मोठा असेल तितका मॉडेलचा निकाल चांगला येतो.४.समस्येनुसार योग्य अल्गोरिदम आणि टूल्सची निवड करावी लागते. उदा. साध्या समस्यांसाठी: Linear Regression, Decision Tree, इमेजसाठी: CNN (Convolutional Neural Network),भाषेसाठी: NLP

मॉडेल्स, Transformers,तसेच Python, TensorFlow, PyTorch, Scikit-learn सारखी टूल्स वापरली जातात. ५. डेटा वापरून मॉडेलला शिकवले जाते.या वेळी मॉडेल पॅटर्न ओळखायला शिकते. चुका कमी करण्यासाठी अनेक वेळा ट्रेनिंग चालते. parameters आणि hyperparameters बदलले जातात. ६. टेस्ट डेटावर मॉडेल चालवून त्याची अचूकता, सुस्पष्टता, तपासली जाते. त्याच्या मोजमापासाठी अचूकता, आठवण(Recall) आणि F-१ स्कोअर हे मशीन लर्निंगमध्ये वापरले जाणारे एक कार्यप्रदर्शन मेट्रिक असून मॉडेल डेटाबेसवर किती चांगले कार्य करते,याचे मूल्यमापन करते, असे काही मेट्रिक्स वापरले जातात. जर निकाल अपेक्षेप्रमाणे नसेल तर सुधारणा करावी लागते. ७. एआय तयार करताना पहिल्याच प्रयत्नात परफेक्ट मॉडेल तयार होत नाही, तर त्यासाठी अधिक डेटा घ्यावा लागतो. वेगळे अल्गोरिदम वापरावे लागतात. hyperparameters बदलले जातात. feature engineering केले जाते. या प्रयोगांचे चक्र चालू ठेवून हवे तसे परिणाम मिळवता येतात. ८. मॉडेल तयार झाल्यावर ते ॲप, वेबसाईट किंवा एआय' प्रणालीमध्ये वापरासाठी ठेवले जाते. नंतर त्याला सतत अपडेट केले जाते. अशाप्रकारे समस्या समजून घेणे → डेटा तयार करणे → मॉडेल निवडणे → ट्रेनिंग → टेस्टिंग → सुधारणा → प्रत्यक्ष वापर. या पद्धतीने एआय मॉडेल तयार केले जाते.

एआय शक्ती-सामग्री(इनपुट)मध्ये वाच्य, श्राव्य आणि दृश्य स्वरुपात विविध स्त्रोताकडून मजकूर गोळा केला जातो. ते मशीन आपण दिलेल्या माहितीवर प्रक्रिया करते. अपेक्षित माहिती निवडून त्याचे वर्णन करते आणि

आपल्याला हवी ती गोष्ट पूर्ण करून देते. जटील नमुन्याचा वापर करून व्यक्तीच्या वर्तनातील परिणामाचा अंदाज लावते. त्यातील अल्गोरिदमचे नियम उपलब्ध माहितीच्या संचाशी समायोजन करतात. आपण दिलेल्या माहितीशी जुळवून घेऊन निकालाच्या अंतिम टप्प्यावर येतात. शेवटी त्याला नेमून दिलेल्या कामाचे मूल्यांकन केले जाते. म्हणजे एआय तंत्रज्ञान एक ‘माहिती संच’च्या आधारे वेगवेगळ्या घटकांना, कल्पनांना किंवा माहितीला एकत्र करून नवीन, सुसंगत आणि अर्थपूर्ण रचना तयार करते. एकूणच इनपुट, प्रक्रिया, परिणाम, समायोजन आणि मूल्यांकन अशा टप्प्या-टप्प्याने एआय तंत्रज्ञान म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता कार्य करीत असते. संगणकातील सॉफ्टवेअरमुळे जलद, सोपे व अचूक काम करण्यासाठी साधनांचा (टूल्स) वापर केला जातो. त्यात ChatGPT, Google Bard / Google Gemini, Google Claude, Microsoft Copilot – Windows / Office, Wikipedia, DeepSeek / Perplexity AI, QuillBot, Deshtak, Grammarly, Copysmith / Jasper / WriteSonic, Reddit, Canva AI आणि CapCut अशाप्रकारचे अनेक साधनं (टूल्स) वेगवेगळ्या कामासाठी वापरले जातात. त्या माध्यमातून लेखन, शोध, नक्षीकाम, छायाचित्रण, संभाषण आणि भाषेच्या माध्यमातून सूचना देणे इ. कामे केली जातात. मनुष्य त्याच्या बुद्धीचा ज्या ज्या प्रकारे वापर करतो, त्या त्या प्रकारची नक्कल करण्यासाठी एआयसारखे मशीन तयार करून त्यात विविध विद्याशाखांच्या माहितीचे भांडार साठविलेले आहे. त्यात वेळोवेळी सुधारणाही केल्या जात आहे. तरीही नैसर्गिक सर्जनशीलते इतकी ती भक्कम असेल, असे नाही.

## ➢ सर्जनशील साहित्यनिर्मिती

कल्पकता आणि नवे विचार मंडण्याच्या प्रतिभा शक्तीमुळे मनुष्य हा सर्जनशील प्राणी आहे, असे म्हटले जाते. कोणत्याही क्षेत्रात तो नवनवीन गोष्टी निर्माण करीत असतो. कल्पनाशक्तीच्या बळावर तो रचनात्मक लेखन करतो. तसेच चित्र व शिल्प तयार करतो; म्हणून कला आणि साहित्याच्या बाबतीत त्याच्या प्रतिभाशील सर्जनशीलतेवर अधिक चर्चा केली गेलेली आहे. सर्जनशील लेखन म्हणजे अशी लेखनपद्धत असते की, त्यात बातम्या, कार्यालयीन लेखन किंवा अभ्यासाची टिपणे यांचा समावेश होत नाही. तर यात लेखक आपले स्वतःचे विचार, भावना आणि कल्पना मोकळेपणाने आणि रंजक पद्धतीने लिहितो. त्यातून कथा, कविता, कादंबरी, संवाद, नाटक इ. साहित्यनिर्मिती होते. ते सर्जनशील लेखन मानले जाते. त्यात कल्पकतेला पुरेपूर वापर केलेला असतो.

लेखकाने कल्पनारम्य पातळीवर त्याच्या भावना आणि विचार व्यक्त करून सर्जनशील साहित्य निर्माण केलेले असते. कादंबरी, कथा, नाटक, निबंध आणि कविता, यांसारख्या गद्य व पद्य स्वरूपातील साहित्यात वास्तव घडामोडीचे कल्पनाचित्र रंगवलेले असते. त्याआधारे कथानकाची रचना, पात्रचित्रण, घटना-प्रसंग याची नावीन्यपूर्ण मांडणी तो करतो. उत्कृष्ट भाषिक रचना करून वाचकांच्या डोळ्यासमोर मानसिक प्रतिमा उभ्या करतो. त्यामुळे सर्जनशील साहित्याची असामान्यता व दृश्यमानता वाचकांच्या भावना जागृत करतात आणि काळजाला हात घालतात; म्हणून ‘‘सर्जनशील लेखन म्हणजे कथा किंवा कल्पना निर्माण करण्याची कला. हे शैक्षणिक किंवा तांत्रिक

लेखनापेक्षा वेगळे असते. कारण त्यात सर्जनशीलता आणि वाचकांना गुंतवून ठेवण्यावर भर दिला जातो. याची व्याख्या विस्तृत असली तरी सर्जनशील लेखन मुख्यतः मौलिक आणि आत्मअभिव्यक्तीवर आधारित असते. त्याचा उद्देश मनोरंजन करणे आणि प्रेम, दुःख यांसारख्या मानवी अनुभवांना कथा किंवा कवितेद्वारे व्यक्त करणे हा असतो. यामध्ये एखादी भावना किंवा विचार व्यक्त करण्यासाठी कल्पनाशक्तीचा उपयोग केला जातो." अशी त्याची संकल्पना स्पष्ट केलेली आहे.

साहित्यातील पात्रचित्रण, कथानक, वातावरण, घटना, भाषिक रचना, जीवनविषयक दृष्टिकोन, कल्पनारम्यता आणि भावनिक आवाहन यांसारख्या सर्जनशील लेखनातून रंजक किंवा बोधक कलाकृती निर्माण होते. कविता, कथा, कादंबरी, नाटक, चित्रपट आणि दूरदर्शन पटकथा, गाणी, भाषणे, अशी निर्मिती एआय'देखील करू शकते. मात्र त्यात सर्जनशीलता कमी असते. साहित्यातील घटकद्रव्ये लेखकाने आवश्यकतेनुसार आणि त्याच्या संवेदनशील मनाने वापरलेले असतात. रहस्य, उत्कंठा, सुख-दुःख, आनंद, हर्ष याची अनुभूती तो त्यातून आणून देतो. वाचकांना त्याचा सौंदर्यास्वाद घेता येतो, तेव्हा सौंदर्यनिर्मिती हे सर्जनशील साहित्याचे मुख्य वैशिष्ट्य त्यात दिसून येते. "सौंदर्यनिर्मिती करणे ही सर्जनशील कृतीमागील प्रमुख प्रेरणा असते. व्यक्तीला किंवा कलावंताला जाणवलेला आशय जोपर्यंत सुटा सुटा व विस्कळीत स्वरूपात असतो तोपर्यंत त्यातून सौंदर्यकृती जन्माला येत नाही. कलावंत विस्कळीत आशयाचे एक सुसंघटित, एकात्मक रूप उभे करतो." एआय'च्या बातीत सांगायचे झाले, तर ते सुसंघटित आशयबद्ध रचना करते; परंतु त्यात

सौंदर्यकृती असतेच असे नाही. कारण मानवी जीवनाचे अनुभव नसल्याने त्याला कल्पकनेच्या पातळीवर जाता येत नाही.

लेखक वास्तव जीवनातील वेगवेगळ्या अनुभवांची वैशिष्ट्यपूर्ण रचना करून सर्जनशील साहित्यकृती निर्माण करतो. तेव्हा एखादी वस्तू, पदार्थ, व्यक्ती, घटना किंवा परिस्थिती, यांविषयीची संवेद्य अशी कल्पना किंवा विचार मांडण्याची क्षमता त्याच्याजवळ असते. त्यातून तो एक प्रवाही लय, ताल व गेयता त्याच्या कलाकृतीतून जाणीवपूर्वक साधत असतो. सामान्य माणसापेक्षा मौलिक स्वरूपाची कल्पना त्याच्या साहित्यकृतीतून मांडतो. त्यातील सारखेपणा किंवा तोच-तोचपणा तो टाळतो. समस्यापूर्तीसाठी त्याचा विस्तार करतो. रूढ मार्गाने विचार करण्यापेक्षा वेगळ्या दिशेने जाऊन विशिष्ट दृष्टिकोन किंवा संकल्पना याची मांडणी करतो. तेव्हा त्याच्या साहित्यकृतीतून जीवनाचे नवे रूप आकाराला आलेले दिसते. एआय मात्र आपण दिलेल्या विषयाची वर्णनात्मक मांडणी करते. त्यात साहित्यतत्त्व जाणवत नाही. सर्जनशील साहित्याची प्रयोगात्मता आणि साहित्यमूल्ये यांचा एआय’ला सुमेळ घालता आलेला आहे,असे दिसून येत नाही.

## ➢ सर्जनशील साहित्यनिर्मितीत कृत्रिम बुद्धिमत्तेचे योगदान

माणसाच्या प्रकट होण्याच्या पद्धती एआय’ला ओळखता येत असल्याने त्याच्या बुद्धी, भावना, विचार आणि कल्पनांची नक्कल ते करू शकते. त्यामुळे ‘डिजिटल साहित्य विश्व’ निर्माण झालेले आहे. सर्जनशील साहित्यनिर्मितीसाठी त्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे. एआय

आधारित साधने प्रभावीपणे कार्यरत असल्याने साहित्याचे विवध प्रकार ते निर्माण करते. मात्र एआय म्हणजे कोणी एक संपूर्ण व्यक्ती नाही की, त्याला मेंदू आहे. स्वतःच्या बुद्धीच्या कुवतीनुसार मन, भावना, विचार, तर्क आणि कल्पना आहेत. मानवाच्या मेंदूचे कार्य जसे चालते. तसे एआय'च्या अल्गोरिदममध्ये एक सामूहिक जाळे, एक संच असतो. त्यामुळे ते माणसाच्या मेंदूप्रमाणे नैसर्गिकरित्या कार्य करू शकत नाही; म्हणून सर्जनशील साहित्यनिर्मितीच्या बाबतीत त्याला काही मर्यादा आहेत. जसे, स्वरचित एक कविता त्याला देऊन ती कविता अधिक भावनिक बनवायला सांगितले, तेव्हा त्याने खालीलप्रमाणे त्याची रचना केलेली आहे. त्यात काव्य किती आणि रटाळता किती? किंवा त्याने तयार केलेल्या कवितेमध्ये सौंदर्य व आशयाची उत्कटता जाणवते का? त्याच्या काव्यातील भावानोत्कटता किती? याची तुलना आपण करू शकतो. जसे,

**'स्वरचित कविता'**

एक उम्मीद घेऊन चालत होता
एकटाच काटेरी रस्त्याने
सगळ्यांनीच पाहिले तेव्हा
बापाला अनवाणी पायाने

पाय भाजले आणि रक्ताळले
पण पाहणाऱ्यांच्या डोळ्यात
कधी पाणी नाही आले

ठोकरला तर सगळेच हसले

कोणीतरी, केव्हातरी येईल
डोळे मिटून आणि.....
पाठीवर हात ठेवून म्हणेल,
भिऊ नकोस. मी आहे ना.....

पण ते हातच आले
रिकामी झोळी घेऊन
फाटकी आणि तुटकी
बापाच्या नशिबाची बनली
करुण कहाणी पुटकी

उजेडाची आशा बाळगून
उगीच चालत राहिला
एकटा अंधारल्या वाटेनं
पण दर्शन दिलंच नाही
ढगाआड लपलेल्या चंद्रानं

मृगजळाच्या मागे धावला

डोळ्यात स्वप्न घेऊन
निराशा फेकून चालत राहिला
तोच त्याचा स्वतःला होऊन"

chatGPT टूल्सच्या आधारे एआय'ला अशाच व्यक्तीच्या बाबतीत भावनिक कविता तयार करायला सांगितले होते. तर त्याचे उत्तर खालीलप्रमाणे आहे.

"खूप सुंदर आशय आहे या कवितेत. मी ती अधिक भावनिक, वेदनांनी भरलेली आणि प्रवाही अशी थोडी सजवून मांडतो, पण मूळ भावना तशीच ठेवतो-

एक उम्मीद उराशी धरून
तो चालत होता…
एकटाच, काटेरी रस्त्याने,
अनवाणी पायांना फोड,
आणि हृदयाला घाव देत.
सगळ्यांनी पाहिलं होतं त्याला,
बापाला रस्त्यावर झिजताना,
पाय भाजले, रक्त सांडलं,
पण पाहणाऱ्यांच्या डोळ्यांत
एक थेंबही पाणी नव्हतं.
ठेचकाळला…
तर सगळे हसले,

त्याच्या वेदना जणू तमाशा झाल्या,
दुखणं माणसाचं नव्हेच,
असं मानून सगळे पुढे गेले.
तो वाट पाहत राहिला —
कोणीतरी, केव्हातरी येईल,
डोळे मिटून पाठीवर हात ठेवेल,
आणि अलगद म्हणेल,
“भिऊ नकोस… मी आहे ना.”
पण आले ते हात,
रिकाम्या झोळीचे…
फाटकी, तुटकी,
त्याच्याच नशिबासारखी,
करुण कहाणीची पुटकी.
मृगजळामागे धावत राहिला,
डोळ्यांत स्वप्नांची धग घेऊन,
निराशा पायाखाली तुडवत,
स्वतःसाठीच जगत राहिला,
स्वतःलाच हरवत.
उजेडाची आशा उराशी धरून,
उगीचच चालत राहिला,

एकटा, अंधारलेल्या वाटेने…

पण दर्शन दिलंच नाही,

ढगाआड लपलेल्या चंद्राने.”

डॉ. दीपक सूर्यवंशी यांनी या दोन्ही कवितांचे अवलोकन करून सांगितले की, “पहिली कविता छान आहे. दुसरी कविता गद्यात जास्त आढळते.” तर प्रा. विजय तायडे यांनी “पहिल्या कवितेत कवितेची सारी बंधने पाळली आहे. पहिली कविता लयीत वाचता येते. ती कडव्यामध्ये आहे.” असा अभिप्राय दिलेला आहे. अर्थातच सर्जनशिलतेच्या बाबतीत एआय मनुष्याच्या कल्पक बुद्धीप्रमाणे ताल, लय व गेय स्वरुपाचे रचनात्मक कार्य करू शकत नाही. शेवटी कृत्रिम ते कृत्रिमच असते. शास्त्रीय वस्तुनिष्ठ माहितीसाठी AI चांगले माध्यम आहे; पण सर्जनशील साहित्यनिर्मितीच्या बाबतीत सौंदर्यानुभूती येत नसल्याने ते खात्रीशीर वाटत नाही. मनुष्य जे सर्जनशील साहित्य निर्माण करू शकतो, ते कृत्रिम बुद्धिमत्ता करू शकत नाही. ती केवळ विचारलेल्या प्रश्नांची वर्णनात्मक उत्तरे देऊ शकते; म्हणून स्वतःचे मन, भावना, विचार, फिलिंग आणि कल्पना नसल्याने तिच्याकडून सर्जनशील साहित्याच्या निर्मितीची अपेक्षा करणे चुकीचे ठरेल. एकूणच मानवी बुद्धिमत्ता अगाध असून त्याच्या भावना व कल्पना ‘जे न देखे रवी, ते देखे कवी’ अशा असतात. मानवाची बुद्धी कलागिरी करते, तर कृत्रिम बुध्दिमत्ता कारागिरी करते. त्यामुळे त्यात सर्जनशीलता कमी आढळते. एआय मानवी बुद्धीप्रमाणे नक्कल करून सर्जनशील साहित्य निमार्ण करते; परंतु त्यात कलात्मकता नसते. एआय’च्या सर्जनशील साहित्य निर्मितीच्या बाबतीत उत्कट मन, भावना आणि जीवनविषयक चिंतनशील दृष्टिकोन मांडण्यास मर्यादा

पडतात. साहित्यनिर्मिती ही मानवी सर्जनशीलतेशी निगडित असून अनुभवाच्या पातळीवर कल्पना, विचार, भावना आणि विशिष्ट दृष्टिकोन त्यात अधोरेखित केलेले असतात. एआय संगणकीय तंत्रज्ञान असून केवळ माहिती प्रक्रिया करणारे साधन आहे. ते सर्जनशील लेखन करणारे साधन बनले तरी त्यात कलात्मकता नाही. एआय'ला सांगितल्याप्रमाणे ते भाषा समजून घेऊन शिकते, निर्णय घेते आणि मानवी बुद्धिमत्तेप्रमाणे संबंधित कार्ये करते. त्यामुळे साहित्यनिर्मिती शक्य झाली आहे. मात्र त्यातून सौंदर्यरचना जाणवत नाही. एआय प्रणाली दिलेल्या शब्दसंचाच्या द्वारे सर्जनशील साहित्याची शैली आणि अलंकारिक भाषा वापरू शकते. गद्य साहित्यातील पात्रे, घटना-प्रसंग, भाषा आणि कथानकाची रचना एआय करू शकते; पण त्याला संवेदनशीलरीतीने त्याची मांडणी करता येईल, असे नाही. ते केवळ मानवी बुद्धिमत्तेला पुरक असे साधन आहे.

*** *** ***

# ४. मानवी आणि कृत्रिम बुद्धिमत्तेतील साम्य-भेद

जॉन मॅकार्थी या अमेरिकन संगणक शास्त्रज्ञाने प्रथम म्हणजे१९५६ साली कृत्रिम बुद्धिमत्तेची संकल्पना मांडली होती. मात्र ॲलन ट्यूरिंग यांनी ‘ट्यूरिंग मशीन’च्या द्वारे संगणक कसा कार्य करतो, याची सैद्धांतिक मांडणी करून ज्याच्या मदतीने मशीनला मानवी बुद्धिमत्तेसारखी वागणूक आहे का हे तपासले गेले; म्हणून कृत्रिम बुद्धिमत्ता, संगणक विज्ञान आणि गणित या क्षेत्रांमध्ये त्यांचे योगदान अतिशय महत्त्वाचे मानले आहे. आजच्या आधुनिक संगणक आणि एआय तंत्रज्ञानाची पायाभरणी त्यांच्या कार्यामुळे झाली, असे सांगितले जाते. सध्या तंत्रज्ञानाचे युग चर्चेत असून कृत्रिम बुद्धिमत्तेने सगळ्यांना भुरळ घातलेली आहे. केंद्रस्थानी आहेत. मानवाची बुद्धी ही जैविक निर्मिती असून नैसर्गिकरित्या भावनिक,वैचारिक आणि काल्पनिक अगाधता त्यात असते. ती सामाजिक घटकांनी प्रभावित आणि नियंत्रित असते. याउलट कृत्रिम बुद्धिमत्ता संगणकीय अल्गोरिदम, डेटासेट आणि गणनशक्तीवर आधारित असते. मानवाच्या बुद्धीचे कार्य करण्याची आज्ञावली तिला दिलेली असते. त्यानुसार ती स्वयंचलीत कामे करत असते. ती एक मानवनिर्मित संगणकीय प्रणाली असून शिकणे, निर्णय घेणे, नमुने ओळखणे आणि समस्या सोडवणे यांसारखी तिची रचना केलेली आहे. ती सर्व कार्यप्रणाली स्वयंचलित असून मानवी नियंत्रण त्यावर असते.

## ➢ मानवी बुद्धिमत्तेचे स्वरूप

मानव हा एक सजीव प्राणी असून त्याला रक्त व उती यांनी बनलेले शरीरावयव आहेत. त्यामुळे त्याला संवेदना होतात. तसे पंचेंद्रिये त्याला निसर्गाने दिलेले आहेत. त्यालाच ज्ञानेंद्रिये म्हटले जाते. त्याचे **डोळे** पाहण्यासाठी, **कान** – ऐकण्यासाठी, **नाक** – वास घेण्यासाठी,**जीभ** – चव ओळखण्यासाठी आणि **त्वचा** – स्पर्श जाणण्यासाठी असा उपयोग त्याला होतो. त्यांच्या आधारे तो त्याची बुद्धी चालवत असतो. म्हणजे मनुष्याला निसर्गतः बुद्धी प्राप्त झालेली असल्याने त्याच्या बुद्धिमत्तेला जैविक आधार असून त्याच्या मेंदूचे कार्य अधिक महत्त्वाचे असते. ते पुढीलप्रमाणे सांगता येईल की, "**१. विचार करणे** – विचार, समज, निर्णय घेणे,**२. स्मरणशक्ती** – गोष्टी लक्षात ठेवणे,**३. ज्ञानेंद्रियांची माहिती घेणे** – डोळे, कान, नाक, जीभ, त्वचा यांच्याकडून आलेली माहिती समजून घेणे,**४. हालचाल नियंत्रित करणे** – चालणे, धावणे, लिहिणे, बोलणे यावर नियंत्रण ठेवणे,**५. भावना नियंत्रित करणे** – आनंद, दुःख, राग, भीती,**६. शरीराचे संतुलन ठेवणे** – उभे राहणे, बसणे यामध्ये मदत करणे आणि **७. स्वयंचलित क्रिया नियंत्रित करणे** – श्वास घेणे, हृदयाचे ठोके, पचन प्रक्रिया", यामुळेच मेंदूला शरीराचा "कंट्रोल रूम" असे म्हटले जाते. तो शरीरातील सर्व कामे चालवतो आणि आपल्याला विचार करायला, लक्षात ठेवायला आणि हालचाल करायला मदत करतो. ती त्याची बुद्धी म्हणून आपण त्याकडे पाहतो. सर्वांची बुद्धी मात्र एक सारखी नसते. कारण मानवी बुद्धिमत्ता मेंदूतील न्यूरॉन्स, सिनॅप्स, रसायनिक संदेश आणि

अनुभवनिष्ठ शिक्षणावर आधारित असते. ती अनुकूलनक्षम (adaptive) आणि संदर्भावर आधारित असून प्रत्येकाकडे भिन्न रुपात आढळते. भावनिक बुद्धिमत्ता ही मानवी निर्णय प्रक्रियेचा महत्त्वाचा भाग आहे. यामध्ये व्यक्ती सहानुभूती, नैतिकता आणि सामाजिक संदर्भ समजून घेऊन भावनिक निर्णय घेतो. कल्पनाशक्ती, कला, साहित्य आणि वैज्ञानिक शोध यामुळे त्याची सर्जनशीलता सिद्ध होते. एआयला मात्र अजूनही मानवाच्या बुद्धीप्रमाणे पुनरुत्पादन करणे शक्य झालेले नाही. त्याला जेवढे प्रशिक्षण दिले जाते, तेवढेच काम ते मॉडेल करीत असते.

➢ **कृत्रिम बुद्धिमत्तेचे स्वरूप**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बाबतीत ‘मशीन लर्निंगमध्ये’ व ‘डीप लर्निंग’, **न्यूरल नेटवर्क्स व** इंटेलिजेंट मशीन्स, ही तंत्रे महत्वपूर्ण ठरलेली आहेत **आर्थर सॅम्युअल** यांनी प्रथम १९५९ ला ‘मशीन लर्निंगची’ संकल्पना मांडली होती. मात्र हे कृत्रिम बुद्धिमत्तेचे एक अप्लिकेशन असून संगणकात एक प्रोग्राम टाकला जातो, वापरकर्त्याला हवे ते काम त्याद्वारे केले जाते. मशीन लर्निंगमध्ये संगणक डेटासह कार्य करतात त्यातून माहिती समजून घेतात व योग्य परिणाम दर्शवतात. पाहिजे त्या फोटोला चांगले बनवण्यासाठी आधी लाखो फोटोंचे विश्लेषण करते, त्यानंतर त्या ज्ञानाचा वापर करून तुमचा हवा तो फोटो एडिट करते. आपल्या आवडीच्या संगीताची शिफारस करण्यासाठी मशीन लर्निंगचा वापर करतात. आपण अनेकदा ऐकत असलेली गाणी मशीन लर्निंग पाहते, त्याचा पॅटर्न समजून घेते आणि तशाच प्रकारचे संगीत आपल्या आवडत्या विभागात दाखवते. मशीन लर्निंग अल्गोरिदम ईमेलच्या सामग्रीचे(content) विश्लेषण

करतात. वास्तविक आणि नको असलेले संदेश यातील फरक करून इनबॉक्स स्वच्छ ठेवण्यासाठी मशीन लर्निंग फिल्टर काम चांगले करते. म्हणजे वापरकर्त्यांच्या कृतींवरती आणि आवडीनिवडी वरती लक्ष ठेवून असतात.

२०१० पासून संगणकीय शक्ती वाढल्यामुळे सखोल शिक्षणाची तंत्रे व्यवहार्य बनली आणि 'डीप लर्निंग' क्रांती घडून आली. त्यामुळे संगणक दृष्टी, नैसर्गिक भाषा प्रक्रिया आणि इतर क्षेत्रांमध्ये लक्षणीय प्रगती झाली. मशीन लर्निंग अनेक सॉफ्टवेअर ॲप्लिकेशन्ससाठी अविभाज्य बनले. २०२० पासून जनरेटिव्ह एआयचा व्यापक प्रभाव पडत गेला. हा जनरेटिव्ह एआय म्हणजे 'आर्टिफिशियल इंटेलिजेंसचा एक उपसंच आहे'. जो केवळ नमुने ओळखण्याऐवजी किंवा पूर्वनिर्धारित नियमांवर आधारित निर्णय घेण्याऐवजी नवीन, मूळ सामग्री तयार करण्यावर लक्ष केंद्रित करतो. पारंपरिक एआय मॉडेल्सच्या विपरीत, जनरेटिव्ह मॉडेल्स मजकूर, प्रतिमा किंवा इतर सर्जनशील अभिव्यक्तींसह नवीन आउटपुट तयार करण्यात उत्कृष्ट कामगिरी करतात.

**न्यूरल नेटवर्क्स** हा एक प्रकारचा आर्किटेक्चर असून तो मशीन लर्निंगमध्ये वापरला जातो, मानवी मेंदूद्वारे प्रेरित होऊन ह्याची रचना तयार झाली आहे. मानवी मेंदू जसा काम करतो,तसा तो माहिती घेतो आणि एकमेकांशी जोडलेल्या स्तरांच्या पॅटर्नद्वारे त्यावर प्रक्रिया करतो,तेव्हा त्याला प्रतिमेतील वस्तू आणि दृश्ये ओळखता येतात. एकूणच **कृत्रिम बुद्धिमत्ता (AI)** ही सर्वात व्यापक अशी संकल्पना आहे. फोटोंना समजून घेण्याची आणि त्यावर प्रतिक्रिया देण्याची एकूण क्षमता एआय दर्शवते. एआय मॉडेल व्यक्तीचे फोटो पाहू शकतो आणि त्यात तुम्ही आहात की नाही?, हे सांगू शकतो. तसेच स्थान

काय असू शकते ? आणि चित्रात आणखी कोण व्यक्ति आहेत? हेही ओळखू शकते. **मशीन लर्निंग** हे एआय साध्य करण्यासाठी हा एक विशिष्ट दृष्टीकोन (Approach) आहे. येथे AI मॉडेल भूतकाळातील अनुभवांमधून शिकून मशीन लर्निंग अल्गोरिदम वापरून माहिती पुरवतो. आणि त्याची वर्गवारीही करतो. हे त्यांना फोटोंमधील नमुन्यावरून ओळखण्यास मदत होते आणि सामग्रीबद्दल शिक्षित अंदाज लावून देते.**न्यूरल नेटवर्क्स** हे मशीन लर्निंगमध्ये वापरले जाते. मानवी मेंदूद्वारे प्रेरित होऊन ह्याची रचना तयार झाली आहे. त्या त्या फोटोमधून रंग, आकार इ.ची माहिती घेऊन एकमेकांशी जोडलेल्या स्तरांच्या पॅटर्नद्वारे त्यावर प्रक्रिया करतो आणि वेगवेगळया प्रतिमा व दृश्ये ओळखतो. **डीप लर्निंग** हे मशीन लर्निंगचे एक उपक्षेत्र असून अनेक स्तरांसह जटिल (Complex) न्यूरल नेटवर्क वापरते. डीप लर्निंगमुळे फोटोंमधील अधिक गुंतागुंतीच्या किचकट माहितीवर प्रक्रिया केली जाते. सखोल शिकण्याच्या दृष्टीकोनातून ते केवळ वस्तू ओळखत नाहीत तर त्यांच्यातील संबंधदेखील ओळखते.

### ➢ मानवी आणि कृत्रिम बुद्धिमत्तेतील साम्य-भेद

मानवी बुद्धिमत्ता ही नैसर्गिक तिच्याद्वारे सहज प्रवृत्ती प्रकट होतात, तर कृत्रिम बुद्धिमत्ता ही मानवाने बनवलेले मशीन किंवा मॉडेल आहे. माणसाच्या मेंदूच्या कार्याप्रमाणे कृत्रिम बुद्धिमत्ता बनविली गेली आहे. त्यामुळे दोन्ही बुद्धिमत्तेमध्ये शिकण्याची क्षमता असून निर्णय घेणे आणि समस्यांचे निराकरण करणे हे गुणवैशिष्ट्ये त्यांच्या ठिकाणी आहेत; परंतु मानवी बुद्धिमत्ता ही अनुभवाचे आणि निरीक्षणाचे स्वतःच्या पद्धतीने विश्लेषण करीत असते. कृत्रिम

बुद्धिमत्ता मात्र अल्गोरिदम आणि प्रशिक्षण प्रक्रियेच्या आधारे शिकत असते. तिला जेवढे आदेश दिलेले असतील किंवा तिच्यासमोर जो माहितीचा स्रोत असेल, त्यावरच ती कार्य करू शकते आणि उपलब्ध माहितीचे विश्लेषण करून समस्या सोडवणे तिला शक्य होते. मनुष्य मात्र तर्काच्या आधारे अशक्य ते शक्य करू शकतो.

कृत्रिम बुद्धिमत्तेला स्वतः अनुभव घेता येत नाही. मानवाकडे तर्कशुद्ध कल्पकता असल्याने तो अनुभवातून सर्जनशील विचार करू शकतो, तेवढी विचार करण्याची क्षमता एआयकडे पुरेशी असेलच असे नाही. ते मॉडेल केवळ माहितीची विश्लेषण करून उपाय सुचवते. मात्र माहितीवर आधारित निर्णय घेणे हे दोघांमध्ये साम्य आहे. माणूस परिस्थितीनुसार भावनिक प्रकटीकरण करू शकतो, तशा भावना एआयकडे नसतात. त्याला पूर्वनियोजित नियम व माहिती दिलेली असते. त्याआधारे ते निर्णय घेते. मात्र दोघेही वेगवेगळे पर्याय निवडून निष्कर्ष मांडू शकतात. दोघेही त्यांच्या आजूबाजूच्या वातावरणातील नमुने ओळखतात. मनुष्याच्या ठिकाणी अमर्याद अनुभवाची खाण असते. गरजेनुसार त्याचे स्मरण तो करतो. एआय संगणकीय संचामध्ये जेवढी माहिती साठवलेली असते, त्या आधारे त्याची स्मरणशक्ती म्हणजे मेमरी काम करते. मनुष्य त्याच्या स्मरणशक्तीच्या पलीकडे जाऊन कल्पनेने चित्र रंगवू शकतो, ही त्याला नैसर्गिक देणगी मिळालेली आहे.

मनुष्य हा भाषा वापर करतो. तसेच एआयच्या मॉडेलमध्ये ती भाषा समजून घेणे व प्रतिसाद देणे,असे एक तंत्र असते. त्यामुळे दोघेही संवाद साधू शकतात. दोघांमध्ये चुका दुरुस्त करण्याची आणि स्वतःमध्ये सुधारण्याची क्षमता असते. म्हणजेच दोन्हीही बुद्धिमत्ता शिकणे, विचार करणे आणि निर्णय घेणे, ही वैशिष्ट्ये आहेत. मानवी बुद्धिमत्ता संवेदनशील आणि सहानुभूती प्रकट करणारी असते. तर कृत्रिम बुद्धिमत्ता ही भावशून्य असते. दोघांना मिळणारी ऊर्जा ही

वेगवेगळी असते. मनुष्य नवीन आणि कल्पक विचार करू शकतो. तो थकतो. एआय थकत नाही. तो अविरत कार्य करतो. मात्र एआय नवीन विचार करून स्वतःहून कल्पना मांडू शकत नाही. कारण तो आज्ञानवलीचे नियम मोडत नाही. मनुष्य मोडू शकतो. एआयला केवळ उपलब्ध माहितीच्या आधारे काम करावे लागते. मनुष्य स्वतःहून परिस्थितीनुसार त्याचे नियम बदलू शकतो आणि परिस्थितीवर मात करतो. एआय मात्र संगणकीय प्रोग्राम आणि नियमाप्रमाणे बदलते. एकाच वेळी अनेक काम करते. विशिष्ट कामासाठी प्रभावी ठरते. माणसाचे निर्णय हे त्याच्यावर झालेले संस्कार,त्याची सांस्कृतिक मूल्ये आणि त्याच्या अवतीभवतीची परिस्थिती यावर अवलंबून असतात. एआयचे निर्णय सांख्यिकी आणि संभाव्यता यावर आधारित असतात. शेवटी मानवाने बनवलेली कृत्रिम बुद्धिमत्ता ही जैविक बुद्धिमत्तेला एक पर्याय आहे. कारण मनुष्याकडे असलेली सामान्य संवेदनशीलता आणि अंतर्गत, उपजत विचार व कल्पनाशक्ती कृत्रिम बुद्धिमत्तेच्या ठिकाणी असू शकत नाही. तिला ती पुरवावी लागते. मनुष्याकडे जैविक ज्ञानेंद्रिये असल्याने तो हवे तसे तसे विचार करू शकतो आणि प्रकट होतो. तसे कृत्रिम बुद्धिमत्तेला ते स्वातंत्र्य नसते. तिच्या टिकाणी वस्तुनिष्ठता असते. मनुष्याकडे विस्मरण आणि पूर्वग्रह असतात. एआय मानवी नियंत्रणाशिवाय काम करू शकत नाही. अचूक माहितीवर वेगाने काम करणे, हे एआय’ला शक्य होते. मात्र मनुष्याच्या आळशी स्वभावामुळे त्याच्या गतिशील कार्याला मर्यादा पडतात; म्हणून एआय’वर अधिक अवलंबून राहणे धोकेदायक आहे.

*** *** ***

# ५. साहित्य एकादमी पुरस्कृत निवडक कादंबऱ्यांमधील मानवीमूल्ये

व्यक्ती, पदार्थ किंवा वस्तू हे अनेक दृष्टीने महत्त्वाचे मानले जातात. त्यावेळी त्यांना एक मूल्य प्राप्त होते. वस्तू आणि पदार्थ याची किंमत ठरवली जाते, तशी माणसाचीही किंमत मापली जाते. माणसाच्या दैनंदिन जगण्यातील त्याच्या वागण्याच्या पद्धती, त्याचे चांगले-वाईट वर्तन याविषयी अंदाज केले जातात, तेव्हा त्याला मूल्य ही संकल्पना गृहीत धरली जाते. प्रत्येक व्यक्ती पूर्णपणे चांगली किंवा पूर्णपणे वाईट नसते. त्याच्या वागण्याने ज्या ईष्ट-अनिष्ट गोष्टी घडतात, तेव्हा त्याकडे मूल्य म्हणून पाहिले आहे. अशावेळी लेखक त्याच्या सभोवतीच्या व्यक्तीजीवनातील साहित्यातून बऱ्या-वाईट अनुभवाची मांडणी करतो, तेव्हा त्या साहित्यातून दोन्ही प्रकारच्या मूल्यांचे दर्शन घडते. या ठिकाणी सर्वोच्च मानले गेलेल्या साहित्य अकादमी पुरस्कृत मराठी कादंबऱ्यांमधील मूल्यांचे स्वरूप सांगता येईल.

- **मानवीमूल्य : संकल्पना, प्रकार व स्वरूप**

मानव जेव्हा स्थिर जीबन जगू लागला त्यावेळी त्याने सामाजिक व सांस्कृतिक जीवनाच्या संदर्भात चांगल्या-वाईट गोष्टींचा विचार करून मूल्यविषयक धारणा निश्चित केल्या. तसे कायदेही केले व आचारसंहिता ठरविल्या. त्यातून व्यक्तीच्या चारित्र्याबाबत त्याने व्यवहारिकदृष्ट्या चांगल्या-वाईट गोष्टी ठरविल्या. सकारात्मक दृष्टिकोन, विचार आणि वर्तन तसेच

सौहार्दपूर्ण मानवीसंबंध विकसित करण्यासाठी व्यक्तीचे वर्तन चांगले असावे; म्हणून नैतिक मूल्यांवर भर दिला. अनेक दार्शनिक, विचारवंत आणि समाजशास्त्रज्ञ यांनी व्यक्तीचे जीवन समृद्ध होण्यासाठी चांगली मूल्ये सांगितली. त्याला तसे वर्तन कण्यास भाग पडले आणि प्रोत्साहितही केले; परंतु व्यक्तीचे बदलणारे मन, त्याच्या भावना आणि त्याचे विचार हे समाजसापेक्ष असेलच असे नाही; म्हणून अपेक्षित असलेल्या चांगल्या मूल्यांबरोबर वाईट मूल्येदेखील त्याच्या वर्तनातून सिद्ध होत गेलेली आहेत. व्यक्तीचे वागणे म्हणजे त्याच्या मूल्यांबाबत अशी संकल्पना सांगितली आहे की, “श्रद्धा, तत्वे, अनुयायी, मानके जी व्यक्ती दैनंदिन व्यवहारात मार्गदर्शक तत्त्वे म्हणून पाळते. ही मानवी मूल्ये मानवी स्वभावाचा एक महत्त्वाचा भाग आहेत. या मूल्यांशिवाय मानव सुगंध नसलेल्या फुलासारखा असतो. व्यावसायिक नीतिमत्ता प्रामुख्याने या तत्वांच्या आधारावर बांधली जाते. सामाजिक दृष्टिकोनातून, ही मूल्ये म्हणजे परस्पर संबंध राखण्याच्या प्रकाशात व्यक्तींनी पाळलेल्या वर्तनात्मक पद्धतींचा संच आहे. सध्याच्या युगात, शांतता राखण्यात आणि समाजाचे रक्षण करण्यात मानवी मूल्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. मानवी मूल्यांना व्यावहारिक स्वरूपात स्थापित केल्याने समाजात नैतिकता टिकवून ठेवण्यास हातभार लागतो. मानवी मूल्यांना वैयक्तिक संबंधांशी जोडून, मनुष्य इतरांशी सुसंवाद साधू शकतो.”

माणसाचे माणसाशी असलेले वागणे किंवा व्यवहार सुखदायक व समाधान कारक असले की, ती माणसे मौल्यवान ठरतात. कारण “मूल्य म्हणजे व्यक्तीने काय केले पाहिजे याचे उत्तर होय. परंपरेला धरून एखाद्याच्या शारीरिक किंवा

मानसिक स्वास्थाला, समाजहिताला, समायोजनेला उपयुक्त ठरणारी मार्गदर्शक जीवनतत्त्वे म्हणजे मूल्य होय. पैशांपेक्षा श्रेष्ठ असे आदर्श विचार, तत्त्वे, आचरण आणि सद्‌गुण ज्यांत असतात, त्यांना मूल्य असे म्हणतात. जे विचार, तत्त्वे आचरण आणि सद्‌गुण हजारो लोकांना प्रदीर्घ काळ मार्गदर्शन करतात, त्यांच्या जीवनाचा आधार बनवतात, राष्ट्रजीवनाला प्रेरणा देतात, त्यांना मूल्य असे म्हणतात.”

सकारात्मक दृष्टिकोनातून जीवनाची वाटचाल करणे, हे माणसाच्या आयुष्याचे अंतिम ध्येय मानले गेले आहे. नैतिक-अनैतिकतेचे मापदंड तयार करून सांस्कृतिक सभ्यता म्हणून नैतिक मूल्यांना महत्त्व देण्यात आले आहे. वाईट मूल्ये टाळून उदात्त मूल्यांना प्रोत्साहन दिले गेले आहे; परंतु ही आदर्श समाजाची कल्पना आणि त्याची जाणीव प्रत्येकाच्या ठिकाणी असतेच असे नाही; म्हणून माणसाची स्वार्थी प्रवृत्ती आणि ज्याचे त्याचे दृष्टिकोन यानुसार इष्ट मूल्यांबरोबर अनिष्ट मूल्येदेखील व्यक्तीच्या ठिकाणी असतात. तात्काळ समाधान देणाऱ्या भौतिक सुख साधनांचा हव्यास असल्यामुळे स्वार्थासाठी व्यक्ती भ्रष्टाचारण करतो. तिच्या स्वार्थी व विनाशकारी हेतूमुळे समाजातील नैतिक जीवनाला बाधा पोहोचते आणि संघर्ष निर्माण होतो. म्हणजे सदाचार व अनाचार असे गुण व्यक्तीच्या ठिकाणी असतात. त्यास इष्ट-अनिष्ट मूल्ये म्हणून ओळखले जाते.

## ➢ मानवी मूल्यांचे प्रकार

'व्यक्ती तितक्या प्रकृती' ही म्हण लक्षात घेतली तर प्रत्येक माणसाचा स्वभाव, त्याची विचार करण्याची पद्धत, त्याचे जीवनविषयक दृष्टिकोन, त्याच्या आवडीनिवडी यामध्ये भिन्नता आढळून येते; म्हणून सगळेच माणसं वाईट नसतात किंवा सगळेच चांगले नसतात. त्यांच्या वागण्यावरून त्यांच्या ठिकाणी असलेली मूल्ये ही पारखली जातात. म्हणजे व्यक्तीच्या स्वभावामुळे इष्ट आणि अनिष्ट अशा दोन्ही प्रकारची मूल्य समाजामध्ये आढळून येतात.

## ➢ इष्ट मूल्ये

चरित्रसंपन्न व्यक्तिमत्व घडविण्यासाठी व्यक्तीवर चांगले संस्कार केले जातात. तेव्हा त्याच्या वागण्यातून आदर्श आणि उच्च अशी नैतिक मूल्य प्रकट होतात. सत्य, अहिंसा, प्रेम, सहिष्णूता, दयाळूपणा, करुणा, प्रामाणिकपणा, नि:स्वार्थता, क्षमाशीलता, मैत्रभाव, त्याग, सेवा, सहकार्य, समता, बंधुता, कर्तव्यनिष्ठा, माणुसकी, शिस्त आणि सहनशीलता अशी काही इष्ट मूल्ये मानली गेलेली आहेत. ते आदर्श गुणतत्वे असल्यामुळे त्या अनुषंगाने व्यक्तीच्या चारित्र्याची जडणघडण व्हावी, अशी समाजाला अपेक्षा असते."मानवीय मूल्य वे सिद्धांत और मानक होते हैं जो मानव जीवन को सार्थक, नैतिक और सामाजिक रूप से स्वीकार्य बनाते हैं। ये मूल्य व्यक्ति के आचरण, सोच और व्यवहार को दिशा देते." हा संदर्भ लक्षात घेता आजकाल समाजामध्ये त्या केवळ आदर्श कल्पना ठरलेल्या आहेत. कारण चांगल्या मूल्यांपेक्षा अनिष्ट मूल्यांची प्रचिती अधिक येते. माणसे

माणसांपासून दूर होत असून नुसती धावपळ करीत आहे. ते काय करीत आहेत,हेच त्यांना कळत नाही. शांत आणि स्थिर असण्यापेक्षा आतून अस्वस्थ आहेत. फक्त मिळवणे, पण त्यासाठी काही मूल्यव्यवस्था आहे,याचे भान त्यांच्याकडे नाही; म्हणून अनिष्ठ मूल्ये वाढलीत. मानवी जीवनावर त्याचे परिणाम होतांना लेखकांनी शब्दबद्ध केलेले आहेत.

### ➢ अनिष्ट मूल्ये

माणसाचे वागणे लोकांच्या हिताचे किंवा समाजाच्या अनुकूल नसेल तर त्याचे दोष काढले जातात. त्याच्या दोषयुक्त वागण्यातून अनिष्ट मूल्ये प्रकट होतात. त्यांच्यातील विनाशकारी मूल्यांमुळे व्यक्ती किंवा समाजाला नुकसान पोहोचते. त्याची स्वार्थी कृती आणि नकारात्मक भूमिका ही नैतिकतेच्या विरोधात मानली जाते. त्याचा लोभीपणा, खोटारडेपणा, चोरी, लबाडी, गुन्हेगारी, हिंसक प्रवृत्ती, राग-द्वेष, यांमुळे त्याचे भ्रष्ट आचरण दिसून येते. अर्थातच नीती-नियम आणि सदाचाराची पर्वा न करता मानवतेविरोधी केलेले कृत्य हे अनिष्ट मूल्य म्हणून ओळखले जाते. गेल्या काही दशकांपासून अनिष्ट मूल्ये समाजात प्रभावी ठरत गेलेले आहेत. “अलीकडे वर्तमान पत्र उघडताच मन विषन्न करणाऱ्या बातम्या पहावयास मिळतात. यामध्ये खून, मारामारी, भ्रष्टाचार, धार्मिक दंगे आणि एकूणच मनुष्याची संवेदनशीलता नष्ट झालेल्या अनेक गोष्टी समोर येतात, आपण विज्ञानयुगाचे एकीकडे गुणगान करत आहोत; पण त्या बरोबरीनेच माणसाच्या सहनशीलतेचे, माणुसकीचे, संवेदनशीलतेचे आणि प्रेमाचे पतन होतांना पाहत आहोत.”, असे चित्र सगळीकडे दिसते. एकूणच वैयक्तिक, सामाजिक आणि राष्ट्रीय मूल्यांचा दोन्ही बाजूने विचार

करता, ती मूल्ये कादंबरी वाङ्मयातून कसे अधोरेखित झालेले आहेत, ते पात्रांच्या माध्यमातून पाहता येते.

### ➢ साहित्य अकादमी पुरस्कृत निवडक मराठी कादंबऱ्यांमधील इष्ट-अनिष्ट मूल्ये

व्यक्ती, पदार्थ किंवा वस्तू हे अनेक दृष्टीने महत्त्वाचे मानले जातात. त्यावेळी त्यांना एक मूल्य प्राप्त होते. वस्तू आणि पदार्थ याची किंमत ठरवली जाते, तशी माणसाचीही किंमत मापली जाते. माणसाच्या दैनंदिन जगण्यातील त्याच्या वागण्याच्या पद्धती, त्याचे चांगले-वाईट वर्तन याविषयी अंदाज केले जातात, तेव्हा त्याला मूल्य ही संकल्पना गृहीत धरली जाते. प्रत्येक व्यक्ती पूर्णपणे चांगली किंवा पूर्णपणे वाईट नसते. त्याच्या वागण्याने ज्या ईष्ट-अनिष्ट गोष्टी घडतात, तेव्हा त्याकडे मूल्य म्हणून पाहिले आहे. अशावेळी लेखक त्याच्या सभोवतीच्या व्यक्तीजीवनातील साहित्यातून बऱ्या-वाईट अनुभवाची मांडणी करतो, तेव्हा त्या साहित्यातून दोन्ही प्रकारच्या मूल्यांचे दर्शन घडते. या ठिकाणी सर्वोच्च मानले गेलेल्या साहित्य अकादमी पुरस्कृत मराठी कादंबऱ्यांमधील मूल्यांचे स्वरूप सांगता येईल.

**१. ताम्रपट :** या कादंबरीत राजकीय व सामाजिक दीर्घ पट उलघडून दाखवतांना रंगनाथ पठारे यांनी परस्पर विरोधी स्वभावाच्या माणसांचे चित्रण केलेले आहे. एकीकडे नैतिकता-व्यवहारवाद, उपजत शहाणपण आणि बुद्धिमत्ता, सोज्वळ सोशिकता जपणाऱ्या व्यक्ती आहेत, तर त्या उलट बनेल व धूर्तपणा अशा गुंतागुंतीच्या स्वभावाचे माणसं आहेत. कादंबरीतील सीताआजी

आपल्या उदरनिर्वाहाचे साधन न मानता शाळा कॉलेजातील शिकणाऱ्या दूरच्या नात्यातील मुलांना मायेने आणि कर्तव्य भावनेने निरपेक्षपणे सांभाळते. तर त्याच आजीला खासदार झालेला बापूसाहेब देशमुख प्रेमळ वागणूक देतो आणि कर्तव्यभावनेने तो त्याच्या घरी कायमचा ठेवून घेतो, अशीही दोन्ही माणसे इष्टमूल्ये राखताना दिसतात.

गावातील तरुण शिक्षण घेऊन अंधश्रद्धा आणि अन्यायाला विरोध करतात. काही पात्रे जातीव्यवस्थेला विरोध करून सामाजिक समतेवर भर देतात. स्त्रियांचे शिक्षण आणि त्यांचा स्वाभिमान याची जाणीव झाल्याने शिक्षण घेण्याचा निर्धार करणारी स्त्रीदेखील प्रकट झालेली आहे. जुन्या रूढीला न जुमानता परिवर्तनाच्या वाटेने जाणारी पात्रे लक्ष वेधून घेतात. सामाजिक आणि शैक्षणिक अशी चांगली मूल्ये या कादंबरीत अधोरेखित झालेली आहेत. या कादंबरीतील नाना शिरूर हे चरित्रवान नीतिमूल्य पाळणारी मुख्य व्यक्तिरेखा आहे. स्वातंत्र्योत्तर काळात सामाजिक मूल्यांचा ऱ्हास होत असतांना त्यांच्या हळव्या मनाला ते सहन होत नाही. ते ध्येयवादी, निस्वार्थ व निरपेक्ष वृत्तीचे आहेत. जसे "पीडितांशी बांधिलकी राखूनही नेटका धंदा करणे शक्य असते. पण मुळातच त्यातल्या आर्थिक मागणीसाठी जो एक पद्धतशीरपणा लागतो तो नानांपाशी नव्हता." असे लेखकाने त्यांच्या स्वभावाची ओळख करून दिलेली आहे. गांधीनिष्ठ विचारांनी भारावलेले नाना हे इष्ट मूल्य राखतांना दिसतात. याउलट बापूसाहेब देशमुख, दादासाहेब भोईटे, हे आत्मकेंद्री आणि सत्तालोलूप दिसतात. एकूणच रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, जातीय भेदभाव, सत्तेचा गैरवापर,

स्वार्थांधता, भ्रष्टाचार आणि स्त्रियांना शिक्षणास विरोध करणाऱ्या काही प्रवृत्ती अनिष्ट मूल्यांचे दर्शन घडवितात.

**२. झाडाझडती :** विश्वास पाटील यांच्या या कादंबरीचा ब्लर्ब पाहिला तर त्यातून इष्ट-अनिष्ट मूल्यांमधील संघर्ष स्पष्ट दिसून येतात. धरणग्रस्त आणि सत्तेचा गैरवापर करून स्वतःचे हित साधण्यासाठी सामान्य माणसांना कसे वेठीस धरले जाते, याची ही एक दीर्घ कहाणी आहे. "तुमच्या बागा फुलाव्यात, ऊसमळे झुलावेत, साखर कारखाने निघावेत, यंत्र चालावीत, तुमच्या घराघरात वीज खेळावी, म्हणून आम्ही आमची गावं आणि भवितव्य धरणाच्या घशात कोंबलं. विकासाचा नारळ फोडण्यासाठी दगड म्हणून आमची डोकी वापरलीत. खोबरं तुम्हाला मिळालं आणि आम्ही पाहण्यासाठी, साध्या स्मशानासाठी भीक मागायच्या. जिवंतपणी आणि मेल्यावरही झडती चालूच." अशी ही धरणग्रस्तांची भावना समाजातील सत्ताधारी माणसांच्या अनिष्ट मूल्यांवर प्रकाश टाकणारी आहे. 'गाव आणि देव पाठीवर बांधून चालणाऱ्या हजारो धरणग्रस्तांचे माणूसपण नाकारणारी ही कादंबरी' असा अभिप्राय याबाबत दिलेला आहे. तेव्हा सामान्य माणसं समाजातील संवेदनशून्य आणि संधीसाधू व्यक्तीच्या अनैतिक वागण्याने हतबल झालेले दिसतात.

धरणग्रस्तांचे शोषण करणारा समाजातील अग्रणी व प्रतिष्ठित मानला गेलेला वर्ग आणि सर्वसामान्य गरीब माणसे त्यांच्यातील अनिष्ट आणि इष्ट मूल्यांचा संघर्ष दिसून येतो. खासदार शिंगाडे विकासाच्या नावाखाली धरण बांधण्याचे कार्य करतो. त्याच्याबाजूने लाला जाधव हा दलाल, पुढारी बळीआण्णा भुजबळ, ग्रामसेवक, पोलिस, अधिकारी आणि कर्मचारी असा

एक वर्ग असतो. त्यांना सामान्य माणसाच्या प्रश्न व समस्यांशी काही घेणे-देणे नसते. जो तो स्वतःपुरता विचार करतो. याउलट खैरमोडे गुरुजी माणुसकी व मानवतावादी विचाराने अशिक्षित धरणग्रस्तांचे दुःख, समस्या,वेदना आणि प्रश्न समजून घेऊन त्यांच्या पाठीशी उभे राहतात. त्यांच्यासोबत आवडाबाई, हैबती, लगंडा गोविंदा, सुभानजी हे धरणग्रस्त असतात, पण सत्ता आणि सत्ताधारी राजकारणी, बेजबाबदार व भष्ट्र कर्मचारी यांच्या निष्ठुरपणामुळे गरीब जनतेचे हाल होतात. ते अत्याचार, अन्यायांविरुद्ध उभे राहतात. मात्र त्यांची शक्ती क्षीण ठरते. "धरण काही चुकत नाही, मरण काही टळत नाही. कंबर मोडल्यावानी साऱ्यांनी खाली बसकन मारली" किंवा "वीज कोयनेला, समृद्धी महाराष्ट्राला आणि भिकेची थाळी धरणग्रस्तांना, 'निदान सोन्यासारखी जमीन चोरांच्या दावणीत पडली नसती.', अशा निवेदनातून लेखकाने अनिष्ट मूल्यांचा गरीब गावकऱ्यांच्या जीवनावर झालेला परिणाम सांगितला आहे. तसेच खैरमोडे गुरुजी आणि त्यांच्यासोबतचे धरणग्रस्त सत्य, निष्ठा, कर्तव्य, न्यायप्रियता, सामाजिक जबाबदारी, सहानुभूती, करुणा, संघर्ष, मानवी प्रतिष्ठा, सामाजिक जबाबदारी, अशा मानवी मूल्यांची अपेक्षा ठेवून लढा देतात. त्याला चिरडून टाकण्यासाठी राजकारणी, सत्ताधारी व अधिकारी त्यांच्या विरोधात कामे करतात, तेव्हा त्यांच्या ठिकाणी स्वार्थ, लोभ, अन्यायी प्रवृत्ती, संवेदनशून्यता, नैतिकतेचा अभाव ही वाईट मूल्ये आढळतात.

**३. राघववेळ :** नामदेव कांबळे यांच्या या कादंबरीत गरिबी, दारिद्र्य, अगतिकता, रूढी-परंपरा अंधश्रद्धा आणि शिक्षणासाठी चाललेला संघर्ष, हे दरिद्री व उपेक्षित दलितांच्या जगण्यातील वाईट मूल्ये ठरतात. अशातही त्यांचा

स्वाभिमानासाठी चालेला संघर्ष महत्वाचा ठरतो. दलितांविषयी सवर्ण समाजाच्या विचार करण्याच्या अनिष्ट पद्धतीमुळे परंपरागत गावगाड्यात जुनी मूल्ये आजही डोके वर काढतांना दिसतात. अशिक्षितपणा, अंधश्रद्धाळूपणा, परंपराप्रियता, रूढीग्रस्तता, लाचारी, अगतिकता आणि असहायता हीदेखील दलितांच्या जगण्यातील अनिष्ट मूल्ये या कादंबरीतून प्रकट होतात आणि ती विषम सामाजिकव्यवस्थेतून आलेले दिसतात. दारिद्र्य, उपासमार, परावलंबन व शोषण ही मूल्येदेखील याच समाजाने दिलेली आहे. त्यामुळे दलितांच्या वाट्याला दारिद्र्य, उपासमार आणि शोषण ही वाईट मूल्ये आलेली आहेत. दुःखभोगाची वेदना पिढ्यानपिढ्या त्यांच्या जीवनातून बाद झालेली नाही, अशा परिस्थितीत वालंबी, तिची मुलं आणि तिचा मातंग समाज प्रस्थापित समाजातील अनिष्ट रूढी-परंपरेला आणि शोषणाला बळी जातात. काशी व गजरी या सासू- सुना त्याचीच उदाहरण आहेत. वालंबीचा मुलगा रघू शिक्षण घेण्याची धडपड करतो. त्याच्या ठिकाणी स्वाभिमान जागृत होतो, म्हणून "तिसऱ्या दिवशी शिळं का असेना आन्न भेटलं. कष्ट करून बी जास्त भेटलं? कशानं? गावच्या रुढीनं. पण हे तर निऱ्हा भिक घालणं झालं." शिक्षणातून त्याच्या ठिकाणी स्वाभिमान आलेला असतो; म्हणून तो असा विचार करतो.

विधवा वालंबी ही आत्मविश्वास बाळगून मुलांच्या शिक्षणावर भर देते. "ती फक्त कर्तव्यकठोरच नाही, ती मायाळू आहे, प्रेमळ आहे. मातीत आणि मातीतील माणसात तिची नाळ पक्की रुजली आहे. नातेसंबंध, जगण्याशी अनुबंध अशी तिची तऱ्हा", असे लेखकाने तिच्या ठिकाणी असलेल्या इष्ट मूल्यांची जाणीव करून दिली असून पुढे पूर्ण कादंबरीत तिला करावा लागलेला

संघर्ष आणि तिचे कौटुंबिक जीवन उलगडून दाखवले आहे. त्यातून श्रम, जिद्द व चिकाटी, स्वाभिमान,प्रामाणिकपणा ही इष्ट मूल्ये जाणवतात. मात्र गावातील देशमुख, यादव पाटील, भुजंगराव हे दलित स्त्रियांचे शोषण करणारे असून वाईट प्रवृत्तीचे आहेत. सामाजिक विषमता, सावकाराकडून होणारे शोषण, दारिद्र्य व निराशा हे अनिष्ट मूल्येही दिसून येतात.

**४. तणकट :** "गेल्या दोन-तीन दशकात समाजकारणातील आणि राजकारणातील दिशाहीनता आणि मूल्यभ्रष्टता यांचा विदारक दस्तऐवज, असे राजन गवस यांच्या 'तणकट' या कादंबरीचे यथार्थ वर्णन करता येईल", असा ब्लर्बमध्ये अभिप्राय दिलेला आहे. अर्थात अलीकडे चांगली मूल्ये मागे पडून वाईट मूल्ये गावगाड्यामध्ये रुजत गेलेली आहे. त्यामुळे त्यातून दलित आणि संवर्ण यांच्यातील जातीय संघर्ष पेटलेला दिसतो. आदर्शांचे विडंबन, मूल्यांचा ऱ्हास, उपक्रमशीलतेची निरर्थकता, मानवी संबंधातील हरवत गेलेली मौलिकता, स्वार्थासाठी अविचार, आक्रमकता, वेगळे नेतृत्त्व, सत्ता ही अनिष्ट मूल्ये आमदार महिपतराव, बाळासाहेब शेडगे, बंडू चेअरमन, यल्लाप्पा दावण्या, यांच्या ठिकाणी दिसतात. तर गजा मुळीक व अक्काबा राणे ही सवर्णमंडळी त्यांची जुनी परंपराविषयक व मानसिकता सोडायला तयार नाहीत; म्हणून दलितांवर टाकलेल्या बहिष्काराच्या वेळी मध्यम भूमिका घेतात. जातीय विघटनामुळे दलितांची कोंडी होऊन असहाय्यता आणि संघर्ष वाट्याला येतो.

आपुण्या महाराची म्हैस आण्णापाच्या शेतात गेली म्हणून तो आपुण्याला मारतो. "बापाच्या वयाचा आपुण्या. पण त्याला मारताना आण्णाप्पाचा हात जरासुद्धा कचरला नाही" असे लेखकाने सवर्णांच्या ठिकाणी

असलेले वाईट मूल्ये प्रकट केले आहे. त्यावरून गावांमध्ये जातीय संघर्ष निर्माण होतो. गावातील आक्काबा राणे हा जुना माणूस समजूतदारपणे वागतो “रागानं माती व्हतीया आनी धीरानं सोनं होतंय.” असे तो आण्णाप्पाला सांगतो. पण जातीय संघर्ष जास्त निर्माण झाल्याने गावातील सवर्ण समाज महारवाड्यावर बहिष्कार टाकतो. महारांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण होऊन ते असाहाय्य अगतिक बनतात. जानबा महार गजा मुळीककडे जातो. राग-द्वेष विसरून तो त्याला माणूसकी दाखवतो. “मुळकानं त्याला उठवलं. आत जाऊन मालकीणला भाकरी घालाय सांगितली. मळयाकडं जा आता”, म्हणतच शिवी हासडली” असे गावगाड्यातील सवर्ण व दलित यांच्यातील परस्पर संबंध सामाजिक संघर्षातही एकमेकांना पुरक ठरतात.

**बारोमास :** या कादंबरीच्या सुरुवातीलाच लेखकाने “भारतीय कृषी व्यवस्थेची रोगट अवस्था सनातन आहे.” असे सांगून शेतकरी जीवनातील अनिष्ट बाबी कादंबरीमध्ये अधोरेखित केलेल्या आहेत. शेतकऱ्यांचे जगणे मागासलेपणाचे आणि लाजिरवाणे असून शेतीव्यवसायाबद्दल त्याच्या मनात उदासीनता निर्माण झाली आहे. जागतिकीकरण्याच्या पार्श्वभूमीवर शासकीय ध्येयधोरणे शेतकऱ्याला समृद्ध बनविणारे ठरलेले नसल्याने ‘कृषीमूल्यां’विषयी प्रश्नचिन्ह निर्माण झालेले आहेत, याची जाणीव लेखकाने करून दिली आहे. आर्थिक, सामाजिक आणि राष्ट्रीय मूल्यांचे नैतिकतेच्या पातळीवर उदत्तीकरण होण्यापेक्षा शेतकऱ्याच्या हिताविरोधी बनलेली दिसतात. शिक्षण, राजकारण, अर्थकारण आणि समाजकारण यांचे अवमूल्यन झाल्याने शेतकरीजीवन जीवघेणे व संघर्षाचे बनलेले दिसून येते.

खेड्यातील बेकारी, त्यातून आलेले नैराश्य, अर्थकारणाला लागलेली घरघर, ही अनिष्ट मूल्ये अधिक प्रमाणात पाहायला मिळतात. श्रीमंत वर्गाच्या ठिकाणी भौतिक मूल्ये अधिक वाढत गेल्याने भपकेबाजपणा पाहून सामान्य माणसाच्या ठिकाणी न्यूनगंड निर्माण झाला. आर्थिक विषमता व खेड्यातील वर्गीय भेद ही अनिष्ट मूल्ये शेतकऱ्याला घेरून राहिलेली दिसतात. शेतकरी वर्गातील राजकारण्यांनी संधी साधून त्यांचेच हित पाहिले आणि शेतकरी वर्गाकडे दुर्लक्ष केले. अर्थात अनिष्ट राजकीय मूल्ये ग्रामीण समाजात पाहायला मिळतात. दारिद्र्य, दुष्काळ, नापिकी, बेकारी, नैराश्य आणि आत्महत्या ही अनिष्ट मूल्ये शेतकऱ्यांसाठी कारुण्यमय ठरलेली दिसतात. "शेतकऱ्यांच्या जीवनाला बारोमास वेढून असणाऱ्या जन्मजात वेदनेच्या हुंकारातून ही कादंबरी आकाराला आली आहे", अशी पुष्टी लेखकांनी दिलेली आहे. त्यामुळे तोट्याच्या शेती व्यवसायात शेतकऱ्यांच्या वाट्याला आलेले दुःख हे या कादंबरीचे अनिष्ट मूल्य सांगता येईल.

सुभानराव, शेवंतामाय, एकनाथ आणि अलका यांच्या कुटुंबातील ताणतणाव आणि संघर्ष ही मूल्ये दारिद्र्य आणि बेकारीमुळे निर्माण झालेली आहेत. एकनाथ एम. ए. बी. एड असून त्याला नोकरी मिळत नाही. शेती विकून नोकरीसाठी पैसे भरावे असे अलकाला वाटते, पण शेतीवर निष्ठा असलेले त्याचे आई-वडील त्यास तयार होत नसल्याने अलका रागराग करते, म्हणून सासू आणि सून यांच्यात वाद होतात. ती एकनाथलाच बोलते की, "चूक आमची झाली. उतावीळ होऊन तुमच्याशी लग्न जुळवलं. बाबा म्हणायचे संबंध चुकवायचा नाही. एम. ए. बी. एड आहे. लागेलच नोकरी. पण तेव्हा काय

माहित हा एम. ए. बी. एड. एवढा मूर्ख असेल.",असे त्याला टाकून बोलून त्याचा अपमान करते. "वासना जिरवायला बायको पाहिजे. अन् तिच्या मनाचा काही विचार नाही" असा त्याचा उपमर्द केल्याने त्याची मानसिक घुसमट होते. एकूणच शेतकरी जीवनातील समस्या, संघर्ष, रूढी-परंपरा अंधश्रद्धा मध्यमवर्गीय नोकरदारांचा चंगळवाद, शासकीय अनास्था, बेरोजगारी, बेकार सुशिक्षित तरुण पिढीची उदासीनता, शेतकऱ्यांचे शोषण या गोष्टी वाईट म्हणून अधोरेखित होतात. अशा स्थितीतही शेतकऱ्यांची श्रमनिष्ठा, शेतीनिष्ठा आणि जगण्यावरील श्रद्धा, ही मूल्ये चांगलीही दिसून येतात. एकूणच कादंबरी वाङ्मयप्रकार दीर्घ अवकाश व्यापत असल्याने कथानक आणि उपकथानकातून विविध स्वभावाच्या व्यक्तिरेखा साकार झाल्याने त्यातून इष्ट-अनिष्ट मूल्ये अधोरेखित होतात, त्यापैकी प्रस्तुत कादंबऱ्यांमधून उदात्त मूल्यांपेक्षा अनैतिक मूल्ये अधिक दिसतात. समाजातील आर्थिक आणि राजकीय मूल्यांची झालेली पडझड सर्वसामान्य माणसांसाठी त्रासदायक ठरलेली दिसते. परंपरागत जीवन जगणारे सर्वसामान्य माणसं आणि स्वार्थ साधणारे समाजातील प्रतिष्ठित मानले गेलेले लोक यांच्यात मोठ्या प्रमाणात मूल्यभेद आढळून येतात. विशेषतः सामान्य माणसे सामाजिक, सांस्कृतिक आणि नैतिक मूल्ये पाळतांना दिसतात आणि सत्ता व संपत्ती असलेली मंडळी नैतिकमूल्ये पायदळी तुडवतांना दिसून येतात. तरीही समाज त्यांना हारतुरे देत असतो.

*** *** ***

# ६. पुरुषवाद आणि साहित्य

पुरुषवाद ही एक नवीन, वेगळीच गोष्ट वाटणे स्वाभाविक आहे; पण ती एक पुरुषकेंद्री विचारधारा मानायला हरकत नसावी की, जी पुरुषांचे अनुभव, विचार आणि समाजातील त्यांची भूमिका पाहता पुरुषांच्या भावनांचा आणि त्यांच्या संघर्षांचा आत्मशोध घेते. हा शोध स्त्रीविरोधी किंवा स्त्रीवादविरोधी नाही. आधुनिक काळात समाजात स्त्री-पुरुष समानता रुजविली. स्त्रीच्या बाजूने सारे कायदे झाले. त्यामुळे पुरुषाची कोंडी होऊ नये, त्याच्यावर कौटुंबिक आणि सामाजिक दबाव टाकून त्याचा मानसिक व भावनिक छळ होऊ नये. स्त्रीला सक्षम बनवून सुरक्षित ठेवतांना पुरुषांवर अन्याय-अत्याचार तर होत नाही ना?हेही पाहिले पाहिजे; म्हणून पुरुषवादाची कल्पना या ठिकाणी मांडायची आहे. ॲड. संजय घायाळ यांनी 'पत्नीकडून होणारा पतीचा छळ' या पुस्तकात पुरुषांवर होणाऱ्या अन्यायाची कारणे सांगितलेली आहेत. तेव्हा स्त्री ही पुरुषाच्या जीवनातील वास्तव नाही. ती एक भ्रम आहे. आई सोडली तर इतर स्त्री पुरुषाकडे, त्याच्याशी असलेल्या नातेसंबंधाकडे तटस्थपणे आणि स्वार्थी दृष्टिकोनातून पाहते. भावनिकदृष्ट्या स्थिर नसते.तेव्हा पुरुषाची मानसिक घुसमट होते; म्हणून स्त्रीवाद, स्त्रीमुक्ती चळवळी आणि स्त्रियांच्या अस्तित्त्वासाठी केलेले कायदे पुरुषाच्या जीवनावर उलट परिणाम करणारे तर ठरणार नाही ना?, हेही यानिमित्ताने पाहिले पाहिजे.

## ➢ स्त्री-पुरुष लिंगभेद

जगभरात समाजाने लिंगभेदाला अवास्तव महत्त्व देऊन स्त्री आणि पुरुष असा भेद केला असून समाजात अनेक वर्षांपासून अस्तित्वात आहे. त्याचे परिणाम शिक्षण, रोजगार, आरोग्यसेवा आणि सामाजिक सहभाग यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये दिसून येतात. समाजात पुरुष हा स्त्रियांपेक्षा अधिक सक्षम असतो. जैविकदृष्ट्या कणखर असतो. तसेच भावनेने स्थिर, न रडणारा, आक्रमक, शूर, गंभीर, बुद्धीने शहाणा, निर्णयक्षम व स्पष्ट विचाराचा असतो. या उलट स्त्रिया कमजोर, देखण्या, कोमल, लवकर रडणाऱ्या, संवेदनशील, घाबरणाऱ्या, दुर्बल, स्वप्नाळू, परावलंबी असतात, असा या दोघांच्या बाबत समाज साचेबद्ध लिंग पक्षपात मानतो.

मुलगा-मुलगी या रूपाने त्यांना लहानपणापासूनच लिंगभाव ओळख करून दिली जाते. त्यामुळे समाजाला अपेक्षित असलेल्या भूमिका ते आत्मसात करीत असतात. लिंगभेदानुसार समाज मुला-मुलींवर विशिष्ट अपेक्षा, भूमिका, वागणे, बोलणे व राहणेबाबत बरीच वैशिष्ट्ये आरोपीत करतो. त्यांच्या नैसर्गिक व सहज प्रवृत्तीच्या भावनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी समाजाकडून दबाव असतो. दोघांची कार्यक्षेत्रे निश्चित केली जातात. खरे तर "स्त्री आणि पुरुष यांच्यात नैसर्गिकरित्या खालील बाबतीत फरक आहे.

> शरीर रचना

> शरीराचा आकार

> देहधर्म आणि त्या अनुषंगाने स्वभाव वैशिष्ट्ये

स्त्री-पुरुषातील या नैसर्गिक फरकास लिंगभेद म्हणतात. लोकांना मिळालेली संधी सामाजिक भूमिका आणि आंतरक्रिया यांचा लिंगभावा (Gender) व परिणाम होतो लिंगभाव हा आर्थिक, सामाजिक, दैनंदिन, वैयक्तिक, खाजगी आणि सामाजिक जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे "

पूर्वीपासून समाजाने स्त्रीकडे जैविक दृष्टीने न पाहता लिंगभाव म्हणून पाहिले. तिला पुरुषापेक्षा कनिष्ट व दुय्यम दर्जा दिला. आधुनिक काळात ज्ञान-विज्ञानाच्या शाखा विस्तारित गेल्याने समाजाचे स्त्रीकडे पाहणे बदलले. स्त्रियांना समान संधी मिळविण्यासाठी आणि लिंगभेद कमी करण्यासाठी विविध प्रयत्न केले गेले. कायदेशीर उपाययोजना केल्या. समाजात जागृकता वाढवून महिलांना सशक्त करण्यावर भर देण्यात आला, त्यावेळी पुरुषाच्या बाजूने होणारे नकारात्मक परिणाम कोणी पाहिलेले दिसत नाही. स्त्रीला माणूस म्हणून समान स्थान देतांना पुरुषाला स्त्रीकडून निर्माण होणाऱ्या समस्यांचा विचार केलेला नाही. स्त्रीवाद आणि स्त्रीवादी चळवळी यांनीही आपल्या हक्काचा जागर करतांना पुरुषाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले.

### ➢ स्त्रीवादाची संकल्पना व स्वरूप

आधुनिक काळात समाजसुधारकांनी स्त्रियांचा विकास आणि सक्षमीकरण यासाठी समाजप्रबोधन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९४८ साली संसदेत हिंदू कोडबिल सादर करून स्त्रीला सर्व प्रकारचे हक्क आणि अधिकार घटनात्मकरितीने बहाल केले. आंतरराष्ट्रीय महिला दशकानंतर स्त्रियांचे आंदोलने तीव्र बनत गेलीत. स्त्रिया मोठ्या प्रमाणात जागृत

होत गेल्या. स्त्रीवाद तीव्र बनला. तिच्यावरील अन्याय-अत्याचाराला वाचा फोडण्यात आली. स्त्रीमुक्ती चळवळ व्यापक स्वरुपात देशभर सुरु झाली. स्त्री आणि पुरुष यांच्यात सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समानता असावी, यावर विश्वास ठेवणारी विचारप्रणाली म्हणून त्याकडे पाहिले. ती चळवळ पुरुषांविरुद्ध नसून लिंग-आधारित भेदभावाच्या व्यवस्थेविरुद्ध आहे आणि सर्व लिंगांना समान संधी, सन्मान आणि अधिकार मिळावेत यासाठी आहे, असे स्पष्ट करण्यात आले. विशेषतः "स्त्रीवाद ही संकल्पना स्वातंत्र्य व समतेशी जोडली आहे. म्हणजेच स्त्रियांच्या हक्कांबाबत भूमिका निश्चित करणे होय." अशावेळी पुरुषकेंद्रित व्यवस्थेला आव्हान देत समाजातील पुरुषप्रधान रचना आणि स्त्रियांना दुय्यम स्थान देण्याच्या पद्धतींना विरोध केला. लिंग-आधारित हिंसाचार, कामाच्या ठिकाणी असमानता, पुनरुत्पादक हक्क, यांसारख्या मुद्द्यांवर आवाज उठविला.

### ➢ स्त्रीवादाची भूमिका

लिंगावर आधारित कोणताही भेदभाव न करता स्त्री आणि पुरुष यांच्यात सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समानता प्रस्थापित करणे, ही स्त्रीवादाची मूलभूत भूमिका आहे. "ज्या-ज्या कारणांनी म्हणजेच शारीरिक, जैविक, मानसिक, नैसर्गिक, सामाजिक, धार्मिक याबाबतच्या रुढ संकेतांमुळे निर्माण झालेली स्त्रीविषयक अहितकारक मानसिकता खोडून काढणे आणि सर्व प्रकारची विषमता नाकारणे ही भूमिका स्त्रीवादाने घेतलेली आहे" स्त्रीवादाच्या माध्यमातून महिलांच्या हक्कांसाठी लढे दिल्याने स्त्रियांना सर्व क्षेत्रात समान संधी मिळत गेली. त्यामुळे त्यांच्या जीवनात स्वातंत्र्य आणि आत्मनिर्भरता

निर्माण झाली; परंतु दुसरीकडे पुरुषांची कोंडी झाली. विशेषतः मध्यमवर्गीय पुरुषांना त्याचे परिणाम अधिक जाणवू लागलेले दिसतात, म्हणूनच पुरुष हक्क संरक्षण समित्या, त्यांचे संगठन आणि चळवळी उदयाला आल्या.

➢ **पुरुषहक्क चळवळ**

भारतात पुरुषांवर होणाऱ्या अत्याचारांना वाचा फोडण्यासाठी आणि त्यांना कायदेशीर व भावनिक मदत देण्यासाठी या चळवळीची सुरुवात १९९० च्या दशकात झाली असून नाशिक येथे ७ नोव्हेंबर १९९६ रोजी पुरुष हक्क संरक्षण समितीची स्थापना झाली. कायद्याचा गैरवापर, कौटुंबिक हिंसाचार आणि मानसिक आरोग्य यांसारख्या समस्यांवर लक्ष केंद्रित केले गेले. तेव्हा पुरुष हक्क संरक्षण समिती (PHSK). महिलांविरोधी नसून, कायद्याचा गैरवापर करणाऱ्यांविरुद्ध आहेत, अशी भूमिका घेतली गेली. राष्ट्रीय पातळीवर पुरुषांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी 'राष्ट्रीय पुरुष आयोग किंवा मंत्रालय' स्थापन करण्याची मागणी केली आहे. पुरुषांवर होणाऱ्या कौटुंबिक हिंसाचाराला प्रतिबंध करणे, IPC कलम ४९८-अ (घरगुती हिंसाचार) सारख्या कायद्यांच्या गैरवापराला आळा घालणे, पुरुषांना मानसिक आणि कायदेशीर आधार देणे, पुरुषांवरील अत्याचार (जुलमी स्त्रीचा अत्याचार) यावर आवाज उठवणे, 'सेव्ह इंडियन फॅमिली'सारख्या संस्थांच्या माध्यमातून पुरुषांना मदत करणे, आंतरराष्ट्रीय पुरुष दिन साजरा करणे आणि समाजात जागृकता निर्माण करणे, ही या पुरुष हक्क चळवळीची उद्दिष्टे आहेत. महाराष्ट्र, गोवा, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, दिल्ली आणि बंगाल यांसारख्या राज्यांमध्ये या समित्या कार्यरत आहेत. देशभरात त्यांचा विस्तार होत असून समाजातील पुरुषांच्या हक्कांचे

रक्षण, त्यांना कायदेशीर मदत आणि त्यांच्या समस्यांवर तोडगा काढणे, यासाठी पुरुष हक्क चळवळ काम करीत आहे. ही चळवळ काही स्त्रीवादी चळवळीप्रमाणे राजकीय भूमिकेतून आलेली दिसत नाही. कौटुंबिक आणि सामाजिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ती आधारलेली दिसून येते.

- **पुरुषवाद : संकल्पना व स्वरूप**

आजपर्यंत पुरुषाला त्याच्या हक्कांसाठी चळवळीची गरज वाटली नव्हती; पण स्त्रीकडून विशेषतः पत्नीकडून, तर कधी तिच्या माहेरच्या माणसांकडून नात्याने पती असलेल्या पुरुषावर अन्याय होतो. लोकं किंवा कायदे त्याच्या बाजूपेक्षा स्त्रीकडे अधिक झुकतात. अशावेळी पुरुषवाद हा एक विचारप्रवाह मानून कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात जैविकदृष्ट्या त्याच्या पौरुषत्त्वाचे सन्मानपूर्वक संरक्षण व्हायला पाहिजे. त्याच्याविषयीची पारंपरिक सामाजिक मानसिकता बदलली पाहिजे, यासाठी काही नवे विचार आणि सिद्धांत समाजमनात रुजविले जाणं गरजेचे आहे.

'पुरुष' यासाठी इंग्रजीत male हा शब्द असून त्याच्या मर्दानीपणाला masculine तर पुरुषवादासाठी masculinity असा शब्द आहे. त्याविषयी फार थोडी माहिती मिळते, तरी "पुरुषत्त्व हे पुरुष आणि मुलांशी संबंधित गुणधर्म, वर्तन आणि भूमिकांचा एक संच आहे. पुरुषत्त्व हे सैद्धांतिकदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या बांधलेले म्हणून समजले जाऊ शकते आणि असेही पुरावे आहेत की, पुरुषत्त्व मानले जाणारे काही वर्तन सांस्कृतिक घटक आणि जैविक घटक दोन्हीने प्रभावित आहेत. पुरुषत्त्व जैविक किंवा

सामाजिकदृष्ट्या किती प्रमाणात प्रभावित आहे, हा वादाचा विषय आहे. ते जैविक पुरुष लिंगाच्या व्याख्येपेक्षा वेगळे आहे. कारण कोणीही पुरुषत्त्वाचे गुणधर्म प्रदर्शित करू शकतो. पुरुषत्त्वाचे मानक वेगवेगळ्या संस्कृतींमध्ये आणि ऐतिहासिक काळात बदलतात. पाश्चात्य संस्कृतींमध्ये, त्याचा अर्थ पारंपरिकपणे स्त्रीत्त्वाशी तुलना करण्यापासून काढला जातो”

**“Masculinity (noun) : उच्चार:** मॅस्क्युलिनिटी (ˌma-skyə-ˈli-nə-tē), त्याचा **अर्थ:** पुरुषत्व; पुरुषी असण्याची गुणवत्ता, स्थिती किंवा पातळी. त्यालाच पुरुषत्व,मर्दानगी,पौरुष हे समानार्थी शब्द वापरले जातात. म्हणजे पुरुषी गुणधर्मांची गुणवत्ता किंवा स्वरूप.” यात ताकद, धैर्य, आत्मविश्वास, जबाबदारी, नेतृत्व इत्यादी गुणांचा समावेश होतो. **पुरुषत्व** म्हणजे मुलगा किंवा पुरुष यांच्यात असणारे काही खास गुण प्रमाणित केलेले आहेत.जसे,धैर्य (भीती न बाळगणे), जबाबदारी घेणे,कुटुंबाची काळजी घेणे,आत्मविश्वास तसेच फक्त ताकदवान असणे म्हणजेच पुरुषत्व नाही; चांगले वागणे आणि इतरांचा आदर करणे हेही पुरुषत्व आहे. आजच्या काळात **पुरुषत्व** म्हणजे फक्त शक्ती किंवा राग नाही, तर समजूतदारपणा, आदर आणि जबाबदारीही आहे.

**समाजाने ठरवलेल्या ‘पुरुष’ असण्याच्या अपेक्षा** म्हणजे ‘पुरुषत्व’ असे गृहीत धरले जाते. मुलगे आणि पुरुष यांनी कसे वागावे, कसे दिसावे आणि त्यांच्यात कोणते गुण असावेत याबाबतच्या भूमिका, वर्तनपद्धती आणि वैशिष्ट्ये समाविष्ट असतात. त्यास जैविकतेचा आधार नसतो. सामाजिक, ऐतिहासिक आणि राजकीय प्रक्रियांमधून पुरुषाला तसे घडवले जाते.

त्याच्याकडून अपेक्षित असलेल्या वागणुकीसाठी ‘पुरुषत्व’ हा शब्द वापरला जातो. सामाजिक व सांस्कृतिक संस्थांद्वारे त्या अपेक्षा सतत बळकट केल्या जातात. त्यामुळे त्याला मोकळेपणे रडून भावनाही मोकळ्या करता येत नाही. रडणे हे मुलांसाठी अयोग्य आहे, अशी सामाजिक समजूत आहे; म्हणून 'पुरुषासारखा वाग, रडू नकोस.”,असे त्याची त्याची आईदेखील त्याला म्हणते. म्हणजे समाजाने त्याच्या भावना दडपून टाकलेल्या असतात. मोठा झाल्यानंतर त्याने कष्ट करून पैसा कमवावा आणि घर-कुटूंब सांभाळावे अशी जबाबदारीची शिकवण दिली जाते. **तेव्हा** पुरुषत्व ही जन्मतः येणारी गोष्ट नसून ती समाज घडवतो. हे स्पष्ट होते. मात्र समाज, संस्कृती, काळ आणि परिस्थितीनुसार ‘खरा पुरुष कसा असावा’ याविषयीच्या सामाजिक धारणा बदलत गेलेल्या आहेत. त्याच्या ठरलेल्या परंपरागत भूमिका किंवा वर्तनपद्धती बदलत गेल्या की त्याच्या पुरुषत्त्वाच्या संकल्पना बदलतात. कारण पुरुषत्वाला पुरुष असण्याबाबतच्या सामाजिक अपेक्षा आणि वागणुकीबाबत कालपरत्वे बदल होतो. जसे, मुलांना लहानपणापासून सांगितले जाते की त्यांनी धाडसी, ताकदवान आणि कठोर असावे. भीती दाखवणे किंवा कोमलपणा दाखवणे हे “पुरुषी नाही” असे मानले जाते. आता याउलट चित्र दिसते. स्त्रियांनी पुरुषाची जागा घेतल्याने ‘मर्दानी’ हे बिरूद तिलाही लावले जाते. **कारण** शक्तिशाली, निर्णयक्षम आणि आक्रमक अशीही तिची प्रतिमा तयार झालेली आहे.

एकूणच मुले आणि पुरुषांसाठी योग्य मानल्या जाणाऱ्या भूमिका, वर्तन आणि गुणांना समाज सूचित करतो. पुरुषी किंवा मर्दाना असण्याचा गुण, स्थिती किंवा प्रमाण याला प्राधान्य देतो. त्यामुळे पौरुषत्त्व हे जैविकदृष्ट्या प्रेरित नसून

सामाजिक, ऐतिहासिक आणि राजकीयदृष्ट्या घडवले आणि परिभाषित केले जाते. पुरुषपणाबाबत सामाजिक अपेक्षा आणि प्रथांबद्दल बोलण्याचा एक संक्षिप्त मार्ग म्हणून पुरुषाकडे पाहिले जाते. स्त्रिया तसेच पुरुष दोघेही पुरुषत्त्वाच्या गुण-लक्षणांना तसेच सामाजिक अपेक्षांना बळकटी देतात; म्हणून एखादी आईदेखील तिच्या मुलाला पुरुषासारखे वागायला सांगते. म्हणजे 'रडू नको, माणसासारखा माणूस (मजबूत) हो, असे सांगते. लहानपणापासून त्याला शूर, धाडसी, कणखर आणि कर्तृत्त्वान बनायला शिकविले जाते. अर्थात पुरुषाच्या जैविक गुणांचे, त्याच्या मानसिक, भावनिक अवस्थेचे, त्याच्या पौरुषत्त्वाचे परिमाने ठरवून दिलेली असतात. त्याच्या त्या पौरुषत्त्वाचे समंजसपणे रक्षण व पालन केले जाणे म्हणजे पुरुषवाद, असे म्हणता येईल.

## ➢ पुरुषवाद

पुरुषवादाला इंग्रजीत Masculism किंवा Masculinism हे शब्द आहेत. यातील "Ism" (इझम) हा प्रत्यय एखाद्या विशिष्ट विचारसरणी, तत्त्वज्ञान, प्रवाह किंवा सामाजिक-राजकीय मतप्रणाली किंवा एखाद्या कल्पना-प्रणालीला नाव देण्यासाठी तो लावला जातो. मराठीमध्ये तो 'वाद' या अर्थाने वापरला जातो. उदा. स्त्रीवाद, साम्यवाद, गांधीवाद, आंबेडकरवाद, मार्क्सवाद, वास्तववाद आणि आधुनिकतावाद इत्यादीप्रमाणे 'पुरुषवाद' याचा विचार आवश्यक ठरते. कारण एखाद्या ठरावीक तत्त्वांवर, मूल्यांवर किंवा दृष्टिकोनावर आधारलेली संघटित विचारप्रणाली म्हणजे 'वाद' (Ism) असे म्हटले जाते. काही दशकांपासून पुरुषांच्या संघटना,चळवळी आणि त्या माध्यमातून त्यांनी मांडलेली त्यांची मते पाहिली तर त्यास 'पुरुषवाद' म्हणणे योग्य ठरेल. कारण

तो समाजाकडे पाहण्याचा एक विशिष्ट दृष्टिकोन देतो. त्याला ठरावीक तत्त्वांचा आधार असून कुटुंब, समाज व राजकारणाविषयी विशिष्ट भूमिका मांडून काळानुसार बदललेल्या परिस्थितीचे भान तो आणून देतो. स्पर्धेपेक्षा व्यक्तिस्वातंत्र्य अबाधित ठेऊ पाहतो. संघर्ष टाळून शोषणाविरोधी आवाज उठवतो. पितृसत्तेचा आग्रह नसला तरी त्याच्या अस्तित्त्वाला बाधा येऊ नये, अशा विचारांची स्पष्ट मांडणी करण्यासाठी त्याची चळवळ त्याला ओळख देण्यासाठी प्रयत्नशील आहे. कायदे आणि समाजातील बदलांचे विश्लेषण करण्यासाठी पुरुष पुढे सरसावले आहेत. संघटित चळवळी निर्माण करून समंजस विचारांना दिशा देण्याचा प्रयत्न केला जात आहे. अतिरेकीपणा येऊ न देता आणि एकांगी दृष्टिकोन न बाळगता मतभेद व संघर्ष वाढणार नाही, याकडे पुरेपूर लक्ष असेल. अर्थात पुरुषवाद एक सुसंघटित विचारसरणीचा पाया असून कुटूंब, समाज, राजकारण, संस्कृती आणि साहित्य यांना आकार देईल. समाजात वेगळा दृष्टिकोन निर्माण करून परिवर्तन घडवून आणेल. ‘पुरुषवाद’ ही संज्ञा नव्यानेच चर्चेत आणलेली असल्याने स्त्रीवादी चळवळींनंतर उदयास आलेल्या या प्रवाहात पुरुषांच्या हक्कांबाबत, सामाजिक अपेक्षांबाबत आणि लैंगिक समतेबाबत वेगळ्या दृष्टीकोनातून विचार करणे आवश्यक आहे.

## ➢ पुरुषवादाची संकल्पना

पुरुषवाद म्हणजे समाजातील पुरुषांवर असलेल्या विशिष्ट सामाजिक, कायदेशीर व सांस्कृतिक अपेक्षा आणि बंधनांचा विचार करून त्यांच्या हक्कांसाठी व मानसिक-सामाजिक प्रश्नांसाठी मांडलेली विचारसरणी, अशी संकल्पना मांडली गेली आहे. यात पुरुषांच्या मानसिक आरोग्याचा प्रश्न,

कुटुंबव्यवस्थेतील कायदेशीर समता (पालकत्व, घटस्फोट), लिंगाधारित पूर्वग्रहांचा विरोध, आत्महत्यांचे प्रमाण, व्यसनाधीनता यांसारखे प्रश्न अधोरेखित केले जातात. १९व्या व २०व्या शतकात स्त्रीवादी चळवळी तीव्र बनत जाऊन स्त्रियांच्या हक्कांसाठी लढे दिले गेले. त्यानंतर काही पाश्चात्त्य देशांत पुरुषांच्या प्रश्नांवर लक्षकेंद्रित करणारी चळवळ उदयास आली.

वॉरेन थॉमस फॅरेल नावाच्या एका अमेरिकन लेखक, शिक्षक आणि कार्यकर्त्यांने पुरुषांच्या लिंग व व्यभिचारविषयक समस्यांबद्दल लिहिले. पुरुषांसमोरील तोटे आणि आव्हाने अधोरेखित करण्याकडे त्यांनी लक्ष वळवले. १९८० आणि १९९० च्या दशकात फॅरेलने उदयोन्मुख पुरुष चळवळीत एक अग्रणी आवाज म्हणून स्वतःला स्थापित केले आणि पुरुषांच्या सामाजिक भूमिकांवर आणि मानसिक आरोग्यावर प्रकाश टाकला. भारतामध्ये पुरुषवाद स्वतंत्र चळवळ म्हणून व्यापक नसला तरी कौटुंबिक कायदे, खोटे गुन्हे, पालकत्वाचे हक्क इत्यादी संदर्भात काही संघटना कार्यरत आहेत. लैंगिक समता: स्त्री-पुरुष दोघांनाही समान कायदेशीर व सामाजिक अधिकार. पितृसत्ताकतेची पुनर्मूल्यांकन: पितृसत्ताक व्यवस्थेत पुरुषांनाही विशिष्ट दबाव सहन करावा लागतो, पुरुषांनी 'कणखर' असावे ही अपेक्षा बदलण्याची गरज, अशा काही गोष्टी चर्चेत आलेल्या आहेत. त्यामुळे पुरुष संघटित होऊ लागलेले आहेत.

भारतीय समाजात पुरुष हा पारंपरिकरित्या कुटुंबप्रमुख, कमावता सदस्य आणि अधिकारवाणी व्यक्ती म्हणून पाहिला गेला आहे. मात्र आधुनिक काळात रोजगारातील अस्थिरता, कौटुंबिक ताणतणाव, घटस्फोट व पालकत्वाचे प्रश्न

यांचा त्याच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होतो आहे. पुरुषवाद हा आधुनिक काळातील एक विचारप्रवाह आहे, जो पुरुषांच्या सामाजिक, मानसिक व कायदेशीर प्रश्नांकडे लक्ष वेधतो. तो स्त्रीवादाचा विरोधक नसून, व्यापक लिंगसमतेच्या चर्चेचा एक भाग म्हणून समजणे अधिक योग्य ठरेल. समाजात खऱ्या अर्थाने समता प्रस्थापित करण्यासाठी स्त्री आणि पुरुष दोघांच्याही प्रश्नांचा समतोल विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे पुरुषवाद हा स्वतंत्र वाद म्हणून नव्हे, तर समतेच्या व्यापक संवादाचा घटक म्हणून अभ्यासणे उपयुक्त ठरेल

- **स्वरूप**

समाजाने पुरूषत्त्वाची संकल्पना ठरवून पारंपरिकपणे पुरुष आणि मुलांशी संबंधित कणखरपणा, शक्ती, नियंत्रण, आक्रमकता, स्पर्धा आणि भावना दाबणे, निष्ठा बाळगणे आणि नेतृत्व करणे यासारखे गुण, वर्तन आणि भूमिका स्पष्ट केलेल्या आहेत. त्यालाच सामर्थ्यवान पुरुष मानले आहे. सामाजिक संवाद, कुटुंब, माध्यमे, कामाची ठिकाणे, यांसारख्या संस्थांद्वारे त्याला तसे शिकवून बळकट केले जाते. सहनशक्ती, संरक्षण, स्वावलंबन, कमी भावनिक अभिव्यक्ती, स्पर्धात्मकता, निर्णय घेण्याची व तरतूद करण्याची क्षमता, असे त्याचे वर्तन अपेक्षित असते. तो अधिक प्रामाणिक आणि कमी हानिकारक असावा, अशी समाजाची धारणा असते. त्याच्याकडे सत्ता असावी आणि कधीकधी नियंत्रण मिळवण्यासाठी हिंसेचा वापर करावा, अशी अपेक्षाही असते. शाळा आणि इतर शैक्षणिक संस्था कधीकधी हेतुपुरस्सर आणि कधीकधी नकळतपणे, अशा पुरुषत्त्वाला प्रोत्साहन देतात. त्यातून तयार झालेले

त्याचे व्यक्तिमत्त्व अबाधित राहावे आणि त्याचा स्वाभिमान, त्याच्या अस्मिता आणि इगो सन्मानपूर्वक राखला जावा, समाजाकडून त्याच्या पुरुषत्त्वाची अवहेलना होऊ नये, त्याच्याकडून अवास्तव अपेक्षा करून त्याच्या सहनशक्तीला आव्हान न देता त्याचे अस्तित्त्व अबाधित राखले जावे, ही पुरुषवादाची भूमिका सर्वानुमते मान्य करून त्याविषयी समाजात जनजागृती व्हायला हवी.

## ➢ स्त्रियांकडून होणारे अन्याय-अत्याचार

सांगलीतील पुरुष हक्क समितीकडे ९५० तक्रारी दाखल झाल्या. बायकोने छेडले अशी अनेकांची तक्रार आहे. दीड हजार पुरुषांनीही दूरध्वनीवरून तसे सांगितले, म्हणजे महिलाही पुरुषांवर अत्याचार करतात असे त्यातून दिसते. अशी एक बातमी असून त्यात म्हटले आहे की, “महिलेकडून पुरुषाची छळवणूक होते, हे वास्तव स्वीकारण्याची समाजाची मानसिकता नाही. पुरुषच महिलेला छेडतो, यावरच समाजाचा दांडगा विश्वास. महिलेने छळले... अशी तक्रारही पोलिसांकडून दाखल करून घेतली जात नाही. महिलेने छेळले.. असे सांगणे पुरुषांना लाजिरवाणे वाटते. हाही मानसिकता बदलण्याचा मुद्दा आहे. परिणामी, पीडित पुरुष तक्रार दाखल करायला दजावत नाहीत.” तसेच “वर्षभरात प्रत्येक जिल्हा कार्यालयात अडीच हजार तक्रारी दाखल होतात. रोज किमान ४०० ते ५०० जण नाव न सांगता किंवा खोटे नाव सांगून त्यांना दिल्या जाणाऱ्या त्रासाची तक्रार सांगून सल्ला विचारतात”[८] अशी माहिती ॲड. बाळासाहेब पाटील आणि ॲड. धर्मेंद्र चव्हाण यांनी दिली आहे. पुरुषांच्या छळाच्या अशा अनेक घटना भारतात घडत आहे. बऱ्याचदा त्यांच्या

आत्महत्याही झालेल्या आहेत. अशा पीडित पुरुषांसाठी काही संस्था आणि चळवळी निर्माण झालेल्या आहेत.

“डिसेंबर २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात राज्यसभेच्या एका सदस्याने प्रस्तावित केलेले राष्ट्रीय पुरुष आयोग विधेयक, २०२५ हे भारतातील लिंग न्यायाच्या चर्चेत एक महत्त्वपूर्ण प्रगती आहे. हे विधेयक बनावट आणि क्षुल्लक खटल्यांना तोंड देणाऱ्या पुरुषांसाठी, विशेषतः वैवाहिक वाद आणि गुन्हेगारी प्रकरणांमध्ये, आशेचा किरण म्हणून उदयास आले आहे आणि कायदेशीर असंतुलन आणि कायद्याच्या काही तरतुदींचा गैरवापर यासंबंधीच्या दीर्घकालीन चिंता दूर करण्याचा प्रयत्न करते. जरी खाजगी सदस्यांचे विधेयक म्हणून सादर केले गेले आणि सरकारद्वारे प्रायोजित केले गेले नाही, तरी हा उपक्रम भारतीय कायदेविषयक इतिहासातील एक नवीन आणि विकसित होत चाललेली घटना दर्शवितो. ज्याचा उद्देश संवैधानिक चौकटीत पुरुषांच्या हक्कांना ओळखणे आणि त्यांचे संरक्षण करणे आहे.”

### ➢ पुरुषवाद आणि साहित्य

भालचंद्र नेमाडे यांच्या कोसला मध्ये पुरुषाची अस्तित्ववादी घालमेल दिसते. वि. स. खांडेकर यांच्या ययाती कादंबरीमध्ये पुरुषाच्या वासना आणि नैतिक संघर्षाचे चित्रण आहे. या साहित्यकृतींमध्ये पुरुषाच्या मानसिक, नैतिक आणि सामाजिक संघर्षांचे दर्शन घडते, जे पुरुषवादाच्या चर्चेशी संबंधित ठरू शकते. असे असले तरी मराठी कथा,कविता,कादंबरी, नाटक आणि अन्य साहित्य प्रकारातून पुरुषांच्या समस्या आणि प्रश्न हेतुपूर्वक प्रकट केलेले नाहीत.

त्याला पुरुषवादी भूमिकेतून साहित्यातून चित्रित केकेले नाही. त्यामुळे पुरुषावाद अशी काही संकल्पना मराठीत रुजू शकलेली नाही.मात्र डॉ. मनोहर सुरवाडे यांचे ‘पुरुषनामा’, ‘पुरुषाच्या व्यथा’, ‘तो-ती-ते’, हे कवितासंग्रह प्रकाशित झालेले असून त्यात त्यांनी पुरुषांचा होणारा मानसिक व भावनिक कोंडमारा अधोरेखित केलेला आहे. “कवितेतून पुरुषाचे मानसिक द्वंद्व सार्वजनिकरीत्या स्पष्ट केलेले आहेत. तेव्हा कविता वाचताना असे लक्षात येते, की पुरुषाच्या जीवनात असे काय घडले, की त्याला आज स्पष्ट सांगणे किंवा त्याचे मन त्याला मोकळे करावेसे वाटले? हा प्रश्न जसा समोर येतो,तसे साहित्यातील विविध प्रवाहही समोर येतात. विशेषत: त्यासाठी स्त्रीवादी प्रवाह लक्षात घ्यावा लागतो. त्याच्या समांतर म्हणा की विरोधी म्हणा ‘पुरुषवाद’ हा एक नवा प्रवाह मानता येईल, असे या संग्रहातील कवितांचे आशयरूप स्पष्ट होते. ती स्त्रीबाबत तक्रार नाही, तर दमन झालेल्या,उपेक्षित असलेल्या पुरुषाची व्यथा आहेत.”, असे प्रा.उन्नती चौधरी यांनी ‘पुरुषनामा’ या काव्यसंग्रहाच्या अभिप्रायामध्ये म्हटले आहे. याचबरोबर “काही अपवाद वगळता स्वातंत्र्योत्तर स्त्रीच्या ठिकाणी आत्मविश्वास, स्वाभिमान व अस्मिता निर्माण झाल्याने तिचा इगो वाढला. 'पती देव भव' असे ती आता फार मानत नाही. नवऱ्याला जुमानत नाही. ती गृहिणी असली, तरी नवऱ्यावर धाक व वर्चस्व ठेवून असते. ती शिकलेली असली, तरी संसार सुंदर करण्याची दृष्टी तिच्याकडे नाही. त्यामुळे ती सुविद्य गृहिणी बनू शकली नाही. तेव्हा विवाहाचे सारे प्रयोजन असफल होतात. कमवणाऱ्या पुरुषांच्या मनाची फार घालमेल होते, हेच आजच्या पुरुषाचे दुःख

आहे. त्याची ती वेगळीच व्यथा आहे, अशी एक सांसारिक जीवनाची दीर्घ रुपात काव्यात्म मांडणी इथे केली आहे.” असे ‘पुरुषाच्या व्यथा’ या संग्रहाच्या मनोगतात म्हटले आहे. त्यातील कविता ह्या पुरुषवादाचे निदर्शक ठराव्या असे त्यांचे स्वरूप आहे. अशाप्रकारे घरगुती हिंसाचाराने पुरुष पीडित असतात. कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाच्या खोट्या तक्रारी पुरुषाविरुद्ध केल्या जातात. बलात्काराचे खोटे आरोप होतात. पुरुषांचे आत्महत्येचे प्रकरणही वाढते आहे. उलट केस धमकीचा धोका त्यांना असतो. कलम ४९८अ अजामीनपात्र कायद्याचा पुरुषांना जास्त त्रास होतो. पुरुषांचे मानसिक आरोग्य आणि आत्महत्या याकडे लक्ष दिले जात नाही, अशा काही वास्तविक बाबी लक्षात घेतल्या तर पुरुषवाद ही संकल्पना समाजात रुजणे व साहित्यातून उजागर होणे गरजेचे ठरते.

*** *** ***

# ७. डिजिटल युगातील माणूस

मानवी विश्वात रोजच्या जगण्यात स्वतःची जागा शोधून अस्तित्त्व निर्माण करण्याची प्रत्येकाची धडपड असतेच. ते एक जीवन वास्तव आहे, हे नाकारता येत नाही. कारण पिढ्यांपिढ्या सामाजिक-सांस्कृतिक मूल्यसंस्कार होत गेले आहेत आणि होत राहतातच. त्यातून व्यक्तीचे ठराविक स्वभाव आणि दृष्टिकोण निर्माण होतात. त्यानुसार त्यांची मानसिकता व त्यांच्या व्यक्तित्वाची घडण होते,ती बदलत नसते. माणसेही बदलायला तयार नसतात,काही वेळेस सोयीनुसार बदल करून घेतात, पण लहानपणापासून झालेले संस्कार कायम असतात, ‘सुंभ जळला तरी पीळ जात नाही’,असे त्यामुळेच म्हटले जाते. मात्र त्यांच्या जीवनात समस्या अधिक निर्माण होतात. चुकीच्या समजुती व धारणा यांचे प्राबल्य त्यांच्या मनावर अधिक असते,म्हणून त्यांना अधिक अडचणींना सामोरे जावे लागते. काही लोक समकालीन परिस्थिती हातळण्यासाठी गैरसमजुती बाजूला करून समायोजन करतात. नवे विचार व दृष्टिकोण बाळगून आपले जगणे सुखद बनवितात,अशा जगण्याच्या मुळाशी असलेल्या अनेक विचार व भावनांचे वाक्यप्रबोध इथे जागोजागी आढळेल. त्यातून काय घ्यायचे व काय ठेवून द्यायचे,हा ज्याचा-त्याचा प्रश्न आहे. एक मात्र खरे की जीवनाकडे जरा हटके म्हणून पाहण्याची दृष्टी जर आपण कमवू शकलो नाही, तर आपला जन्म फुकट वाया गेला, असे समजून चालायला हरकत नाही.

जीवन हा एक क्रिकेटचा खेळ असून आपल्याला बाद करू पाहणारे आपल्या चहूबाजूने आपल्या हालचालीकडे लक्ष ठेवून असतात. तेव्हा आपल्याला जिंकण्यासाठी चेंडू जोरदारपणे टोलवावे लागतात. चहुबाजूने विरोधक उभे असताना त्यांच्या हाती कॅच जाणार नाही,याची काळजी आपल्यालाच घ्यावी लागते.अशातच शेवटच्या ओव्हरचा शेवटचा बॉल असेल आणि जिंकण्यासाठी ५ किंवा ६ रन'ची आवश्यकता असली तर...? हा प्रश्न मोठा ताणदायक असतो. कारण एकीकडे फिल्डिंग टाईट असते, तर दुसरीकडे बल्लेबाजच्या अस्तित्त्वाचा प्रश्न निर्माण होऊन त्याची ऊर्जा आणि कौशल्य ‘पणा’ला लागते. तेव्हा त्याने स्वतःसाठी सारी ताकत एकवटून षटकार मारला तरच त्याला जीवनाचा खेळ जिंकता येतो, नाहीतर शेवटपर्यंत पराभवाचे शल्य त्याला बोचत असते, म्हणून आपल्यासाठी खेळ बदलत नाही, तर खेळासाठी आपण बदलले पाहिजे. त्यासाठी आपली ऊर्जा आणि आपले अटीट्यूड ह्या गोष्टी खूप महत्त्वाच्या आहेत; म्हणून समाज हे एक ह्या खेळाचे ग्राउंड समजून व्यक्तीला त्यावर हा खेळ खेळून जिंकायचे असेल, तर त्याचे लक्ष चौकार व षटकार मारण्याकडे असले पाहिजे.

आपल्या अवतीभोवती असलेली माणसे आपली दांडी उडवून आपल्याला बाद करू पाहतात. अनेक जण आपल्या समोरच उभे असतात. त्या सर्वांचा विचार करुन आपल्याला सावधपणे खेळून जिंकायचे असते. प्रस्थापित व्यूहरचना, सामाजिक मानसिकता आणि लोकांची प्रवृत्ती, ही एक टाईट फिल्डिंग असते आपल्यासाठी. अशावेळी चक्रव्यूह भेदण्याचे विविध आयाम व परिमाणे आपण निर्माण करायला हवी. आपला अभिमन्यू होऊ द्यायचा

नसतो. अभिमन्यूला चक्रव्यूहातून बाहेर पडण्याचे मार्ग माहीत नसल्याने त्याचा वध झाला,सामाजिक जीवनातही आजकाल असेच व्यूह निर्माण झालेले दिसून येतील. त्याची माहिती हवी, त्याविषयीचे ज्ञान व हुशारी जवळ ठेवून आपल्याला पुढे यशस्वीपणे वाटचाल करायची असते. त्यासाठी आपले मन, भावना आणि विचार कसे असावे? त्या आधाराने षटकार मारून जगण्याचा हा खेळ कसा जिंकायला हवा, हे आपणच ठरवायचे असते. तसेच जगणे युद्धसंघर्ष असून ते कधी स्वतःशी, कधी कुटुंबाशी तर कधी समाजाशी असते. तेव्हा आपण स्वचिंतन करीत राहिले पाहिजे.

जबरदस्तीने किंवा भ्रष्ट मार्गाने मिळविलेल्या गोष्टी माणसाला कधी सुख देऊ शकत नाहीत, म्हणून स्वतःला इतके मजबूत बनवायचे, की हव्या त्या गोष्टीसाठी बळजबरीची किंवा भ्रष्टाचाराची गरज पडू नये. आयुष्यभर माणूस ताण घेऊन जगत असतो. किमान मरण्याच्याआधी तरी तो ताणमुक्त असला पाहिजे; म्हणून स्वतःवर फोकस करायचा आणि काहीतरी अलौकिक कार्य करून जायचं.त्याचे एक समाधान जेव्हा मिळते, तेव्हा ते खरंच सुखाचे मरण असते. मरण तर अटळ असते. जन्मासोबतच ते निश्चित झालेले असते,म्हणून प्रत्येकाला येते.फक्त ज्याचा त्याचा काळ मागेपुढे असतो, एअढेच...

इथे बहाणे,छल-कपट,धोके व अनीतीचा प्रत्यय येत असताना प्रत्येकाच्या जगण्याचा अंतिम हेतू हा आनंद व सुख मिळविणे हाच असतो, पण ते सहज साध्य होत नसते. त्यासाठी अनेक मार्गांवरील, अनेक वळणावर, अनेक भूमिकेतून जावे लागते. अशावेळी आपला कोणाला त्रास होणार नाही,असे जगावे आणि गोड बोलून आपल्या हेतू सिद्धीसाठी कोणाला नादी लावू नये,

नाहीतर आपला आंतरात्माच आपल्याला कोसत असतो. हे साध्या-सरळ माणसाचे मन असते. तो त्याच्या मनाला खातो, म्हणून त्याने अतिरिक्त भावनिक व उत्साही होऊ नये.

आजकाल वरवर कितीही शायनिंग इंडिया किंवा सर्व ठीक आहे, असे मानून चालले, तरी लोकं आपली समीक्षा करीत असतात. आपण चांगले असताना ‘लोकं काय म्हणतील?’ ह्या प्रश्नाच्या भानगडीत पडू नये. आपण आपले चालत राहायचे.आत्मनिर्भर बनले की, कोणाच्या पद्धतीने जगण्याची गरज नसते. लोकांच्या हिशोबाने नाही जगायचे. आपल्या जगण्याचा हिशोब आपणच ठरवायचा असतो. तो हिशोब लोकांच्या दृष्टिकोनातून करायचा नसतो,परंतु खास अशा जगण्याची दिशा ठरवताना चांगले काय आणि वाईट काय? याची निवड व पारख आपल्यालाच करता आली पाहिजे. आपण आपल्या सुखासाठी व आनंदासाठी काही गोष्टी केल्या आणि त्याचा कोणाला त्रास होत नसला तर ती कृती आपल्यासाठी चांगलीच असते.उगीच विधीनिषेध,पापपुण्य याच्या भानगडीत पडून स्वतःचे खच्चीकरण करून घेण्यात काही अर्थ नसतो.आपण आपल्या भल्यासाठी काही गोष्टी करत असाल आणि लोकांनी विधिनिषेध म्हणून ते वाईट ठरविले, तर तो लोकांचा मूर्खपणा असतो. तिकडे लक्ष द्यायचे नसते. लोकांचे कामच असते ते, कुचाकळया करणे. त्यास बळी पडून स्वतःच्या मनासारखे जीवन जगणे का थांबवायचे? थांबायचे असेल तर ज्यापासून दुसऱ्याला त्रास होतो, ती गोष्ट वाईट असते, तिथे थांबून ती गोष्ट टाळली पाहजे.

लोकांचे स्वभाव व प्रवृत्ती यात बदल झाले, की 'काळ व युग' बदलते. अशा बदलत्या युगप्रवाहात पोहता आले पाहिजे. एकसाची जुनाटपद्धतीने राहू लागले, की आपलीच अडचण होते. समस्या आपली असते, ती आपल्यालाच सोडवायची असते,म्हणून काळप्रवाहाचे भान राखणे फार गरजेचे असते. त्यात स्वतःचा एक समतोल राखता आला पाहिजे. त्यासाठी फार साधे किंवा फारच धूर्त, तसेच फार कठोर बनून चालत नाही. मध्यममार्ग खूप महत्वाचा असतो. तो आपल्या जगण्याचा बॅलन्स म्हणून सांभाळायचा असतो.

आयुष्यात वेदना किंवा संकट सहन करायचे नाही आणि त्याबाबत काही तक्रारही करायची नसते. त्याचा स्वीकार करून नवे मार्ग निवडणे, स्वतःला सक्षम म्हणून सिद्ध करीत जाणे,हे आपल्या अस्तित्वाचे विकसित रूप बनविले पाहिजे.तेव्हा कोणाला ओरबाडून स्वतःचे हितही साधायचे नाही.कारण इथे काम, क्रोध, लोभ, हेवे-दावे, द्वेष, मत्सर व भ्रम खूप आहेत. आपल्याला हे सगळे पार करून पुढे चालायचे असते. अशावेळी सद्गुण व आत्मनियंत्रण असणे, हे आपल्या व इतरांच्या फायद्याचे ठरते.जगातील अनेक दर्शन व सिद्धांतापैकी स्टोइक हे एक दर्शन आहे, ते हेच सांगते की, "ज्या गोष्टी आपल्या हातात आहे, त्याविषयी विचार, भावना व कृती करायला हवी. नको त्याकडे मन भरकटू न देता स्वतःवर नियंत्रण हवे.न्याय, साहस, ज्ञान व संयम हवा.जे जे होते ते ते पाहत राहावे. पुढे जाण्यासाठी आपली ऊर्जा निर्माण करून चालत राहायचे.जीवनातील आव्हानांचा सामना करायचा" असे खूप काही विचारतत्वे आहेत.आपल्या जगण्यासंबंधी त्याकडे डोळसपणे पाहणे आणि

आपल्या हातातील गोष्टी पार पाडून सक्सेस होणे, हे आपल्या जीवनाचे सूत्र बनले पाहिजे, ही जाणीव फार कमी लोकांमध्ये असते.

वरील सर्व बाबी लक्षात घेऊन जीवनाच्या खेळात यशस्वी होण्यासाठी असे काही षटकार आपण मारत गेले पाहिजे,की अखेरच्या क्षणी सार्थकतेची फिलिंग आपल्या मनात असली पाहिजे.नाहीतर देहाला पीळ पडून शरीरातील प्राणवायू निघून जात असेल तर मरण फार यातनेतून झालेले असते.मरायचेच असते एक दिवस तर सहज डोळे मिटून आलेले मरण हे सुखदपणाची ग्वाही देते.तेच आपल्या वाट्याला यावे,यापेक्षा आणखी आयुष्यात काहीही नको असते.सोबत तेच असते आणि बाकी सगळे मागे पडते. सत्ता,पद व पैसा याचे मूल्य आयुष्याच्या अखेरीस शून्य होते आणि माणसाचे असामान्य व माणुसकीचे वागणे लोकांच्या ध्यानात राहते. त्याची तीच खरी श्रीमंती असते; म्हणून जगण्याच्या वाईट तऱ्हेबरोबर चांगल्या तऱ्हाही लक्षात घ्यायच्या असतात, की त्या आपल्याला आपल्या जगण्याकडे आशेचे किरण घेऊन येतात व एक उत्साह निर्माण करतात. त्या उत्साहाचा गंध मात्र समजून घेता आला पाहिजे.

मानवी जीवनामध्ये गडद काळी बाजू अधिक असली तरी आकाशातील लुकलुकणाऱ्या ताऱ्यासारख्या थोडासा का होईना प्रकाश देणाऱ्या काही बऱ्याच पांढऱ्या बाजू आहेतच. त्याच बाजूवर हे जग चाललेले आहे. जिथे चांगले, तिथे वाईट आहे, जिथे वाईट, तिथे चांगलेदेखील आहे. तेव्हा जे काही चांगले आहे, त्याचा स्वीकार विचारपूर्वक करून आपण पुढे गेले पाहिजे. चालण्यासाठी हव्या त्या मार्गाची निवड आपणच करू शकतो. कोणी

दाखविलेल्या मार्गांवर जाताना मात्र विचार करतो. तेव्हा सकार व नकार दोन्ही बाजूने विचार करणे हेही आपल्याच हाती असते...

इथे प्रेम आहे, जिव्हाळा आहे, माणुसकी आहे, नैतिकता आहे, सरलता, उदात्तता व थोरवी आहे,ह्या सगळ्या आपल्या जीवनातील जमेच्या बाजू आहेत. त्याची केंद्रे आणि स्थळे आपण पारखली पाहिजे आणि हेरली पाहिजे. कारण माणसाला माणसाशिवाय नाही राहता येत. जिथे प्रेम व जिव्हाळा मिळतो, ती आपली माणसे असतात. माणसाला सांभाळणे, हातात हात घेऊन जीवनाला आकार देत आपल्यासह त्यालाही विकसित करत जाणे, हेही आपण पाहिले पाहिजेत. स्वार्थ हा आपण मानलेल्या आपल्या माणसांना सांभाळण्यात बाधा आणतो. त्याग त्याला तोलून धरतो. तोलता नाही आले तर माणूस हातातून निसटून जातो.हे निसटलेपण आपल्यालाच दुःखदायक ठरते. अशावेळी आपण नेमकी भूमिका घेणे गरजेचे असते. तेवढे भान पाळले नाही की,घोटाळे होतात.ती चूक आपली ठरते आणि जीवनात खूप काही गमावल्यासारखे वाटते.

इथे प्रत्येकजण स्वतंत्र असल्याने त्याला विचार व निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असते, त्याच्या कृती-उक्ती आपल्या हातात नसतात,म्हणून त्याने आपल्या मनासारखे नाहीच काही केले, तर त्याच्याविषयीचे सुडाचे राजकारण काही उपयुक्त ठरत नाही. त्याला ‘लेट गो’ म्हणत स्वतःला बेहत्तर बनवून सर्वोत्तम सिद्ध करणे, हे आपल्याच हातात असते आणि आपण ते प्राधान्याने करायला हवे.कारण एक बाजू नकारात्मक आहे,तर सकारात्मकता ही दुसरी बाजू आहे. म्हणून अशा सकारात्मक दृष्टीने स्वीकार्य असलेल्या बाबींचा

पुरस्कार करणे, हे तर मानवी हिताचे ठरते. अशावेळी आपले हित कशात आहे, याचा शोध घेणे ही आपली जबाबदारी असते. जिथे वाईट अनुभव येतात, तिथे पुन्हा पाय टाकायचा नसतो. आपल्याला सुख-शांती मिळेल तिथे पाय थांबतात; म्हणून कुठे थांबायचे आणि कुठून पुढे निघून जायचे, याचे भान ठेवण्यासाठी आपले विचार आणि भावना, आपले अचेतन आणि सचेतन मन, यावर आपले नियंत्रण असणे आणि संयम बाळगणे आपल्या हातात असते, म्हणून सकारात्मक बाजूदेखील विशिष्ट पद्धतीने सांभाळता आले पाहिजे. परिस्थिती कशीही असू द्या,निर्माण होऊ द्या. ते तर दहाच टक्केचे वास्तव असते. खरे तर नव्वद टक्के गोष्टी आपल्याच हातात असतात. जसे - आपल्याबाबतीत जे काही घडते त्याकडे आपण कसे पाहतो, याचा विचार प्रथम करणे आवश्यक असते. त्या घडलेल्या गोष्टीच्या बाबतीत तिकडे जर नकारात्मक दृष्टीने पाहिले तर त्याचा आपल्याला त्रास होणार नाही. त्याचे अनिष्ट परिणामदेखील समोर येतील. उदा. गावाला जातांना बस स्थानकावर आपण बसची वाट पाहत असताना, बस लवकर आलीच नाही, तर तिचे उशिरा येणे ही आपल्या हातातली गोष्ट नाही; म्हणून त्याविषयीचा त्रागा करून काही एक फायदा नसतो. आपलेच स्वास्थ बिघडते, मग आपल्या हातातली गोष्ट कोणती तर त्या वेळेमध्ये, म्हणजे बस येईपर्यंत आपण आपल्या कुठल्यातरी आवडीच्या गोष्टीत अडकून राहणे. ती पूर्ण केली तर उशिरा येणाऱ्या बसविषयी चिड निर्माण होऊन स्वास्थ बिघडणार नाही. मात्र स्वतःच्या हातातील गोष्टींकडे सकारात्मक भूमिकेतून पहणे आणि त्यातून फलप्राप्ती करून घेणे, हे केव्हाही आपल्या हातात असते किंवा रस्त्याने चालताना एखाद्याचा आपल्याला धक्का लागला, तर

बराच वेळ त्याच्याशी भांडत बसलो आणि आपल्याला कामाच्या ठिकाणी पोहोचायला वेळ झाला. त्यामुळे अधिकारी रागवतो, तेव्हा आपल्याला वाईट वाटते; पण जेव्हा धडक लागली, तेव्हा सामंजस्याने वाद मिटवला असता तर, पुन्हा कार्यालयात अपमानित होण्याची वेळ आली नसती. म्हणजेच विचार करून त्या व्यवस्थित हाताळण्यात आपण यशस्वी झालो तर आपल्यासारखा सुखी कोणी नसतो.मग सुख मागून मिळत नाही,ते निर्माण करावे लागते. हेही लक्षात घ्यावे लागते.

*** *** ***

# ८. पुरस्कार म्हणजे जबाबदारीचं ओझं असतं

पुरस्कार हे विशिष्ट क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी, सेवा किंवा योगदानाबद्दल दिली जाणारी अधिकृत मान्यता आणि त्या व्यक्तीचा सन्मान असतो. हे पुरस्कार राज्य, खाजगी संस्था किंवा प्रतिष्ठित संस्थांद्वारे कला, साहित्य, विज्ञान, क्रीडा, आणि समाजसेवेतील उत्कृष्टतेसाठी दिले जातात. तेव्हा पुरस्कार त्या व्यक्तीला मिळत नाही, तर त्याच्या कार्याला मिळतो; म्हणून व्यक्तीची इमेज न पाहता त्याचे कार्य पाहिलेले अधिक चांगले असते. कारण व्यक्तीबाबत मतभिन्नता असते. सत्कर्याबाबत दुमत नसते. माणसाने माणसाला चांगलं म्हणावं, त्याची स्तुती करावी, त्याचे गुण गावे, असे उदार मन बहुतांश लोकांकडे नसते.

चांगल्या हेतूने समाजाच्या कल्याणासाठी किंवा प्रगतीसाठी सत्कार्य करणारी व्यक्ती समाजजीवनात चांगली ठरते; पण त्याला चांगले म्हणणाऱ्यांची संख्या कमी असते. जी माणसं किंवा संस्था व्यक्तीपेक्षा त्याच्या कामाचं मूल्यमापन करतात, तेच त्या व्यक्तीच्या सन्मानासाठी पुढे येतात. बऱ्याचदा समाज हा व्यक्तीकडे वाईट नजरेनेच पाहतो. प्रत्येक जण स्वतःला ग्रेट समजतो. त्यामुळे इतरांच्या हातून चांगले काम होतात, तेव्हा त्या कामाची दखल त्याच्याकडून घेतली जात नाही; म्हणून समाजात चांगल्या गोष्टी दुर्लक्षित होतात; पण काही रत्नपारखी असतात की, जे व्यक्तीच्या कामाची योग्य दखल घेऊन त्याचा सन्मान करतात आणि समाजात चांगला पायंडा पडतात.

व्यक्ती आणि त्याचे कार्य ह्या दोन भिन्न गोष्टी मानाव्या लागतात. ते या अर्थाने की एक खाजगी आणि दुसरी सामाजिक. गोष्ट कोणतीही असो. तिला चांगली आणि वाईट, अशा दोन किनार लाभलेल्या असतात. माणसाचं व्यक्तिगत आयुष्य सर्वांना आकर्षक आणि सुंदर वाटेलच असं नाही. उलट जलसी अधिक असते. लोक त्याच्यातील दोष काढून त्याला उघडेनागडे करत असतात; म्हणून 'निंदकाचे घर असावे शेजारी', असे म्हटले जाते, लोक फक्त निंदाच करतात असेही नाही. मात्र अनेकांना व्यक्तीच्या खाजगी आयुष्यात डोकावण्याची आणि त्याला नावे ठेवण्याची फार मोठी सवय असते. त्यामुळे व्यक्तीच्या हातून घडणाऱ्या चांगल्या गोष्टींकडे दुर्लक्ष होते. व्यक्तीचे चांगले गुण तेवढे पारखण्याची दृष्टी फार कमी लोकांकडे असते. अशी माणसे जेव्हा व्यक्तीचे खाजगी दोष बाजूला ठेवून त्याच्या समाजजीवनातील सत्कार्याला प्रतिसाद देण्यासाठी, त्याला प्रोत्साहन आणि प्रेरणा देण्यासाठी पुरस्काराची योजना करीत असतात. त्यांनाही पाहणारे आणि ऐकणारे लोकं नावे ठेवतात आणि त्या पुरस्काराचा आणि पुरस्कार देणाऱ्याचा हेतू पाहण्यापेक्षा पुरस्कार प्राप्त असलेल्या व्यक्तीच्या खाजगी आयुष्यातील दोषाचे स्वंथ करीत असतात. अशावेळी समाजात गैरसमज पसरतात; म्हणून पुरस्कार देणाऱ्या संस्थानी आपली नैतिक जबाबदारी पाळली पाहिजे.

पुरस्कार देणाऱ्यांनी सामाजिक जीवनात वावरणाऱ्या व्यक्तीचे गुणदोष आणि सत्कार्य याची गोळा-बेरीज किंवा मोजमाप करूनच पुरस्कारासाठी त्याची निवड करणे हे आवश्यक ठरते. आणि आपल्याला पुरस्कार मिळतो; म्हणून घेऊन टाकायचा, हे धाडसही कोणी करू नये. कारण आपल्या जवळची

माणसे आपल्याला पूर्ण ओळखत असतात. आपल्या सामाजिक जीवनातील कामाचे मूल्यमापन त्यांनी केलेले असते आणि जर काही चांगले कार्य केलेले नसेल आणि पुरस्कार घेतला, तर नक्कीच ती व्यक्ती नींदेला पात्र ठरते आणि पुरस्कार देणारे हौशी व भ्रष्ट ठरतात. याचे भान पुरस्कार घेणाऱ्यांनी व देणाऱ्यांनी राखले पाहिजे. म्हणजे समाजात पुरस्कार देणाऱ्या संस्था ह्या बदनाम होणार नाही. एकदा एका संस्थेने काही वर्षापूर्वी काव्यरत्न पुरस्कार देण्याचे पत्र पाठवलं होतं. त्यांना म्हटलं,"मी एकही कविता लिहिलेली नाही किंवा काव्यसंग्रह छापला नाही, तर मला तो काव्यरत्न पुरस्कार शोभून दिसणार नाही म्हणून तो पुरस्कार टाळला." तसेच दिल्लीचे पत्र आलं होतं. त्यात त्यांनी शिक्षणतज्ञ म्हणून पुरस्कारासाठी निवड केलेली होती आणि एक फॉर्म भरून मागितला होता. सोबतच काही नोंदणी फी म्हणून रक्कम मागितली होती. तेव्हा त्यांना म्हटलं, "मी शिक्षणतज्ञ नाही आणि मला पैसे देऊन पुरस्कार विकत घ्यायचा नाही" तर तेही टाळलं आणि एक पथ्य पाळलं. 'आपण केलेल्या कार्याला जर कोणी पुरस्कार देत असेल, तर तो घ्यायला हरकत नाही. कारण ते कार्य लोकांनी पाहिलेलं असतं आणि त्यांना ते पटतं, तेव्हा तो पुरस्कार मानाचा ठरतो.

काही संस्था किंवा काही समूह केवळ पैसा मिळवण्यासाठी पुरस्कार योजना आखत असतात; पण सगळेच तसे करतात असे नाही, तर समाजातील चांगल्या गोष्टी, चांगली माणसं लोकांपर्यंत गेली पाहिजेत, हा त्यांचा उदात्त हेतू असतो. तेव्हा ते पुरस्कार पात्र ठरणाऱ्या व्यक्तीकडून कुठल्याही प्रकारचे चार्जेस किंवा पैसे घेत नाहीत, अशा सेवाभावी संस्था अनेक आहेत. त्या संस्था त्या व्यक्तीच्या सन्मानाबरोबर त्याला काही मानधन व सन्मानपत्र देतात; परंतु फार थोड्याफार संस्था अशा आहेत की, पुरस्कार देतात, पण त्यांच्या कार्यक्रमाला

येणारा जो खर्च आहे, तो पुरस्कारप्राप्त व्यक्तीकडूनच वसूल करतात. अशावेळी ती व्यक्ती आणि ती संस्था दोघांबाबत समाजामध्ये गैरसमज निर्माण होतात; म्हणून जिथे पैसे लागत असतील ते पुरस्कार नाकारणे हे सेवाभावी काम करणाऱ्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाला शोभून दिसते; पण आपल्या कामाची प्रसिद्धी होण्यासाठी त्या कार्यक्रमाला योगदान म्हणून त्याने काही आर्थिक हातभार लावला, तर ती चांगलीच गोष्ट म्हणावी लागते. नाहीतर जगामध्ये बरीच माणसं खूप चांगलं कार्य करतात, पण ते प्रसिद्धीपासून उपेक्षित असतात; म्हणून अशावेळी समाजाने अशा संस्थांना भरभरून मदत नाही केली, तरी काही हरकत नाही; परंतु त्याकडे चौकस व डोळस नजरेने पाहणे म्हणजेच समाजात चांगल्या मूल्यांची वाढ होण्यासारखे असते. म्हणूनच पुरस्कार हा केवळ प्रसिद्धीचा, प्रतिष्ठेचा किंवा त्या व्यक्तीचा प्रश्न नसतो.तर समाजात इष्ट मूल्यांची जपणूक असते. ज्याला पुरस्कार मिळतो, त्याच्याकडे लोक अपेक्षेने पाहतात की, त्याच्या हातून चांगल्या गोष्टी घडतील. तेव्हा पुरस्कार हे एक जबाबदारीचं ओझं ठरतं. पुरस्कारप्राप्त व्यक्तीवर वागण्याच्या व राहण्याच्या मर्यादा येऊन पडतात. त्याला समूहजीवनामध्ये फार औपचारिकरीतीने, चांगल्या पद्धतीने राहावे लागते आणि पुन्हा चांगल्या कामाची जबाबदारी घेऊन सत्कार्यांमध्ये वाढ करावी लागते. तेव्हा ती एक सामाजिक जबाबदारी म्हणून त्याच्यासाठी ओझंच असतं. त्याचा सन्मान करून त्याला कोणी हातभार लावत असेल,त्याचा सन्मान करत असेल, तर ती चांगलीच गोष्ट आहे. मग समाजातील काही प्रवृत्तीकडे दुर्लक्ष करून ‘कोणी काही म्हणो’ अशा विचाराने जो आपल्या कामाला लागतो, तो नक्कीच पुरस्कारास पात्र ठरते.

*** *** ***

➢ **संदर्भ स्रोत**


१. Brig AP Singh, SM*, VSM(2022).Ancient Indian Knowledge Systems and their Relevance Today – With an Emphasis on Arthaśāstra https://share.google/NfGE5bZTeqesE7sVn

२. https://mr.wikipedia.org/wiki/

३. https://askfilo.com/user-question-answers-smart-solutions/define-digital-technology-3338333438313136

४. Vinod Kumaar R , Rashmi Tambe and Mujiruddin Shaikh,( 2024).Building digital platforms: Key considerations for long-term success | Thoughtworks https://share.google/VHaq5vi5fj7NP03B5)

५. https://www.jagranjosh.com/articles/essay-on-digital-india-for-students-1733301332-1

६. Advantages and Disadvantages of Digital Technology Essay | Free Essay Example for Students , https://share.google/PZTyHvKmqWCzN1t6c

७. https://www.slideshare.net/slideshow/17-disadvantages-of-digital-technologypptx/253389880

८. www.youtube.com/@ShadowMindAudiobooks

९ . Gabora, L. (in press). Creativity. Oxford Research Encyclopedia of

Psychology. Oxford UK: Oxford University Press.

१० . Mazeh, Y. (2020) What Is Creativity and Why It Is So Important? Open Access Library Journal, 7: e5562.

https://doi.org/10.4236/oalib.1105562

११.http://ir.unishivaji.ac.in:8080/jspui/bitstream/123456789/1829/5/05_Chapter%201.pdf

१२ . डॉ.पगार एकनाथ,भाषिक सर्जनशीलता:स्वरूप आणि प्रकार,यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,पु.मु.२०१३

१३ . Dr. Hiba Tabbarah & Mr. Abdullah Abdulghafar, artificial entelligence,AUM(americanUniversity of the middle east,२०१७

१४. Collins, B. (2026). Organise your life with Chatgpt. UK: Anthem Publishing Ltd .

१५.https://www.amitjadhav.com/blogs/what-is-artificial-intelligence-explained-in-marathi#:~:text

१६. Sternberg, Robert J.(2006) 'The Nature of Creativity', Creativity Research Journal, 18: 1, 87 — 98, pg.89

१७.https://www.bbc.com/marathi/resources/idt-74697280-e684-43c5-a782-29e9d11fecf3#:~:text

१८ . https://cdn-dynmedia1.microsoft.com/is/content/microsoftcor

१९ . Ellen Glover, (2025).What Is Artificial Intelligence (AI)? | Built In https://share.google/LkkEbfpKP1LQCxFyw)

२० . How Does AI Work? Basics to Know | Coursera https://share.google/57BXsZByadVPGQeNT

२१ . Krysten Godfrey Maddocks, (2025).,What is Creative Writing? | SNHU https://share.google/SsH1wLTie3bog42kb

२२ . Creative Writing | Definition, Techniques & Examples - Video | Study.com https://share.google/dJrT9Tjf3suEPSgiy

२३ . पगार एकनाथ, (२०२०). सर्जनशीलता : अर्थ व स्वरूप, कुलसचिव यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक

२४ https://chatgpt.com/share/69887c72-b4b4-8012-ae97- faba2dafc077

२५ डॉ.मरजे बी. पी., डॉ. पवार युवराज : लिंगभाव शाळा आणि समाज, प्रशांत पब्लिकेशन जळगाव, २०२२

२६ . डॉ. भंगाळे शैलजा, डॉ. सोनवणे रंजना : लिंगभाव, विद्यालय आणि समाज, प्रशांत पब्लिकेशन जळगाव, २०२०

२७ . वानखेडे मंगला गजानन : श्री वादी चळवळीच्या संदर्भात साठोत्तरी वैधर्वीय लेखिकांच्या साहित्याची चिकित्सा, अ प्रकाशित शोत प्रबंध, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती २०१९

२८ . https://en.wikipedia.org/wiki/Masculinity

२९ . https://www.merriam-webster.com/dictionary/masculinity

३० . THE MEANING OF MASCULINITIES, https://www.ndi.org/sites/default/files/ACFrOgAZ9X_S2Bl-

३१ . https://pudhari.news/the-rate-of-violence-against-men-by-women-is-increasing-in-ten-years

३२.https://parshuramtimes.com/?p=2311#:~:text=%E0%A4%A6%E0%A३३ . https://www.indlex.com/national-commission-for-men-bill-2025-an-analysis-by advocate-sanjay-kumar

३४. चौधरी उन्नती : अभिप्राय,पुरुषनामा,ई –साहित्य प्रतिष्ठान,ठाणे,२०२५

३५. डॉ. सुरवाडे मनोहर : मनोगत,पुरुषाच्या व्यथा, प्राइम पब्लिकेशन, जळगाव, २०२५

# प्रा. मनोहर सुरवाडे यांची ई साहित्यवरील इतर पुस्तके

कव्हरवर क्लिक करताच ई पुस्तके उघडतील.

छापील पुस्तके विक्रीसाठी उपलब्ध आहेत. – संपर्क- ९९७०११७४३९












